


# हाकारा

वर्ष : बावीसावे • अंक चौथा


ऑक्टोबर - डिसेंबर २००१











## दिशा २००१

## ‘आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास’

## संमेलन वृत्तांत (भाग १)

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : प्रा. रा. के मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : डॉ. विजय भानू |
| मुख्य सचिव | : डॉ. सुधाकर मोराणकर |
| सह सचिव | : पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : जयवंत मंत्री |
| सभासद | : ॲड. पद्माकर वळवी (आमदार) |
| | : डॉ. मिलिंद बोकील |
| | : सुधीर जोग |
| | : गणपत पंडित |
| | : आरती कौलगेकर |
| | : सुमेध गुर्जर |

*दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.*

– गं. बा. सरदार

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा (त्रैमासिक)

वर्ष : बावीसावे ● ऑक्टोबर–डिसेंबर २००१ ● अंक : चौथा

*संकल्पना व प्रेरणा*
कै. गं. बा. सरदार

*संपादक - मुद्रक - प्रकाशक*
रामचंद्र मुटाटकर

*कार्यकारी संपादक*
ग. शां. पंडित

*संपादक मंडळ*
मिलिंद बोकील
सुधीर जोग
श्रीनिवास इंदापूरकर
पुरूषोत्तम आगाशे

*अक्षर जुळणी*
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे

*मुद्रण स्थळ*
ज्ञानप्रबोधिनी मुद्रण विभाग, पुणे ३०

*मुखपृष्ठ छायाचित्र*
परिषदेच्या संग्रहातून

*अनुक्रम*

संपादकीय ... २

Summary Report ... ५

कृषि–विकासाद्वारे गरिबी निर्मूलन
जयंतराव पाटील ... ९

आदिवासी व आरोग्य
डॉ. सु. ल. काटे, न. शं. देवधर,
अभय शुक्ला, अनंत फडके ... १४

वंचित समूहांचे शिक्षण
दत्ता सावळे, रमेश पानसे, बाळ कोळेकर ... ३१

जंगल व जमीन
शरद कुलकर्णी, रा. वि. भुस्कुटे,
सुरेखा दळवी ... ५४

*प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता*

६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७
फोन / फॅक्स : (०२०) ५८८७२१९

अंकाचे मूल्य : रूपये २५/-

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

## 'अस्मिता आणि विकास'

**म**हाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने आदिवासी व उपेक्षित घटकांबरोबर गेली २५ वर्षे वेगवगळ्या स्वरूपाचे मेळावे, शिबिरे, कार्यशाळा या माध्यमांतून सतत संपर्क ठेवून वैचारिक देवाण-घेवाण केली आहे. निरनिराळे संशोधन व अभ्यास प्रकल्प, प्रशिक्षण शिबिर घेऊन या घटकांच्या विकासातील अडचणींचा, समस्यांचा अभ्यास करून त्यांच्या विकासाच्या दृष्टीने काही पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. मग ते क्षेत्र आरोग्याचे असो, शिक्षणाचे असो की जंगल-जमिनीच्या प्रश्नांचे असो अथवा खोट्या आदिवासींच्या प्रश्नांचे. आदिवासी व इतर उपेक्षितांच्या चळवळीला पूरक ठरणारे एक व्यासपीठ 'हाकारा' च्या माध्यमातून देण्यात आले आणि आज २२ वर्षे हे नियतकालिक अखंडपणे त्यांच्याच प्रश्नांचा ऊहापोह करीत आहे, ही आमच्या दृष्टीनेही अभिमानाची गोष्ट आहे.

यंदाचे वर्ष परिषदेच्या रौप्यमहोत्सवाचे म्हणजे गौरवाचे वर्ष. साहजिकच हे निमित्त साधून जुन्या व नव्या मंडळींना, कार्यकर्त्यांना, साहित्यिकांना भेटावे, त्यांच्याशी हितगुज करावे, मागील काळाचा व कार्याचा आढावा घ्यावा, पुढील कार्याच्या दिशा ठरवाव्यात या उद्देशाने १२ ते १४ मे २००१ या काळात **'दिशा २००१-आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास'** या संमेलनाचा घाट घातला आणि विशेष म्हणजे परिषदेच्या प्रेमापोटी बोलावलेली सर्व मंडळी अगदी आनंदाने त्यात सहभागी झाली. आम्ही जी अपेक्षा केली होती त्यापेक्षाही उदंड असा प्रतिसाद लाभला. खरोखरच अवर्णनीय असा हा सोहळा झाला. त्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांमध्ये एक नवी उभारी, नवा उत्साह निर्माण झाला आणि एक दिशाही गवसली. ज्यांच्यामुळे ही दिशा मिळाली किंवा ज्यांनी आम्हाला ही दिशा दाखवली त्यामध्ये १९६२ पासून आमच्याशी घनिष्ट संबंध ठेवणाऱ्या जनार्दन महाराज वळवींचे, १९६५ पासून आम्हाला ओळखणारे व 'हाकारा' त अधून मधून लिहिणारे जयंतराव पाटलांचे, २५ वर्षे होऊनही ज्यांनी आमच्यावरचा स्नेह कायम ठेवला त्या माजी कुलगुरू देवदत्त दाभोळकरांचे अशा काही आदरणीय व्यक्तींचे ऋण आमच्यावर आहेत. यापुढेही त्यांच्या ऋणात राहणे आम्हाला आवडेल.

'बायफ ' चे श्री. गिरीश सोहनी यांनी या संमेलनाच्या निमित्ताने त्यांची एक नवी ओळख करून दिली आहे. त्यांचे विचार निश्चितच आम्हाला मार्गदर्शक व दिशादर्शक ठरणारे आहेत. आदरणीय गं. बा. सरदारांनी

आम्हाला वळण लावले, प्रेरणा दिली. डॉ. पां.वा.सुखात्म्यांसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या महान व्यक्तीने आम्हाला त्यांच्याच घरात समावून घेतले. या सर्व गोष्टी केवळ 'अविस्मरणीय' आहेत. तसेच शंकरराव खरात, मे.पु.रेगे, वा.द.वर्तक, मीराबाई तडवी, कमल रणदिवे, जगदीश गोडबोले या आमच्या हितचिंतकांनी आम्हाला दिलेल्या योगदानाचा मान राखणे व त्यांना आदरांजली वाहणे आमचे कर्तव्यच आहे. याव्यतिरिक्त परिषदेचा आणि अनेक आदिवासी, बिगर आदिवासी कार्यकर्त्यांचा अनेक वर्षांचा ऋणानुबंध राहिलेला आहे. त्यांनी अनेक कार्यक्रमांतून सहभाग दिला, तसाच येथेही त्यांनी आवर्जुन सहभाग घेतला हे विसरून कसे चालेल ?

परिषदेच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने दोन दिवस आदिवासी व आरोग्य, वंचितांचे शिक्षण, भटक्या-विमुक्तांचे प्रश्न, आदिवासी साहित्य व कला, जंगल-जमिनीचे प्रश्न, आदिवासींची अस्मिता आदी विषयांवर चर्चासत्रे घेण्यात आली. या चर्चासत्रांमध्ये संबंधित विषयांतल्या तज्ज्ञ व्यक्तींनी आपले विचार अगदी हिरीरीने मांडले. त्यामुळे संमेलनाला आलेल्या कार्यकर्त्यांना हे विचार मार्गदर्शक ठरतील म्हणून ते लिखित स्वरूपात मिळावेत अशी त्यांचीच इच्छा होती. आम्ही हे विचार संकलित केले व ते 'हाकारा' च्या दोन अंकांमधून क्रमशः देत आहोत.

आज २५ वर्षानंतरही आदिवासी व इतर उपेक्षित समाजांना केवळ अन्याय, अत्याचार व पिळवणुकीविरूद्ध आवाज उठविण्याची प्रेरणा देऊन चालणार नाही. तर त्यांच्या शाश्वत विकासाची दिशा शोधणे आवश्यक झाले आहे. 'अस्मिता आणि विकास' याचाच दुसरा अर्थ संघर्ष आणि रचनात्मक कार्य असाही होतो. महात्मा गांधींनी देखील याच्यावरच अधिक भर दिला. अहिंसेचा पुरस्कार करून संघर्षाची ज्योत त्यांनी पेटवली, पण त्याच्या जोडीला ग्रामस्वच्छता, भंगीमुक्ती, स्वदेशीचा वापर, हरिजन व इतर उपेक्षितांचा उद्धार, जाती निर्मूलन अशा रचनात्मक कार्याचा वारसा देखील आपल्याला दिला. आणि म्हणूनच आज जगभरातून गांधीवादाचा जोमाने प्रसार होताना दिसतो आहे. उपेक्षित समाजात काम करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांनी यापुढे केवळ अन्याय व पिळवणुकीविरूद्ध चळवळी न करता तंत्रज्ञानाची जोड देऊन रचनात्मक कार्यावर भर देणे आणि त्यातून शाश्वत विकासाकडे वाटचाल करणे आवश्यक झाले आहे.

जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या नावाखाली आदिवासींच्या जमिनींकडे आज बाहेरील लोकांचे लक्ष जायला लागले आहे. असे झाले तर सावकारशाहीपेक्षाही भयानक परिस्थिती आदिवासींच्या बाबतीत उद्‌भवेल. सावकारशाहीत आदिवासी हा वेठबिगाराचे जीवन जगत असला तरी त्याचे अस्तित्व टिकून होते. पण जागतिकीकरणाच्या रेट्यात त्याचे अस्तित्वच नष्ट होण्याची भीती आहे. त्याला असलेली वनांची माहिती, औषधी

वनस्पतींबाबतचे त्याचे पारंपरिक ज्ञान, निसर्ग व पर्यावरणाविषयीची त्याची आसक्ती आणि या सर्वांमुळे देशाच्या बौद्धिक संपत्तीत मिळणारे त्याचे योगदान या सर्वच गोष्टी त्याच्याबरोबर नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच आदिवासींच्या संशोधक वृत्तीचा, त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून औषधी वनस्पतींच्या बाबतीतले त्यांचे योगदान वाढविणे गरजेचे आहे.

त्यांच्या ज्ञानाचा हा ठेवा त्यांनीच जतन करून ठेवणे हा त्यांच्या अस्मितेचा एक भाग आहे. बाहेरच्यांनी त्याचं 'डॉक्युमेंटेशन' करणे योग्य नाही. निसर्गाबरोबरचं त्याचं नातं व अनुभवातून आलेली प्रयोगक्षम वृत्ती हे सर्व टिकलं तरच पुढच्या पिढीला ते देता येईल. त्याच्या पारंपरिक ज्ञानाला तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर एकंदरीतच त्यांच्या जीवन-निर्वाहाचा प्रश्न सुटू शकतो. त्यासाठी त्यांच्यातून वैचारिक नेतृत्व तयार होईल अशाप्रकारचं शिक्षण त्यांना देणं आवश्यक आहे. त्यांच्या हस्तकला, गाणी, संगीत हा एक अनमोल ठेवा आहे. आज इंटरनेटवर त्याची विक्री चालू आहे, तिला कोठेतरी पायबंद घातला गेला पाहिजे.

दिवसेंदिवस औद्योगिकरणामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाची साधने नष्ट होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत चालली आहे. त्यामुळे शहराच्या दिशेने त्यांचे होणारे स्थलांतर वाढले आहे. हे सर्व त्यांचे जीवनच उद्ध्वस्त करणारे आहे. त्यात आजचे आधुनिक शिक्षण त्यांचे पारंपरिक ज्ञान नष्ट करीत आहे. अशा परिस्थितीत आदिवासी अस्मितेची सांगड विकासाशी घालून त्यांच्यात वैचारिक नेतृत्व निर्माण करण्याची, त्याला एक दिशा देण्याची गरज निर्माण झाली आहे.

'अस्मिता आणि विकास' या संमेलनात याच विषयावर तज्ज्ञ व्यक्तींनी आपले विचार मांडलेले आहेत. त्यातील अनेकांनी अगदी सूत्रबद्ध पद्धतीने विषयांची मांडणी केली आहे. तिचा उपयोग कार्यकर्त्यांना निश्चितच होईल. गेल्या २०-२५ वर्षात जे कार्यकर्ते शिकून तयार झालेत, ज्यांना आपल्या स्वत्वाची जाणीव झालेली आहे अशा कार्यकर्त्यांनीच आता हिरीरीने पुढे येऊन आपल्या समाजाला शाश्वत विकासाची दिशा दाखवायची आहे. त्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी नव्हे, तर बरोबरच आहोत हेही त्यांनी लक्षात घ्यावे. आपल्या शंका, आपले विचार मांडण्यासाठी 'हाकारा' हे आपल्या हक्काचे व्यासपीठ आहेच.

या अंकातील लेखांमधून आपणास काही प्रश्न निर्माण झाले तर जरूर विचारावेत.

**— रा. के. मुटाटकर, ग. शां. पंडित**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशतः अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# Vision 2001 : Tribal Identity and Development
## Summary Report

### Preamble

The tribal population in India designated as scheduled tribes in the constitution is around 10% of India's population. Unlike the scheduled castes, other backward castes and nomadic groups who live in the main stream Indian rural and urban environment, the tribal communities lived in forest and hill tops in geographically isolated locations. As a result of personal interest taken by Mahatma Gandhi, Jawaharlal Nehru and other national leaders, the policies and programmes have been devised to bring the tribals into the main stream of Indian polity. There are some tribal states in the north-east, the latest Jharkhand having been added as a predominantly tribal state.

There are several voluntary organisations running schools and clinics in tribal areas. The preliterate tribals do not respond to the government programmes which needs lot of paper work and follow-up tours of government offices. The tribal population is also good political material for the political parties in view of its sizeable number. Several development projects like the construction of dams and hill resorts dehabilitate the tribals from their habitat. The tribals have lost their source of food and earning from the forest where they lived for centuries. With inferior lands, and primitive methods of cultivation, there is a problem of food security for the tribals which leads to malnutrition and exploitation. There is large scale seasonal migration to urban areas as unskilled labour which leads to deterioration in quality of life.

The educated tribal young social workers who also have a political clout are concerned about the loss of identity of the tribal communities. They are trying to develop their own literature and poetry on lines of Dalit Literature. Some of them with the help of NGOs are trying to adopt modern technology for increasing production in agriculture and horticulture. They are trying to group themselves in order to launch struggles on such issues as forest lands and the use of reservation benefits by pseudo tribals.

The Maharashtra Association of Anthropological Sciences, a NGO (voluntary organisation) started by the University based teachers in 1976 attracted the tribal activists, administrators and intellectuals on a common apolitical platform. The quarterly magazine in Marathi "HAKARA" (Clarion Call) exclusively devoted to tribal issues is being published for the last 21 years. This has provided another forum to debate the tribal issues. Each issue is devoted to a focussed theme such as Forest and Land, Education, Health, Literature and Art, Tribal Women. The organisation had Presidents of the caliber of Late Prof. G.B. Sardar, Late Prof. P.V. Sukhatme, and a famous history researcher and ex-Vice Chancellor of Tilak Maharashtra University Prof. A.R. Kulkarni. The organisation has provided a bridge between the city based intellectuals, the tribal activists, the NGOs and the government.

**Report of the Conference**

Report of the ConferenceThe MAAS organised a state level silver jubilee conference during 12-14 May 2001 at Vidyarthi Sahayak Samiti, Shivajinagar, Pune, taking advantage of MASS having completed 25,years since its establishment in the areas of research, training and advocacy and support to grassroot level organisation. The conference was attended by about 175 grassroot level tribal workers, non-tribals working in tribal areas, administrators and academicians. The conference was inaugurated by an agricultural scientist Dr. Jayant Patil who spent his life in the tribal areas of Thane District and was a member of Planning Commission.

Prof. Devdatta Dabholkar who was Vice Chancellor of Pune University, when MAAS was established 25 years ago and Mr. Girish Sohoni, Executive Vice President of Bhartiya Agro-Industries Foundation were the key speakers at the inaugural function. The sessions on tribal identity, health, education, literature, forest and land, nomadic groups were arranged during the conference presided over by the experts. Dr. Govind Gare, who was the first Director of the Govt. Tribal Research Institute was the chief guest at valedictory function presided over by erstwhile President of MAAS, Prof. A.R. Kulkarni. A Kavi Sammelan was one of the attractions in the conference.

At the inaugural function Prof. D.A. Dabholkar discussed the issue of whether Adivasis could be brought in the main stream on Indian Society. He advocated a larger debate on this issue. Shri. Girish Sohoni wanted the conference to debate the five issues mainly:

1. Food security for the tribals in the context of total development
2. Documentation of medicinal plants
3. Dialect, literature and crafts
4. Indigenous knowledge
5. Appropriate education

Dr. Jayantrao Patil discussed with examples about poverty alleviation programme through agricultural development. He gave several examples of horticulture development particularly about mango and chikoo. He also advocated the importance of drumsticks which has high nutritive values. Shri. Janardan Walvi narrated his experience about social change through the spread of education in tribal area.

The conference was organised into several symposia which were addressed by invited experts followed by discussions.

The symposia pertained to:

1. Tribals: Identity and Development: presided over by Dr. Govind Gare, IAS, who was the first Director of the Tribal Research and Training Institute, Govt. of Maharashtra, Pune.

2. Tribals and Health: presided by Dr. S.L. Kate who has been pioneer research worker in the area of Sickle Cell Anemia among the tribals in Maharashtra.

3. Tribal Women and Health: Presided over by the reknowned tribal activist Smt. Nancy Gaikwad.

4. Issues about Vimukta Jati and Nomadic groups: Presided over by Shri. Venkatrao Avdhut who is State President on VJNT of the Nationalist Congress Party

5. Land, Forest and Reserved Areas: Presided over by the noted academician, activist Prof. Sharad Kulkarni.

6. Education of the disprivileged: Presided over by Gandhian Social Worker and educationist, Janardan Walvi from Akrani, Dhule Dist.

7. Tribal art and literature: Presided over by a noted tribal poet Prof. Vinayak Tumram from Chandrapur

8. A Kavisammelan participated by several tribal poets was presided by the famous tribal poet, Shri. Wahru Sonawane from Shahada, Dhule Dist.

Besides inaugurating the conference on 12th May, Dr. Jayant Pail also gave a keynote address on 13th May regarding the Role of Technology in Tribal Development.

The purpose of the conference was to bring together tribal activists, thinkers and others on a platform which has been open to them for the last 25 years. The platform of MAAS was used for holding several seminar and workshops during last 25 years. MAAS has also been bringing out a Marathi quarterly HAKARA exclusively devoted to tribal issues since 1980. Several participants attending the conference have contributed their thoughts in this journal. It was therefore thought to bring all these people together in a conference discussing the issues which were separately tackled over the past few years.

The basic issue on tribal identity addressed itself to the issues of identity crises noted by the non-tribal perceptions and interventions in tribal society. Reservations were expressed about joining the so called consumerist and hierarchical main stream based on hereditary inequality. The main stream society has been exploiting and molesting women in contrast to tribal society. There is a principle of community cooperation in the production process in tribal society. The natural resource of the land is also not exploited commercially. Adivasi society is organised on democratic principles particularly on man-woman relationships and in the absence of hereditary inequality like caste system. The tribal identity therefore has to be preserved by allowing the tribal community to live life according to their own genius. It was surprising that the tribal history in the freedom struggle in India has been negated and not recorded. Development policy about tribals are creating a kind of dependence of the tribals on Government and social reformist voluntary sector. It was advocated that the tribal development should aspire for symbiosis between man and environment. It was also brought out that the tribal dialects needed to be preserved. Tribal communities need to develop on the principle of self-confidence and self-determination.

In the session on forest and land, concern was expressed about acquiring tribal lands for development project such as hotels, hill-stations, industries and national parks. It was advocated that the geographical territory of scheduled tribes needs to be extended so that the tribal lands could not be marketed for such development projects.

In the session of Vimukta Jaati (VJ) and Nomadic Tribes (NT), it was made out that the communities were greatly harassed by the bureaucracy while providing the benefits of reservations. The condition of VJ and NT had deteriorated because they lost their traditional occupation in the wake of technological development. Unless these communities are rehabilitated in a designated geographical area, they would not be in a position to educate their children and get the benefits of reservations. The funds provided for their development are negligible. There

was a general apprehension about their harassment by the regulatory departments like Police. On the issues of education, of the disprivileged communities, the issues were discussed with reference to dropout rate, quality of teachers, lack of facilities in the schools such as library, laboratory, play ground, etc. In spite of education being free to tribals, there is no provision for other expenditure relating to school education. The relationship of education with environment had to be established. Lack of education among tribal girls is still an issue to reckon with.

During the session on health with particular reference to women's health, the issues pertained to absence of health care facilities in tribal areas. Communicable diseases like malaria, diarrhea, cholera were rampant. Recently, malnutrition has become synonymous with Adivasis which is believed to be reasoned as a result of de-forestation. The food available to the tribals from the forest is no more accessible to them. Similarly, the migration and occupation on brick kiln deprive them to potable water and wholesome food.

The session on tribal literature and art was dominated by issues on close relationship between tribal identity and tribal literature. There was also a debate as to what constitute tribal literature. The issue of regional language and dialect and its impact on literature was also discussed. There were also problems about publication of tribal literary books. A note was taken about critique of tribal literature that it was dominated by the thought process of Dalit literature. The speakers also regretted that the State Government was not promoting tribal literature and arts. In the concluding session Wahru Sonawane and Ms. Ushakiran Atram expressed their happiness about MAAS having supported cause of Adivasi for the last 25 years.

Dr. Govind Gare and Mr. Girish Sohony suggested that action groups be formed on the subjects of symposia to follow up the discussion and suggestions made during the conference. Dr. Gare also advocated an approach of struggle on issues of tribal land and forest.

The President of MAAS, Prof. R.K. Mutatkar, expressed satisfaction that the young tribal workers who have been with MAAS for the last 25 years, are now occupying leadership positions in the tribal world and they are guiding the tribal workers through their own NGOs on issues of tribal interest. MAAS was willing to organise the regional meetings since it was not possible for all the tribal workers to come for the conference at Pune. He also made out that MAAS was a moving, living stream and did not belong to some individuals. An appeal to the participants to consider MAAS as their own organisation and contribute towards development and articulate their expectation without any hesitation was made.

A Kavi Sammelan was organised at night on 13th May. Tribal poets like Wahru Sonawane, Vinayak Tumram, Bhujang Meshram, Kusumtai Alam and several others narrated their poems about the exploitation of the tribals and the interaction of tribals with the non-tribals in the modern world. References were also made to the forces of globalisation and privatisation and its exploitation ill effects on tribal society.

■■

# कृषी विकासाद्वारे आदिवासींतील गरिबी निर्मूलन

## डॉ. जयंत पाटील

*डॉ. जयंत पाटील यांनी 'दिशा २००१' या संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले होते. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात त्यांनी आदिवासींच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने जे वेगवेगळे प्रयोग केले, त्या अनुभवांवर आधारीत 'माझे ग्रामरचनेचे प्रयोग' हे पुस्तक लिहिले आहे. श्री. पाटील कृषी व आर्थिक विषयातील तज्ज्ञ असल्यामुळे काही काळ ते नियोजन आयोगाचे सदस्य होते. या लेखात त्यांनी आदिवासींची आर्थिक प्रगती व्हावी म्हणून काही मुद्दे उपस्थित केले आहेत.*

महाराष्ट्राच्या सह्याद्री व सातपुडा पर्वतरांगांमध्ये तसेच त्यांच्या लगतच्या प्रदेशात राहणारे आदिवासी लोक हे पिढ्यान् पिढ्या अत्यंत गरिबीचे जीवन जगत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळी हे आदिवासी मोठ्या जमीनदारांच्या जमिनी खंडाने कशीत होते. त्यांना कुळ म्हणून संबोधित असत. त्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाचा अर्धा भाग त्यांना जमीनदारांना खंड म्हणून द्यावा लागे. ते कशीत असलेल्या जमिनीतील झाडांवर आदिवासींचा हक्क नव्हता. असे असूनही आदिवासी आपल्या जमिनींवर अत्यंत काबाडकष्ट करीत व धान्ये पिकवीत. परंतु उत्पादन केलेले धान्य त्यांना वर्षभर पुरत नसे. त्यामुळे वर्षातून पाच-सहा महिने त्यांना भाताच्या कण्या अथवा नाचणी यापासून बनविलेली पेज यावर उदरनिर्वाह करावा लागतो. आदिवासी आपल्या आहारात भाजीपाला अथवा फळे यांचा क्वचितच समावेश करीत असतात. त्यामुळे शरीरास लागणारी जीवनसत्त्वे व खनिजे त्यांना मिळत नाहीत. याचा परिणाम कुपोषणात होतो.

आदिवासींत कुपोषणाची समस्या सर्वत्र आढळून येते. विशेषतः गर्भवती स्त्रिया, बाळंतीणी माता व लहान मुले यांत ही समस्या अधिकच गंभीर आहे. आदिवासींना त्यांच्या शेतजमिनीवर फक्त खरीप हंगामात चार ते पाच महिने रोजगार मिळतो. भाताचे पीक कापून घेतल्यानंतर पुरूषवर्ग रोजगाराच्या शोधार्थ बाहेर पडतो. जंगलतोड, लाकडांची वाहतूक, रस्ते दुरूस्ती अशी कामे त्यांना मिळतात; परंतु ही कामेही सर्वांना मिळत नसल्यामुळे अनेक पुरूषांना रोजगाराशिवाय वेळ घालवावा लागे. स्त्रिया व मुले घरी राहतात व गुरांची चराई, भाताचा राब तयार करणे, शेतांची बांधबंदिस्ती ही कामे करतात. आदिवासींत वर्षभर उत्पादक रोजगाराची समस्या फार मोठी आहे. अपुरे अन्न, कुपोषण व उत्पादक रोजगाराचा अभाव ही आदिवासींच्या गरिबीची तीन प्रमुख कारणे आहेत. यातील समस्या दूर करण्याच्या हेतूने आम्ही ठाणे जिल्ह्यातील आदिवासींत १९५० सालापासून जे कार्यक्रम सुरू केले, त्यातून जे अनुभवास आले ते महाराष्ट्रातील व देशातील आदिवासी विकासाच्या दृष्टीने अभ्यासनीय आहे.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाकडे साधारणपणे दोन ते तीन एकरापर्यंत जमीन असते. स्वातंत्र्यपूर्वकाळी मुंबई इलाख्यात १९३७-३८ जे

राष्ट्रीय सरकार आले त्या सरकारने कुळ कायदा पास करून आदिवासींना सुरक्षित कुळे म्हणून घोषित केले. त्यामुळे जमिनदार त्यांच्या जमिनी सक्तीने खालसा करीत, ते थांबले. तद्नंतर १९५१ साली "कसेल त्याची जमीन" ह्या कायद्याप्रमाणे आदिवासी त्यांच्या जमिनीचे मालक बनले. त्यानंतरच आदिवासी आपल्या शेतीत रस घेऊ लागले. अशा रीतीने शेती उत्पादकतेत जमीनविषयक कायद्यांना (Land Reforms) अनन्य साधारण महत्त्व आहे. अद्यापही ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या एकसाली जमिनी तसेच रायगड जिल्ह्यातील दळी जमिनींचा प्रश्न अनिर्णीत आहे. तो त्वरीत सोडविला पाहिजे.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचे भात हे अन्नाचे प्रमुख पीक आहे. आदिवासी ज्या भाताच्या स्थानिक जातींची लागवड करीत त्या जाती सोसाट्याच्या वारा-पावसामुळे जमिनीवर पडून जात. साहजिकच त्यांचे उत्पादन कमी येत असे. त्यासाठी भाताच्या बुटक्या जातींची आवश्यकता होती. १९६६-६७ सालानंतर देशात अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची लागवड सुरू झाली तेव्हा आम्ही जया, रत्ना यांसारख्या बुटक्या जाती आदिवासींत रूजविल्या. आदिवासींकडून या जातींना थोड्याच अवधित मोठा प्रतिसाद मिळाला. आज भाताचे बहुसंख्य क्षेत्र या जातींनी व्यापले असून आदिवासींचे भाताचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अन्न-सुरक्षा साध्य करण्यास अधिक उत्पादन देणाऱ्या भाताच्या जाती अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यांचा आदिवासी क्षेत्रात प्रसार होणे अगत्याचे आहे.

ठाणे जिल्ह्यात भाताचे उत्पादन कमी येण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे अपुरा व अनियमित पाऊस होय. यासाठी आदिवासी शेतकरी भातशेतीच्या परिसरात जे नाले वाहतात त्यांना मातीचे बांध बांधून पाणी अडवितात व ते भातशेतीकडे वळवितात; परंतु पावसात मोठा खंड पडला की नाले कोरडे पडतात व भातशेती वाळून जाते आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. यासाठी आदिवासी प्रदेशात सर्वत्र जलसंधारणाचा कार्यक्रम हाती घेणे अगत्याचे आहे. नदी नाल्यावरील बंधारे, तलाव व विहिरी यांसारखे जलसंधारणाचे कार्यक्रम सर्वत्र घेण्यात आले, तरच आदिवासींचे भाताचे पीक वाचू शकेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५० वर्षे लोटली तरी आदिवासींचे भाताचे एक पीकही आपण शाश्वत करू शकलो नाही. सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर विकास करण्याचे उद्दिष्ट आपणास साध्य करावयाचे असेल तर आदिवासी क्षेत्रांत जलसंधारण्याच्या कार्यक्रमाला अग्रहक्क देण्यात आला पाहिजे. रोजगार हमी योजनेद्वारा जलसंधारणाची कामे प्रभावीपणे होऊ शकतात असा अनुभव आहे. त्या दिशेने रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारण कार्यक्रम घेण्यात यावा.

आदिवासींत बेरोजगारीची समस्या फार मोठी आहे. ही समस्या दूर करण्यास फलोत्पादन हा एक प्रभावी कार्यक्रम आहे, हे गेल्या ४० वर्षांच्या अनुभवावरून आम्हास दिसून आले आहे. १९६० साली कोसबाड कृषी संस्थेच्या परिसरात आम्ही दहा आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनींवर विहिरी खणण्याचा प्रायोगिक प्रकल्प हाती घेतला. या विहिरींवर लोखंडी रहाट बसविण्यात आले. ह्या कार्यक्रमाला त्यावेळच्या समाजकल्याण विभागाने

मदत केली. आदिवासींना फळझाडे व भाजीपाला लागवडीचे प्रात्यक्षिक शिक्षण देण्यात आले व सुरूवातीस त्यांना भाजीपाल्याचे बियाणे व आंबा-चिक्कूची थोडी कलमे देण्यात आली. उद्देश हा की त्यांनी या शिक्षणाचा उपयोग करावा. या आदिवासी शेतकऱ्यांनी चिक्कू व आंबा या दोन फळझाडांची लागवड केली व त्यात आंतरपीक म्हणून भाजीपाला लावला.

आदिवासी महिला आपला भाजीपाला व फळे विकण्यास परिसरातील बाजारात जात असत. त्यातून त्यांना रोख पैसा मिळे. सहाजिकच त्याद्वारे कुटुंबाची क्रयशक्ती वाढली व अन्न, कपडा व निवारा या जीवनाच्या तीन प्राथमिक गरजांत आमूलाग्र सुधारणा झाली. आजूबाजूचे आदिवासी या दहा शेतकऱ्यांना "वाडावाले" म्हणून संबोधू लागले. या विहिरीमुळे आदिवासी कुटुंबांना त्यांच्या जमिनीवरच वर्षभर उत्पादक रोजगार प्राप्त झाला. आता आदिवासी शेतकरी उघड्या विहिरीऐवजी बोअर विहिरी करीत असून त्यांत सबमर्सिबल पंप बसवितात. एका बोअरद्वारे दोन ते तीन एकर जमिनीतील फळझाडे व भाजीपाला यांना सिंचन मिळू शकते. शिवाय खरीप हंगामात भाताचे पीक शाश्वत होते. अशा बोअर विहिरींचा कार्यक्रम डहाणू व तलासरी या दोन तालुक्यात लोकप्रिय होत आहे. यासंबंधी डॉ. मिलिंद बोकील यांनी हाकारा त्रैमासिकाच्या जुलै-डिसेंबरच्या अंकात "किनाऱ्यावरचा कल्पवृक्ष" हा शोधनिबंध प्रसिध्द केला असून या कार्यक्रमाचे तपशीलात विश्लेषण केले आहे.

आदिवासी शेतकऱ्यांचा हा फलोद्यानाचा प्रकल्प पाहून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री फार प्रभावित झाले व त्यांनी ४ .एप्रिल १९८१ रोजी महाराष्ट्र शासनात स्वतंत्र फलोत्पादन विभाग स्थापन करण्याचा निर्णय कोसबाड कृषी संस्थेतील शेतकरी मेळाव्यात जाहीर केला. या मेळाव्यात आदिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विभागामुळे राज्यास प्रत्येक जिल्ह्यात फळझाडांची रोपे व कलमे तयार करणाऱ्या रोपवाटिका तयार झाल्या. त्यामुळे शेतकऱ्यांना लागणारी जातिवंत रोपे मिळणे शक्य झाले. तसेच शेतकऱ्यांना फलोत्पादनाचे प्रशिक्षण देण्यास लागणारे कृषितज्ज्ञ नियुक्त करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने १९९०-९१ या वर्षात फलोत्पादनाचा कार्यक्रम रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्याचा जो निर्णय घेतला, त्यामुळे आदिवासींसारख्या दुर्बल घटकांतील शेतकऱ्यांनाही फळझाडे लावणे शक्य झाले. या योजनेत फळझाडांची कलमे पुरविणे, त्यांच्या लागवडीसाठी लागणारा खर्च व त्यानंतरची ३ वर्षे पाणी देणे व इतर मशागतीसाठी अर्थपुरवठा केला जातो. या योजनेमुळे अनेक आदिवासी शेतकऱ्यांनी आंबा, काजू, चिक्कू, नारळ या फळझाडांच्या सुंदर बागा तयार केल्या आहेत. या फळबागांत ते आंतरपीक म्हणून भाजीपाल्याची लागवड करीत असतात. फळे व भाजीपाला विक्रीतून त्यांना रोख पैसा मिळतो व कुटुंबाची क्रयशक्ती वाढते. रोजगार हमी योजनेअंतर्गत फलोत्पादनाचा कार्यक्रम आदिवासींत उत्पादक रोजगार निर्माण करण्याचे अत्यंत प्रभावी साधन आहे.

फलोत्पादन कार्यक्रम आरोग्य व पर्यावरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. फळे ही जीवनसत्त्वे व खनिजे यांत समृध्द असतात. आहारात

त्यांचा समावेश केल्याने कुपोषणाची समस्या दूर होते. आदिवासी जनतेत कुपोषणाची समस्या फार मोठी आहे ती दूर करण्याकरता सुद्धा फलोत्पादन हा एक महत्वाचा कार्यक्रम आहे. फळझाडे लावल्यामुळे पर्यावरणात सुधारणा होते. झाडांचे आच्छादन झाल्यामुळे पावसामुळे होणारी जमिनीची धूप थांबते. आदिवासींच्या जमिनी तर डोंगर उतारावर असतात व त्यांची धूप मोठ्या प्रमाणात होत असते, हे थांबविण्यासाठी त्यांच्या जमिनींवर फळझाडे लावली पाहिजेत. फळे खाण्यास अनेक पक्षी येतात व ते धान्यपिकांवरील किडींचा नाश करतात. फलोत्पादनामुळे परिसरातील भूमीहीन लोकांसाठी मोठा रोजगार निर्माण होतो. बोर्डी परिसरातील शेकडो भूमीहीन महिला चिक्कू फळे गोळा करून ती विकण्यासाठी रेल्वे अगर बसने दूरवरच्या बाजारात जातात. फळांमुळे प्रक्रिया उद्योग विकसित होतो. आंब्याची लोणची, चिक्कूच्या कापा, नारळाचे खोबरे व काथ्याकाम असे अनेक प्रक्रिया उद्योग सुरू करता येतात व त्याद्वारे महिलांना रोजगार मिळतो. अशा रीतीने आदिवासींतील गरिबी निर्मूलनाचे जे कार्यक्रम आहेत त्यात फलोत्पादनाचा कार्यक्रम अत्यंत प्रभावी आहे, असे आम्हांस गेल्या ४० वर्षापासून अनुभवास आले आहे. त्यादृष्टीने या कार्यक्रमाचा प्रसार महाराष्ट्रातील सर्व आदिवासी क्षेत्रांत होणे अगत्याचे आहे. त्यासाठी खालील उपाय करावे लागतील.

## १. पायाभूत सूविधांची निर्मिती

फलोत्पादनाचा कार्यक्रम हा गावपातळीवर असल्याने ग्रामपंचायतीच्या सदस्यांना या कार्यक्रमाचे महत्त्व माहीत असणे अगत्याचे आहे. फळझाडांसाठी लागणारी सिंचन व्यवस्था, रस्ते, व बाजारपेठ या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे नियोजन व त्यासंबंधीचे प्रशिक्षण ग्रामपंचायतीच्या सदस्यांना द्यावे लागेल. तसेच पंचायत समितीचे पदाधिकारी व सदस्य यांनाही पायाभूत सुविधा निर्माण करण्यासंबंधीचे प्रशिक्षण द्यावे लागेल. राज्यशासनाची कृषिविभाग व पंचायत राज प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेता येईल. त्या परिसरातील स्वयंसेवी संस्थांना राज्यशासन व ग्रामपंचायती यांचा समन्वय घडवून आणण्याचे कार्य करावे लागेल.

## २. आदिवासी शेतकऱ्यांचे प्रशिक्षण

फळझाडांची लागवड व मशागत यासंबंधीचे प्रशिक्षण कृषिविज्ञान केंद्रात आयोजित करावे लागेल. अशी कृषि-विज्ञान केंद्रे स्वयंसेवी संस्थांनी चालविली असून भारतीय कृषि अनुसंधान परिषद (Indian council of Agricultural Research) व महाराष्ट्रातील कृषी विद्यापिठे त्यांना सर्व तऱ्हेची मदत करतात.

## ३. आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण

आदिवासी भागात ज्या आश्रमशाळा आहेत त्या शाळांतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना कृषी व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन या दोन विषयांचे शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोसबाड येथील आदिवासी विद्यार्थ्यांचे आम्ही कायानुभव प्रकल्प सुरू केले होते. या प्रकल्पांत भाताची लागवड, फळझाडांची कलमे करणे, फळझाडे लावणे, सुधारलेली गवते लावणे, इंधन व इमारती झाडांची

लागवड करणे हे प्रकल्प अंतर्भूत करण्यात आले होते. 'काम करता करता शिका' हा या प्रकल्पांचा पाया होता. आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थीनींना या प्रकल्पांद्वारे कृषी व वने या क्षेत्रातील कौशल्य प्राप्त झाले व या कौशल्याचा त्यांनी आपल्या घरच्या शेतीवर उपयोग केला. अनेक विद्यार्थ्यांनी आंबा व चिक्कू कलमे आपल्या घरी नेऊन लावली. स्थानिक बोरीवर डोळे करून त्यांचे रूपांतर सुधारीत बोरीवर केले. भाताच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची लागवड केली. शिवण व साग यांसारखी इमारती झाडांची रोपे लावली. हा कार्यक्रम राबविण्यासाठी आश्रमशाळांतील शिक्षकांना प्रशिक्षित करावे लागतील व ही जबाबदारी कृषिविज्ञान केंद्रे किंवा कृषि विद्यापीठे यांना स्वीकारता येईल.

**४. प्रक्रिया उद्योग**

फळबागा लागवड केलेल्या क्षेत्रात आदिवासी महिलांना प्रक्रिया उद्योग सुरू करता येतील. आंबा व लिंबाची मुरंबे, आवळा सुपारी, चिक्कूच्या कापा, काथ्या उद्योग, या प्रक्रिया उद्योगाद्वारे आदिवासी महिलांना स्वयंरोजगार प्राप्त होईल. यासंबंधीचे प्रशिक्षण कृषिविज्ञान केंद्रे व कृषी विद्यापीठांत करावे लागेल.

अपुरे अन्न, कुपोषण व उत्पादक रोजगाराचा अभाव ही महाराष्ट्रातील आदिवासींच्या गरिबीचीच प्रमुख कारणे आहेत. त्यासाठी जलसंधारण, अधिक उत्पादन देणाऱ्या धान्य पिकांची लागवड व फलोत्पादन हे तीन कार्यक्रम जर प्रभावीपणे राबविले तर आदिवासींतील गरिबीचे निर्मूलन होण्यास मोठीच मदत होईल.

■■

---

## निवेदन

### वाचकांसाठी

*'**हाकारा' चे ऑक्टोबर-डिसेंबर २००१ व जानेवारी-मार्च २००२** हे दोन्ही अंक महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त मे २००१ मध्ये **'दिशा २००१ : आदिवासी व उपेक्षित समाज - अस्मिता व विकास'** विषयावर संपन्न झालेल्या अधिवेशनावर आधारित आहेत. या अधिवेशनातील काही मुख्य विषयांवर वक्त्यांनी व्यक्त केलेले विचार या अंकांमध्ये देण्यात येतील. विचारांचे संकलन चालू असल्याने अंक प्रसिद्धीस विलंब होत आहे. कृपया सहकार्य करावे ही विनंती.*

### लेखकांसाठी

*'हाकारा' साठी आदिवासी, ग्रामीण, भटक्या विमुक्त व दलितांच्या समस्या व जीनव - संस्कृतीवर आधारित विषयांवरचे लेखन जरूर पाठवावे. लेखन कथा, कविता, स्फूट लेखन स्वरूपात चालेल. शब्दसंखेची मर्यादा नाही. मात्र लेखन कागदाच्या एकाच बाजूने लिहिलेले व सुवाच्य अक्षरात असावे.*

*— संपादक*

# आदिवासी व आरोग्य

*आदिवासी माणसाला सहज उपलब्ध होऊ शकेल अशा आरोग्यावर परिणाम करणाऱ्या सेवा-सुविधांचा विचार व विकास आराखडा हा त्यांच्याबरोबर केलेल्या संवादातूनच पुढे आला पाहिजे म्हणजे त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन नवा आदिवासीभिमुख विकास आराखडा तयार करता येईल या विचारधारणेमुळेच हा विषय संमेलनात ठेवण्यात आला होता. डॉ. अभय शुक्ला यांनी डहाणू (जि. ठाणे) या भागातील आदिवासींमध्ये केलेल्या संशोधनावरून आदिवासींमध्ये आरोग्याचे नेमके प्रश्न काय आहेत व त्याची कारणे याची माहिती करून दिली, तर डॉ. अनंत फडके यांनी डहाणू व मावळ (जि. पुणे) येथील अभ्यासावरून काही निष्कर्ष मांडले.*

*डॉ. एन.एस.देवधर, डॉ. सु.ल.काटे व धैर्यशील शिरोळे यांनी आपापल्या अनुभवांचे कथन तसेच आदिवासींच्या आरोग्याची स्थिती सुधारण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपायांची माहिती करून दिली. डॉ. धैर्यशील शिरोळे यांनी गडचिरोलीतील आपल्या अभ्यासाचे नमुने स्लाईड शो मार्फत दाखवले. या विषयावरील झालेल्या चर्चेत जनार्दनमहाराज वळवी, डॉ. हेमंत आपटे, डॉ. कल्पना मुटाटकर, डॉ. मीरा सदगोपाल, डॉ. अमिता पित्रे व इतर काही प्रतिनिधींनी सहभाग घेतला. वेगवेगळ्या भागांतून आलेल्या कार्यकर्त्यांनी देखील आपापले विचार या चर्चेत मांडले.*

**आ**दिवासींच्या आरोग्याचा ज्यावेळेला आपण विचार करतो त्यावेळेला पहिल्यांदा आपण वर्तमानपत्रात एखादी बातमी वाचतो की, धुळे जिल्ह्यामध्ये, नंदुरबारजिल्ह्यामध्ये कुपोषणाने बळी गेले आहेत, तसेच अमरावतीमध्ये देखील कुपोषणाचे बळी गेलेले आहेत. आदिवासी आणि कुपोषण याची सांगड आपण वर्तमानपत्राच्या सहाय्याने इतकी घातलेली आहे की आदिवासी भागामध्ये कुपोषण हा सर्वात  मोठा प्रश्न आहे. वर्तमानपत्रात जरी दिलं असलं तरी ते खरं आहे. आणि शासन कुपोषणामुळे जे काही प्रयत्न करते आहे ते प्रयत्न फार तोकडे आहेत.

शासन काय करतं की, कुपोषणामुळे बळी होऊ नयेत याची खबरदारी घेते. त्यामुळे कुपोषणामुळे बळी झालेला मुलगा असेल तर त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायचं. त्याला तात्पुरती ट्रीटमेंट द्यायची. त्याच्या आई-वडिलांनाही ४० रू. द्यायचे. तिथे जेवण द्यायचे. त्यामुळे कुपोषणाचा बळी कमी होतो. सरकार त्यावर समाधान मानतं की या भागामध्ये कुपोषण बळी आता झालेला नाही! पण कुपोषण मात्र आहे. त्यामुळे आदिवासींच्यामध्ये कुपोषण, आयोडिनची आणि आयर्नची कमतरता, स्वच्छ आणि निरोगी पाण्याचा अभाव आणि आम्ही जे काम करतो त्याच्यामध्ये सिकलसेलसारखा डिसीजचा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे. दारू पिण्याचे प्रमाणही आदिवासी भागामध्ये फार मोठ्या प्रमाणात आहे. अशा तऱ्हेच्या अनेक समस्या आदिवासी भागामध्ये आहेत. गैरसमज आहे

आरोग्याबद्दल ते गैरसमज दूर करणारे कोणी तेथे नसतात. त्यामुळे आरोग्याच्या समस्या अनेक असून ती सोडविणारे मात्र बोटावरती मोजण्याइतकेच असतात. प्रामाणिकपणाने सोडविणारे तर बहुतेक नसतातच. तर ह्या आदिवासींच्या आरोग्याच्या समस्यांची आपण येथे चर्चा विचार, चर्चा करणार आहोत. जेवढ्या चांगल्या रीतीने चर्चा करता येईल तेवढी चर्चा करू आणि त्यापासून जे काही निष्पन्न होईल जे काही आपल्याला सांगता येईल, त्याचा विचार करू आणि त्यातून जेवढे काम करता येईल तेवढे काम करू.

**— डॉ. एस. एल. काटे**

# डॉ. अभय शुक्ला

'आदिवासींच्या आरोग्याचे प्रश्न' या विषयावर मुटाटकर सरांनी मला जेव्हा सांगितले, तेव्हा मला वाटलं की तज्ज्ञांसाठी मांडणी करावी की कार्यकर्त्यांसाठी मांडणी करावी. असा थोडासा माझ्या मनामध्ये प्रश्न होता. आणि मी ठरवलं, की जे कार्यकर्ते आहेत ते त्यांच्या त्यांच्या भागात जाऊन काम करणारे आहेत. आणि आरोग्याच्या प्रश्नावर काहीतरी करत आहेत. त्यांची पुढे काहीतरी करण्याची इच्छा आहे. त्यांच्यासाठीच मुख्यतः ही मांडणी असावी. आणि जे तज्ज्ञ आहेत ते त्यांच्या त्यांच्या पद्धतीने भर घालतीलच. याची सुरूवात वाहरू सोनावणे यांच्या एका कवितेपासून मी करणार आहे. बऱ्याच लोकांनीही कविता वाचली असेल.

*'रात्र कुजबुजत आहे, डोक्यापर्यंत ओढून झोपावं, आतल्या आत गुदमरायला होतं आणि तोंड उघडावं तर मच्छर चावतात, कोण मुलखाची ही अंधारी, चावरी रात्र'.*

आदिवासींच्या आरोग्याची परिस्थिती अशीच आहे. म्हणजे एका बाजूला पारंपरिक समाजामध्ये वंचित असण्याची एक परिस्थिती आणि त्याच्यापासून बाहेर पडण्याचा जर प्रयत्न केला तर एक विषम विकास, त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारे शोषण. आदिवासींचे जे आरोग्य आहे त्याच्याबद्दल आपण जर थोडेसे खोलात विचार करावयाचा असेल तर सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय जे वेगवेगळे घटक आहेत. त्यांच्यावर थोडीशी चर्चा करूनच आपल्याला त्याची व्याख्या करता येईल. एका बाजूला पूर्वीच्या समाजामध्ये एक प्रकारचं संतुलन होतं. म्हणजे समाजात सुद्धा संतुलन होतं आणि पर्यावरण, जंगल आणि पर्यावरण याच्याबरोबरही एक प्रकारचं संतुलन होत. ते संतुलन आता बिघडलेले आहे आणि एक प्रकारचा विषम विकास आपल्या संपूर्ण देशामध्ये चाललेला आहे. त्याचा विशेष करून आदिवासी समाजावर जास्त परिणाम झालेला आहे आणि त्यांच्या आरोग्यावर सुद्धा झालेला परिणाम आपल्याला दिसून येतो. तर एकंदरीत लक्षात ठेवून आणि आरोग्याची काय परिस्थिती आहे, आरोग्याला प्रभावित करणारे कोणकोणते कारक आहेत, यांची थोडक्यात मी मांडणी करणार आहे.

तर आदिवासी समाजाची आरोग्याची काय परिस्थिती आहे. आधी फक्त एक छोटासा आकडा सांगतो. भारतात आदिवासींची एकूण लोकसंख्या सरासरी ८ % आहे. पण भारतात हिवतापामुळे होणारे जे मृत्यूचे आहेत, त्यातले ६० % मृत्यू आदिवासींमध्ये होतात. म्हणजे जेवढे अपेक्षित आहे, त्याच्या ७ किंवा ८ पट मृत्यू आदिवासींमध्ये होतात. हिवतापामुळे होणाऱ्या मृत्युंचा वाटा आदिवासींच्याच नशिबी का? हा एक विचार करण्यासारखा मुद्दा आहे. महाराष्ट्रात जर आपण पाहिलं तर बालमृत्यू दर एकूण ६० % आहे, तर आदिवासी भागात ११० % बालमृत्यू होतात, म्हणजे १००० जन्मामागे पहिल्या वर्षी किती मुलं दगावतात? त्यांचं प्रमाण आदिवासी भागात जवळजवळ दुप्पट आहे आणि एकूण मृत्यूदर,

Truth Death Rate ज्याला म्हणतात, तो महाराष्ट्रात ८ असेल तर आदिवासी भागामध्ये १ ३, म्हणजे जवळ जवळ दीडपट आहे. बालमृत्यू दर आणि एकूण मृत्यूदर.

आणि तिसरं म्हणजे कमी वजनाचे नवजात बालक. (low Birth Rate Babys) ज्याला म्हणता येईल, त्याच प्रमाण २८ % आहे तर महाराष्ट्राच्या आदिवासी भागामध्ये ते ४० % आहे; जवळ जवळ दीडपट. म्हणजे यावरून आपल्याला असं दिसतं की आदिवासी भागामध्ये जे आरोग्याचे मापदंड आहेत त्यांची परिस्थिती अशी आहे. आपण विशेष काही आजारबद्दल अधिक खोलात गेलो तर परिस्थिती वाईटच दिसेल. आता आदिवासींमध्ये आरोग्य प्रश्न काय काय आहेत याचा विचार केला तर डॉ. काटे यांनी सांगितल्याप्रमाणे पहिल्यानंबरवर कुपोषणच घ्यावे लागेल. आणि कुपोषण पण वेगवेगळ्या प्रकारचे आहे. फक्त कुपोषणामुळे मृत्यू होणे हे त्याचे एक टोक आहे फक्त मुलांमध्येच नाही, तर प्रौढ माणसांमध्ये, विशेष करून बायांमध्ये सुद्धा त्याचं एक मोठं प्रमाण आहे. मात्र ते कधी पेपरमध्ये येत नाही, कधी वर्तमान पत्रात येत नाही. परंतु त्याचा लोकांच्या आयुष्यावर, अर्थव्यवस्थेवर फार मोठा परिणाम होतो, म्हणून आपल्याला त्याच्यावर थोडासा विचार करायला पाहिजे.

एकतर मुलांमध्ये कुपोषण आहे, त्याचं प्रमाण आदिवासींमध्ये ६० ते ७५ % आहे, ज्या वेगवेगळ्या पाहण्या केल्या त्यांच्यामध्ये हे आढळते आणि हे प्रमाण खूपच जास्त आहे. त्याचबरोबर बायांमध्ये रक्त पांढरी किंवा ॲनिमिया हा पण कुपोषणाचाच एक प्रकार आहे, पण याकडे आपण कुपोषण म्हणून लक्ष देत नाही. याचं प्रमाणही खूप जास्त आहे. आदिवासी भागांमध्ये ७० % ते ८० % बायांमध्ये रक्तपांढरी किंवा ॲनिमिया हा आजार आपल्याला आढळतो. आमच्या माहितीप्रमाणे आदिवासी भागामध्ये बायांचा हा एक मोठा आजार आहे आणि त्याच्यावर आपल्याला थोडासा विचार करण्याची गरज आहे.

दुसरा एक मोठा गट आहे दूषित पाण्यामुळे होणारे आजार. दरवर्षी पावसाळ्यात साथी येतात. जुलाबाची साथ येते, कधी कधी कॉलरा किंवा पटकीची साथ येते. आणि त्याबरोबर मोठ्या प्रमाणावर अमिबियासिस साथ मोठ्या प्रमाणावर येते, तेव्हा यांचे प्रमाण सुद्धा खूप जास्त आहे. आपल्याला असे दिसते की एवढी वर्षे हे आजार चालू आहेत पण त्याच्यावर अजून सुद्धा काही नीट नियंत्रण झालेले नाही. विशेष प्रयत्न झालेले नाहीत. फक्त विहिरीमध्ये TCL औषध टाकण्याचे वगैरे काही पण तरी प्रयत्न झालेत. आदिवासी भागात जेव्हा खरोखर आवणी चालू असते, तेव्हा ते काय फक्त विहिरीचंच पाणी पितात का? किंवा शेतावर जाऊन, त्यांच्या जंगलात जेथे प्लॉट असतात तेथेच जाऊन राहात असतात आणि तिथेच पाणी पितात. त्यामुळे मग त्या पाण्याची काय परिस्थिती असते आणि कोणते आजार होतात याचा विचार झालेला नाही.

अशाप्रकारे दूषित पाण्यामुळे होणारे आजार हा एक दुसरा मोठा गट आहे. तिसरा एक मोठा गट आहे हिवतापामुळे होणारे आजार. आधीच सांगितल्याप्रमाणे हिवतापावर काम करणारे जे तज्ज्ञ आहेत, त्यांनी काही इकॉलॉजिकल कॅटेगिरी केलेल्या आहेत. म्हणजे आदिवासी भागांमध्ये

होणारा हिवताप हा विशेष प्रकारचा हिवताप आहे. ती एक विशेष समस्या आहे आणि त्याच्यामध्ये दोन कारणे आहेत - एक म्हणजे स्थलांतर. आदिवासी गाव सोडून बाहेर काम करायला जातात, तेथे गेल्यावर त्यांना एकप्रकारची हिवतापाची लागण होते आणि दुसरं म्हणजे ते त्यांच्या भागात असतात तेथेच हिवताप पसरण्याची काही कारणे आहेत. त्यांच्यावर आपण नंतर येऊ. तर हिवताप हा एक तिसरा गट आहे.

आणि चौथा एक गट आहे,ज्याच्याकडे कोणी विशेष लक्ष दिलेले नाही आणि तो खूप महत्त्वाचा आहे, असं मला वाटतं. तर तो आहे, 'कामामुळे होणारे विशेष आजार/त्रास'. विशेषतः बाया जे शेतीमध्ये काम करतात ते. आवणीच्या वेळेस 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' च्या ज्या बाया आहेत त्यांचे रेकॉर्डस् पाहिले, की कोणकोणत्या आजारांवर त्या औषध उपचार करतात. त्यांच्यामध्ये ३ किंवा ४ नंबर असतो, अंगदुखी-कंबरदुखी आणि पाठदुखी. हे आपण विशेष मानत नाही. कारण का तर बायांना त्रास होतच असतात. असं म्हणून त्याकडे आपण दुर्लक्ष केलं तर आपल्याला नाही कळत. पण आपण थोडेसं खोलात जाऊन विचार केला की, एवढ्या आदिवासी बायांना अंगदुखी, कंबरदुखी आणि पाठदुखी का होतात? तर लक्षात येईल की हे आजार कामाशी संबंधित आहेत. म्हणून यावर आणखी थोडेसे खोलात जाऊन याचा विचार करायला पाहिजे.

विशेषकरून आवणीच्या वेळेस दिवसभर चिखलात, अगदी वाकून लावणी करतात. ज्या पद्धतीने त्या हे काम करतात, त्यामुळे अशाप्रकारचे त्रास होणे अगदी साहजिक आहे. मग याच्यावर आपल्याला काय विचार करता येईल? हा एक मोठा चौथा गट आहे. मी आता सगळ्या आजारांबद्दल खोलात जात नाही. मात्र अजून एक आजार दिसायला लागला आहे आणि तो म्हणजे लिंग सांसर्गिक आजार.

डहाणू भागात मुंबई- अहमदाबाद भागात हाय-वे आहे. त्या हाय-वे च्या दोन्ही बाजूला झोपडपट्ट्या आहेत. अशा काही काही ठिकाणी व गावांमध्ये आता हे आजार सुद्धा दिसायला लागले आहेत. १० वर्षांपूर्वी, १५ वर्षांपूर्वी हे आजार नव्हते. याची सुद्धा काही निवडक गावे आहेत. जेथे ट्रक ड्रायव्हर थांबतात, हाय-वे वर चालणारे ट्रक थांबतात, तेथे सुद्धा या आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे.आणि 'एड्स' सारख्या आजारांचे सुद्धा पहिल्यांदा थोडे-थोडे प्रमाण दिसायला लागले आहे.

१०-१५ वर्षांपूर्वी आदिवासी भागांमध्ये हे प्रमाण अजिबात नव्हते. आणि सहावा जो गट आहे, त्याच्या बद्दल डॉ. काटे विचार मांडणारच आहेत, ते आहेत अनुवंशिक आजार. सिकलसेल ॲनिमिया, आयर्न डेफिशियन्सी. तर हे काही मुख्य प्रश्न आहेत. याशिवाय टी.बी., लेप्रसी, इतर काही आजार आहेत. संपूर्ण देशात सुद्धा आहेत आणि आदिवासी भागांमध्ये सुद्धा आहेत. थोडे प्रमाण जास्तही आहे, काही-काही आदिवासी भागांमध्ये, त्याच्यामागची कारणं काय आहेत, त्यांचा तपशील मी मुख्यत्वे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. कारण आपण कारणांवर थोडंसं लक्ष दिलं पाहिजे. त्याच्यानंतर उपाय काय आहेत, त्याच्यावर आपण काहीतरी करू शकतो. तर कारणे पाच प्रकारची आहेत असे मला वाटते.

पहिले कारण सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती. दुसरे पर्यावरणीय कारण. ज्याला environmental & Ecological म्हणतो. Ecological साठी मराठीत नेमका शब्द काय आहे तो माहीत नाही. पण नुसतं पर्यावरण नाही. पर्यावरणाचं संतुलन बिघडल्यामुळे जे परिणाम होतात ते. तर हे दुसरं कारण असं आहे. तिसरे म्हणजे सांस्कृतिक Cultural Factors. चौथे म्हणजे आनुवंशिक कारण आणि पाचवं म्हणजे आरोग्य सेवेशी संबंधित जी काही कारणे असतील त्यासंबंधी डॉ. अनंत फडके मांडणारच आहेत.

शेवटची दोन कारणे आनुवंशिक आणि आरोग्य सेवा याच्याबद्दल मी काही मांडत नाही. पण पहिली जी ३ कारणे आहेत, त्याच्याबद्दल मी मांडणी करणार आहे. तर सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती हे सर्वात मोठं कारण आहे. तर पहिले आहे स्थलांतर व विस्थापन आणि आदिवासी भागांमध्ये हा जो एक कारक आहे, तो खूप महत्त्वाचा आहे.

स्वातंत्र्यापासून एकूण ५ कोटी लोक विस्थापित झालेले आहेत. हे प्रमाण खूप मोठं आहे, म्हणजे युरोपमधील ब्रिटन किंवा जर्मनीसारखे देश, एवढी मोठी लोकसंख्या विस्थापित झालेली आहे. आणि हे जे लोक विस्थापित झालेले आहेत, त्यापैकी ६० % लोक आदिवासी किंवा दलित आहेत. म्हणजे विस्थापनाचे जे ओझे आहे ते विशेष करून आदिवासींवर पडलेले आहे. आणि हे लक्षात ठेवूनच आपल्याला त्यांच्या आरोग्याकडे काही लक्ष देता येईल आणि समजेलही. दुसरं म्हणजे स्थलांतर. दरवर्षी आपल्या देशाचा ६ वा भाग म्हणजे जवळ जवळ १५ कोटी लोक स्थलांतरीत होतात. म्हणजे निम्मा युरोप दरवर्षी स्थलांतरीत होत असतो, असे म्हणता येईल. आदिवासी भागांमध्ये याचं प्रमाण खूपच जास्त आहे. दरवर्षी वर्षातले काही महिने ४-६-८ महिने हे लोक बाहेर कामासाठी जातात. आणि याचा त्यांच्या आरोग्यावर खूप परिणाम होतो. त्यात पहिला म्हणजे राहण्याची आणि कामाची जी परिस्थिती असते, ती बाहेर गेल्यानंतर खूपच वाईट असते, आणि धोकादायकही असते. काही आदिवासी बोटीवर जातात आणि तिथे मासेमारीचे काम करतात किंवा काही-काहीजण खाण कामगारांचे काम करतात.

एकंदरीत असंघटीत कामगार म्हणून ते बाहेर कामासाठी जातात आणि त्या परिस्थितीमध्ये जी कामाची परिस्थिती आणि राहण्याची परिस्थिती असते, या दोघांमुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो आणि अपघात होतात. राहण्याच्या परिस्थितीमध्ये आणि विशेष करून पाण्याची जी काही क्वॉलिटी असते पिण्याचं पाणी, खूप वेळा आम्हाला असं ऐकायला मिळतं की, बाहेर कामाला गेले की, तिथे गेल्यावर त्यांना जुलाब होतात आणि अगदी तरूण म्हणजे २०-२५ वर्षांचा तरूण तिकडे दगावतो. म्हणजे तेथे पाण्याची परिस्थिती खूपच वाईट असते. आणि बाहेर गेल्यावर त्यांचा जो काही पारंपरिक जो आहार आहे तो सोडून मिळेल ते खावे लागते. शिवाय आहाराचे प्रमाणही कमी असते.

जर ती व्यक्ती गावात असेल तर किमान ती घरी असते जेवायला. बाहेर गेल्यावर विशेष करून नीच कामगार असतात, जे बाहेर जातात त्यांना वेळेवर पेमेंट मिळाले नाही, तेव्हा तर अगदी उपासमारीची वेळ येते. तर पाणी आणि

आहार- हा एक दुसरा घटक आहे. तिसरं म्हणजे बाहेर गेल्यानंतर नवीन जंतुंशी आणि आजारांशी संपर्क येतो. आणि हे जे ॲपेडेमियॉलॉजिकली सुद्धा आपल्याला माहीत आहे की, आपल्या भागात राहणारी जी व्यक्ती आहे त्यांच्यात एक प्रकारची प्रतिकार शक्ती निर्माण होते आणि त्याच्याने काही असा मोठा आजार होत नाही. पण तीच व्यक्ती बाहेर गेल्यानंतर नवीन जंतुंशी संपर्क होतो. जसा हिवताप आहे. आपल्या भागामध्ये हिवतापाचे जे strains आहेत त्यांच्यासाठी एक प्रकारची resistance असते, पण बाहेर गेल्यानंतर नवीन strains शी संपर्क आल्यानंतर लवकर आजार होतो. जास्त गंभीर आजार होतो. आणि आपल्याला असं बऱ्याच वेळेला दिसतं की, ज्या भागात थोडा-फार हिवताप आहे त्या भागात राहणारे जे आदिवासी आहेत, त्यांना बाहेर गेल्यानंतर परत हिवताप होतो. पण वेगळ्या प्रकारचा हिवताप होतो. फॅल्सीपेरम मलेरिया होतो.

तिसरं म्हणजे प्रवासामध्ये अपघात होतात. ज्या पद्धत्तीने ते प्रवास करतात त्या प्रवासांमध्ये किती प्रकारचे ताण आणि किती प्रकारचे धोके होतात आणि त्याशिवाय अपघात सुध्दा होतात. त्याचा सुद्धा परिणाम आरोग्यावर होतो. जिथे बांधकाम चालू असते तेथे पाणी साचलेले असते. बांधकामासाठी पाणी लागतंच आणि त्याच्यामध्ये डास वाढतात. हे अगदी म्हणजे निश्चित आहे, की बाहेर गेल्यानंतर डासांमुळे होणाऱ्या आजारांचं प्रमाण खूपच जास्त असतं. मलेरिया त्यापैकी आपल्याला सर्वात जास्त माहिती आहे.पण त्याशिवाय फैलेरिया, डेंग्यू हे सुद्धा डासांमुळे होणारे आजार आहेत. तर हे झालं स्थलांतर आणि विस्थापन यांमुळे होणारे परिणाम.

आणि दुसरं म्हणजे जंगल आणि पारंपरिक शेती याच्यापासून आदिवासी दुरावले जातात, त्याचा वेगवेगळ्या पद्धतीने त्यांच्या आरोग्यावर परिणाम्म होतो. हे आपल्याला माहीत आहे की, आदिवासींचा जंगलावर जो काही पारंपरिक हक्क होता तो खूपच कमी झालेला आहे. फॉरेस्ट डिपार्टमेंट आणि एकंदरीत सरकारची जी काही धोरणं आहेत त्यामुळे जंगलातून मिळणारी वेगवेगळी प्रकारची संसाधने आदिवासींना मिळत होती, ती मिळण्यामध्ये खूप अडचण निर्माण झाली. एका बाजूला जंगलावर हक्क कमी होतोय, तर दुसऱ्या बाजूला जमिनीची उपलब्धता सुद्धा कमी होत आहे. त्याच्यामध्येही वेगवेगळी कारणे आहेत. पहिले म्हणजे लोकसंख्या वाढते आहे आणि जमिनीवरला दबाव वाढतो आहे. त्याचबरोबर बाहेरचे उद्योग येताहेत. सावकार आणि कर्जदार यांच्यामध्ये संपूर्ण एक सायकल तयार होते आहे. हे सगळं झाल्यानंतर आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होतो आणि जमिनीची उपलब्धता कमी झाली की मग त्यांना बाहेर जाऊन काम करावंच लागतं.

बाहेर स्थानिक जमिनीवर आणि जंगलावर हक्क कमी झाले, म्हणून त्यांना बाहेर जावं लागतं. बाहेर गेल्यावर त्यांना स्थानिक शेतीवर व अर्थव्यवस्थेवर लक्ष देता येत नाही. त्यामुळे त्यांची परिस्थिती आणखी खालावते आणि याचा आरोग्यावर थेट परिणाम होतो. याच्यामध्ये जंगल नष्ट होत आहेत, जंगलावर आदिवासींचा हक्क कमी होत आहे, त्याचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. मी आता पर्यावरणीय जी कारणे आहेत

ती मांडणार आहे. तर पहिलं झालं सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर परिणाम.

पण एकंदरीत जर आपल्याला कुपोषण याचे जर कारण बघायचे असेल तर जी सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती यांच्यामध्ये जी काही परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यामध्ये एका बाजूला जंगल आणि पारंपरिक शेती यापासून आदिवासी दुरावले जातात आणि दुसऱ्या बाजूला ते जेव्हा बाहेर जातात, स्थलांतर होतात किंवा त्यांचं विस्थापन होतं तेव्हा तेथे असंघटित कामगार म्हणून त्यांचे शोषण होत असते. या एकंदरीत साखळी मध्येच आपल्याला कुपोषणाची कारणं दिसतात. त्यानंतर दुसरा गट आहे पर्यावरणीय कारण. पर्यावरणीय जे संतुलन आहे त्याच्यामध्ये बिघाड झाल्यामुळे आरोग्यावर होणारे परिणाम. आणि त्याच्यामध्ये 'जंगल नष्ट होणे' या विषयावर मी थोडे जास्त लक्ष देणार आहे. तर जंगल जेव्हा नष्ट होते, तेव्हा काय परिणाम होतात? तर एक परिणाम असा होतो की, नवीन आजारांशी संपर्क येतो. कारण जंगलांमध्ये वेगवेगळे प्राणी असतात. वेगवेगळ्या प्रकारचे डास आणि किटक सुद्धा असतात. ज्या जंगलामध्ये जास्त काही संपर्क नव्हता, जंगल कमी होतं, तेव्हा झाडतोड होऊन आतल्या भागांमध्ये लोक शिरले. जंगलांमधील माकडांमध्ये होणारा एक आजार आहे. जेव्हा जंगलतोड झाली आणि आदिवासी आत जंगलामध्ये गेले, तेथे या नवीन आजाराशी त्यांचा संपर्क आला आणि त्याच्यामुळे लोक आजारी पडायला लागले. तर ह्या आजाराला आपण ओळखतो.

पण ह्याच पद्धतीने जगभर वेगवेगळे नवीन आजार निर्माण होतात. त्यांच्यामध्ये अॅबोला, लासाफिव्हर अशाप्रकारचे आफ्रिकेमध्ये सुद्धा होणारे आजार आहेत. आपल्याला असं दिसतं की, - जंगलतोड झाल्यानंतर जंगलात आत जेव्हा आदिवासी शिरतात तेव्हा त्यांना नवीन प्रकारचे आजार होतात. कारण नवीन जंतुंशी त्यांचा संपर्क होतो आणि म्हणून नवीन आजार निर्माण होतात. या आजारांना आपण ओळखतो. इतर सुद्धा काही आजार असू शकतात. तेव्हा हा एक धोका आहे, जंगल नष्ट होण्यामागे.

दुसरं म्हणजे जेव्हा जंगलं नष्ट होतात तेव्हा आहाराची विविधता कमी होते. कारण कंदमुळे, फळे, लहान सहान प्राणी हा एक आहाराचा महत्त्वाचा भाग आहे. तर यात आपल्याला दिसतं की आहारामध्ये प्रमाण महत्त्वाचं आहे, पण विविधता सुद्धा तेवढीच महत्त्वाची आहे. आणि विशेष करून जीवनसत्त्वं आणि खनिजे (vitamin & minerals). नुसतं तादूळ आणि डाळ असेल तर आपल्याला सगळी vitamins मिळतील असं नाही. आणि जंगलातून आहारांची विविधता ही आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. ती जंगल नष्ट झाल्यामुळे कमी होते. तिसरं म्हणजे प्राण्यांचे हल्ले. ज्या ज्या भागांमध्ये काम करतो उदा. डहाणू भागामध्ये चित्ते आणि बडवानी भागामध्ये अस्वल. म्हणजे हे प्राणी जंगल नष्ट झाल्यामुळे विस्थापित होतात आणि त्यामुळे ते माणसावंर हल्ला करतात. आणि हा पण एक आरोग्याचा नवीन प्रश्न निर्माण होतो. त्याच्यानंतर बायांवर होणारा ताण म्हणजे सरपण आणायला जातात तेव्हा. जेव्हा अगदी घराजवळ जंगल होतं तेव्हा सरपणासाठी लाकूड वगैरे आणायला दूर जावं लागायचं नाही. पण

आता जंगल नष्ट झाले आहे.

आता बायांना २-२, ३-३ किलोमीटर अंतर चालत जावे लागते आणि लाकूड आणावे लागते. त्याचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे पाठदुखी, कंबरदुखी वगैरे प्रकारचे त्रास होतात. आणि शेवटचा मुद्दा म्हणजे जमिनीची उत्पादकता कमी होते. जंगल नष्ट झाल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होते. आणि त्यामुळे कुपोषणाचे परत एक चक्र निर्माण होते. हा तिसरा एक गट आहे पर्यावरणीय कारणांचा. आणि शेवटचा एक गट आहे सांस्कृतिक कारणे. त्याचं फक्त उदाहरण म्हणून मी दोन उदाहरणे सांगणार आहे.

पहिले उदाहरण आहे हिंदुत्वकरण. याची आदिवासी भागामध्ये नवीन प्रक्रिया चालू झाली आहे. डहाणू भागामध्ये आम्हाला माळकरी दिसतात. ते बाहेरून येतात आणि लोकांना माळकरी बनवतात आणि लोकांना सांगतात 'आता तुम्ही मांस मच्छी खाऊ नका. ते वाईट आहे'. ज्यांच्या आहारांमध्ये प्रोटीनचे मोठे जे स्त्रोत आहे ते मासे आहेत. कमीत कमी डहाणू भागामध्ये व इतर अनेक भागामध्येही असेल. आणि तुम्ही त्यांना सांगितलं की 'मासे खाऊ नका' तर त्यांना कोठून प्रोटीन मिळणार? आता थोडा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. तर ही जी हिंदुत्वीकरणाची नवीन प्रक्रिया चालू झाली आहे किंवा बडवाणी भागामध्ये गायत्री परिवार नावाची संस्था आहे. विशेष करून ते बायांना सांगतात 'तुम्ही विटाळ पाळला पाहिजे. हे काही स्वच्छ नाही. ज्या पद्धतीने ज्या वेळेला मासिक पाळी असेल त्यावेळी तिने स्वयंपाक करू नये, पाणी भरू नये, घरात पाणी देवू नये' ही एक नवीन पद्धत जी आतापर्यंत नव्हती, ती आता निर्माण करतात. जिच्यामुळे पुरूष प्रधानता पद्धत निर्माण होते. आता ही जी हिंदुत्वीकरणाची प्रक्रिया आहे, तिचा आरोग्यावर काय परिणाम होतो.

एक जो आम्हाला स्पष्ट दिसतो की, त्यांच्या आहारामध्ये जे मांसाहारी घटक आहेत ते कमी होऊन त्यातून निश्चितपणे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. आणि दुसरं म्हणजे जेव्हा पारंपरिक प्रथांवर आधुनिकतेचा प्रभाव होतो तेव्हा विचित्र परिस्थिती तयार होते. त्याच्यामध्ये दारूचे उदाहरण मुख्य आहे. तर पारंपरिक जी काही परिस्थिती होती की, सणांच्या वेळेस, लग्नाच्या वेळेस दारू पिण्याची प्रथा होती. त्या समाजामध्ये, त्यांच्या जीवनांमध्ये दारूला एक स्थान होते आणि त्याबरोबर त्यांच्यावर काही बंधने सुद्धा होती की, आवणीच्या वेळेस दारू अजिबात प्यायची नाही. आणि लोक ते पाळत होते. ती जी पारंपरिक पद्धती होती, आता आधुनिक पद्धतीचा आदिवासी जीवनावर प्रभाव झाला आणि बाजारीकरण झालं.

दारूच्या धंद्यात मोठ्या प्रमाणावर बाहेरची दारू आणि गाळलेली दारू आदिवासी भागांमध्ये येऊ लागली. डहाणू भागात रेशनच्या दुकानात रॉकेल किंवा मीठ घ्यायला गेलात तर काळा गूळ घ्यावाच लागतो, नाहीतर दुसरं काही देणार नाही दुकानदार. काळा गूळ आणि बाहेरची दारू यांचे बाजारीकरण झाल्यानंतर दारूच्या परिस्थितीमध्ये संपूर्ण बदल झालेला दिसतो. त्यामुळे गाळलेल्या दारूचे प्रमाण आदिवासी भागामध्ये वाढलेले दिसते आणि त्याचा आरोग्यावर सरळ परिणाम झालेला दिसतो. तर ही काही कारणे आहेत, ज्यांचा आदिवासींच्या आरोग्यावर आपल्याला परिणाम

झालेला दिसतो. यानंतर याच्यावर पर्याय काय आहेत किंवा पुढची दिशा काय आहे; याची मांडणी माझे सहकारी डॉ. अनंत फडके करणार आहेत, पण फक्त थोडसं मला म्हणायचं आहे की, आदिवासी भागांमध्ये जी पारंपरिक सामूहिकता आहे, ती त्यांची खूप मोठी ताकद आहे आणि त्यापासूनच नवीन चळवळीची दिशा निर्माण होण्याची शक्यता आहे. आरोग्यासाठीची चळवळ आहे त्याच्या संदर्भात आदिवासी भागात नवीन दिशा निर्माण होत आहे. बहुतेक संपूर्ण देशाला आदिवासी भागच आणि आदिवासी समाज आरोग्याची चळवळ कशी असावी याची दिशा देऊ शकतो, याबद्दल आम्हाला आशा आहे.

## डॉ. देवधर

आदिवासींचं आरोग्य एक म्हणजे परिसर आणि दुसरं पोषण आणि तिसरं म्हणजे राहण्याची पद्धती या तीन पद्धतींवर अवलंबून असते. आणखीन आपण जे आदिवासींचे आरोग्य म्हणतो त्यात थोडीशी चूक करतो. कित्येक वेळेला आपण म्हणतो की, आदिवासी आपल्यापेक्षा वेगळे आहेत. ही जी भावना आहे त्यातून हे शब्द तयार होतात.

आपण जर पाहिलं आपल्या देशात की, आदिवासी शिवाय असे अनेक लोक आहेत जे वंचित, उपेक्षित आहेत गरीब आहेत. ते दुर्गम भागात राहतात. त्यांची आणि आदिवासींची परिस्थिती एकच आहे. तेव्हा आपण जर आदिवासींच्या आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक केला नाही तर आपण विशेष काही करू शकणार नाही. पुढे याच्यावर चर्चा होईलच, त्यामुळे याची पार्श्वभूमी तुम्हाला माहिती पाहिजे म्हणून सांगितल्यानंतर आपण पुढे त्याच्यावर चर्चा करणार आहोत.

**डॉ.काटे** - डॉ. देवधरांनी सांगितले की आदिवासींसारखीच इतर काही लोकांची परिस्थिती आहे. पण मला वाटतं की, आदिवासींच्या जंगल तोडीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या या इतरांच्या असू शकत नाही.

## डॉ. अनंत फडके

आरोग्य सेवेचे खरेतर तीन भाग म्हणता येतील. एकतर आदिवासी समाजाने स्वत:साठी शेकडो वर्षांपासून केलेली जी काही आरोग्य सेवेची परिस्थिती आहे, त्याच्यामध्ये काय प्रश्न आहेत, असा एक भाग आहे. सरकारी आरोग्य सेवेचा काय भाग आहे आणि खाजगी आरोग्यसेवा ज्या पद्धतीने, ज्या प्रमाणात पोचलेली आहे, त्याच्याबद्दलची सुधारणा असा एक भाग. एक बरोबर आहे, डॉ. देवधरसर म्हटल्याप्रमाणे की, बरेचसे प्रश्न आदिवासी समाजाचे आहेत, हे डोंगराळ भागांमध्ये राहणारे लोक आहेत, त्यांचे व आदिवासींचे प्रश्न सारखेच आहेत.

मी केवळ आदिवासींसाठी मांडणार नाही. दोघांच्याही प्रश्नांत खूपच साम्य आहे. काही बाबतीत आदिवासींचे प्रश्न थोडे वेगळे आहेत. वर्णन करताना त्यातले जे मुद्दे आहेत ते बरेचसे इतर समाजातल्या दूरस्थ दृष्टीने डोंगराळ भागातले, अविकसित भागतले प्रश्न हे सर्वसाधारण आहेत. आदिवासींच्या संदर्भात काही २-३ महत्त्वाच्या गोष्टी वेगळ्या आहेत. आरोग्य सेवेबद्दल मी बोलत

नाही. पर्यावरणीय विनाश झाल्यामुळे वेगळ्या प्रकारचा परिणाम आदिवासींमध्ये दिसून येतो, हे मांडलेलंच आहे; परंतु सेवेबद्दल जर आपण बघितलं तर पहिली गोष्ट म्हणजे आदिवासी समाजाने स्वत:साठी जी काही आरोग्य सेवा पारंपरिक पद्धतीने विकसित केली होती, ती खूप कमी झालेली आहे. ती विलयाला गेली आहे. त्यामुळे एक चांगलं आहे की आज इतर भागांच्या मानाने आदिवासींचे 'झाडपाल्याचे औषधं' याची परंपरा अधिक जास्त मूळ धरून राहिलेली आहे. परंतु पूर्वीच्या मानाने ती आता खूप कमी झालेली आहे. त्यामुळे मला वाटते की, अजून २५-५० वर्षे गेली की, इतर वरचे प्रदेश आणि आदिवासी प्रदेश यांच्यामधील जो पारंपरिक ज्ञानाचा साठा आहे, तो सुद्धा निघून जायचा. त्याचबरोबर आदिवासी परंपरेमध्ये सगळ्याच गोष्टी चांगल्या आहेत असे काही मान्य नाही आणि त्याच्यामध्ये आधुनिकपणा व इतर पद्धतींचा दुष्परिणाम झालेला आहे.

त्याचं एक उदाहरण म्हणजे भूताळे. आपल्या काही लोकांना माहीत असेल की, आदिवासी समाजामध्ये काही भागामध्ये एखाद्या बाईला भूताळी ठरवून तिला छळायचं, तिला मारायचं. त्याच्यामागे एक कारण होतं की, ती लोकांना दवापाणी देते. लोकांना दवापाणी देणे ही पुरूषांची मक्तेदारी आहे. अशा पद्धतीने मी बऱ्याच ठिकाणी बघितलं. परंतु हे सगळ्या ठिकाणी समान नाही, पण काही भागांमध्ये आहे. आणि त्याच्यामुळे जी काही गावांमध्ये वाईट गोष्ट घडेल ती त्या आदिवासी बाईच्या नावावर लादायची आणि चक्क तिला छळायचं आणि मारायचं सुद्धा. अशा सुद्धा केसेस झालेल्या आहेत. आदिवासी परंपरेत ज्या चाकोरीतून जाणाऱ्या गोष्टी आहेत, त्या तिथल्या आहेत, त्या पुढे न्यायला पाहिजेत; परंतु ते करत असताना त्यातल्या नकारात्मक बाबी आहेत त्याच्याबद्दलही विचार करायला पाहिजे की, एकंदर हिंदू समाजापेक्षा आदिवासी समाजामध्ये स्त्री-पुरूषांमध्ये समानता जास्त असली तरीसुद्धा आज परिस्थिती अशी आहे की, शेवटी ती उतरंड आहेच आणि ती उतरंड तशीच चालू ठेवून आपल्याला आरोग्य सेवेची सुधारणा नाही करता येणार.

आता उदाहरणार्थ, आम्ही गेली काही वर्षे जे काही काम करतोय त्यामध्ये फक्त आदिवासी स्त्रियांनाच निवडून आरोग्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना आरोग्य कार्यकर्ती म्हणून करायचं, पुरूषांना नाही, असे वेगवेगळ्या कारणांसाठी संघटनेने निर्णय घेतला, आम्ही निर्णय घेतला. त्याच्यामध्ये बऱ्यापैकी आम्हाला विरोध झाला. आज असेल किंवा परंपरेने असेल स्त्री-पुरूष समानता तिथे देखील जोरदार आहे. आणि कुठल्याही प्रकारची आरोग्य सेवा सुधारायची असेल आणि पारंपरिक ज्ञानाचा जो साठा आहे, जो काही कमी झालेला आहे त्याच्याबद्दल स्त्रियांनी काही जास्त माहिती घेणं आणि ते वापरणं असा विषय मांडला व त्या दृष्टीने प्रयत्न केला तर त्याला बऱ्यापैकी विरोध होतो.

याबाबत मला दोन मुद्दे मांडायचे आहेत. जे पारंपरिक ज्ञान आहे ते विलयाला चालले आहे. ते जतन करून पुढे न्यायचे म्हटलं तर त्याच्यामध्ये पहिल्यापासून जी उतरंड आहे त्या उतरंडीचा एक अडथळा निर्माण होतो. आणि

दुसरं म्हणजे कुठल्याही व्यावसायिक पद्धतीवर एक वलय असतं. आणि ती माहिती जर आपण दुसऱ्याला सांगितली तर ती नष्ट होईल, अशा प्रकारच्या समजुती असतात. त्याच्यामागे कारणं असतात. ही माहिती घेऊन आपल्यावर कोणी राज्य करतील ही कल्पना असेल. शेवटी असं आहे की आधुनिक जगामध्ये ज्ञान हे सर्वांना खुलं असलं पाहिजे असं आपण म्हणतो, पण त्या पद्धतीने ती माहिती आज खुली नाही. मध्यंतरी आम्ही भगतांबरोबर शिबीर घेतलं होतं. त्याच्यामध्ये मग आमच्याच मधल्या एक डॉ. मारी डिसोझा म्हणून आदिवासी भागामध्ये काम केलेल्या होत्या. त्यांच्याबरोबर काम करणारे आदिवासी कार्यकर्ते ह्या सगळ्यांना घेऊन त्यांचे कुठेतरी एक स्थान निर्माण केल्यानंतरच त्या भगतांबरोबरच संवाद होऊ शकला. मी, आणि डॉ. अभय शुक्ला आम्ही गेलो होतो तर आम्हाला कोणी विचारलं नाही. मला एवढंच म्हणायचं की, जर सुधारणा करायची असेल तर पुढे जे काही गुप्ततेचं वलय आहे ते वलय कसं फोडायचं याच्याबद्दल आपल्याला विचार केला पाहिजे.

हा एक पहिला भाग सांगावासा वाटतो की, पारंपरिक ज्ञानाचा वापर व्हायला पाहिजे. ते जतन केले पाहिजे. त्याच्यामध्ये काय चांगलं आहे, कितपत उपयोगी आहे याचं प्राथमिक पातळीवर संशोधन व्हायला पाहिजे. आणि त्याच्यामध्ये हा गुप्ततेचा प्रश्न आणि स्त्री-पुरूषांमधली असमानता हे दोन प्रश्न आम्हाला तरी महत्त्वाचे वाटतात. मग तुम्हाला काय स्वतःला अनुभव असेल तर चर्चेमध्ये बोलता येईल. दुसरा जो एक आरोग्य सेवेबद्दलचा भाग आहे, मुळामध्ये ती उपलब्धच नाहीये. म्हणजे पारंपरिक सेवा पण त्याबद्दल काहीच उपलब्ध नाही.

आपल्याला माहीत आहे की आदिवासी कुठे लांब लांब वसतात. त्यांच्यामध्ये खूप अंतर असतात. त्यामुळे जग सगळं तुटल जातं. आपण मागास ग्रामीण भागामध्ये म्हणतो त्याच्यापेक्षा अधिक बिकट परिस्थिती आदिवासी भागामध्ये आहे हे मी वेगळं सांगण्याची गरज नाही. हे जर काही तोडायचं असेल तर उदाहरणार्थ, आपण सरकारी योजनांचा एक जर भाग घेतला. सरकारने आरोग्य सेवेबद्दल काही निकष ठरवले असतील, ते थोडेबहुत बदललेले आहेत, म्हणजे ३० हजार लोकसंख्येमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र असं जर काही असेल तर ते आता बदललेले आहे. ते आता २० हजार लोक संख्येमध्ये, १० हजारमध्ये अशी तयारी दाखवली आहे. तर मुळामध्ये आपण असे किती नियम ठेवले तरी प्रत्यक्ष डॉक्टर तेथे राहात नाहीत. शनिवार -रविवार तर नसतातच. त्यामुळे बाहेरून येणारा डॉक्टर किंवा कर्मचारी यांच्यामध्ये खूप काम करणारे, प्रामाणिकपणे काम करणारे असे ५-१० ते १५-२० टक्केच असतात.

पण शहरात वाढलेला, हिंदू समाजात वाढलेला, वरच्या जातीतून आलेला किंवा अगदी मध्यम वर्गातून आलेला ही सर्व मंडळी येऊन तिथे राहतील आणि आरोग्य सेवा देतील, हे काही एकंदर होत नाही. म्हणजे काळ्या पाण्याचीच शिक्षा असल्यासारखे लोक आपली बदली किंवा वेळ तिथे खेटे घालतच असतो. शनिवार-रविवार आपल्या घरी जातच असतो. त्यांची बायका-पोरं, त्यांचं शिक्षण वगैरे काहीही कारणे असतात. मला असं सांगायचं नाही की हे लोक हरामखोर

आहेत. पण प्रश्न असा आहे की शेवटी व्यवहारामध्ये ही डॉक्टर मंडळी तिथे काही राहणार नाहीत. तुम्ही कितीही सक्ती करा हे प्रमाण काही वाढणार नाही. मुळामध्ये ही मंडळी तिथे नसतातच.

हीच गोष्ट मोठ्या प्रमाणावर तिथल्या आरोग्य सेवकांमध्ये सुद्धा आहे. आरोग्य सेवकाने आरोग्य केंद्रात राहिले पाहिजे. उपकेंद्रात नर्सने राहायला पाहिजे अशी कल्पना आहे. पण उपकेंद्रात नर्सेस राहात नाहीत. त्यांचे काही प्रश्न असतील. त्यांना सुरक्षित वाटतं, नाही वाटत. अमूक तमूक त्यांचे नवरे असतील. तिकडे त्यांना जावे लागत असेल. शेवटी वस्तुस्थिती अशी आहे की तेथे कोणीही राहतच नाही. अर्थात आमच्या ग्रामीण भागात अशीच परिस्थिती आहे. आमच्या मावळात उपकेंद्रामध्ये कोणी राहात नाही. मुळात उपकेंद्राची वास्तूच नाही. या ५०-६० टक्के केंद्रात इमारतच नाही. खोलीसुद्धा नाही. तर नर्स राहणार कोठे? असा प्रश्न आहे. आणि आदिवासी भागात याच्यापेक्षाही वाईट परिस्थिती आहे, हा एक भाग आहे.

दूरस्थ भाग असल्याबरोबर ग्रामीण भाग असल्यामुळे, आदिवासी - बिगर आदिवासींमध्ये एक प्रकारची सांस्कृतिक दरी आहे आणि बाहेरून तिथे जाणारे हिंदू समाजातले असतात. स्वतःला मोठे समजणारे असतात. त्यांना म्हणजे कोठेतरी जंगलात आणून टाकल्यासारखे वाटते. या अडाणी लोकांत रहायचे म्हणजे अगदी जीवावर आल्यासारखे वाटते. अशी सुद्धा एक दरी आहे. हा मागासलेला भाग आहे, येथे कोणतीही सोय नाही. वीज नाही, पाणी नाही, एवढाच भाग नाही तर आदिवासींकडे बघण्याचा जो दृष्टिकोन आहे, शिकलेल्या-सवरलेल्या हिंदुसमाजाचा आहे, त्याच्यामध्ये सुद्धा हा प्रश्न आहे. ह्या दोन्ही कारणांमुळे तेथे फारसं कोणी राहात नाही.

मी जे काही फिरस्ती मंडळी म्हणतो त्यांना अंतरे खूप मोठी आहेत की, नाही त्यांना जमत. म्हणजे शनिवार- रविवार राहावं अशी कल्पना असते. प्रत्येक नर्सना वाडे आणि वस्त्या वाटून दिलेल्या असतात. पण त्या तेथे फारशा पोहोचू शकत नाही. कारण अंतरंही खूप आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारची साधनेही नसतात. आणि ज्याला म्हणतात की एक प्रामाणिकपणा आणि मोटिव्हेशन हे वर पासून खालपर्यंत खूप मर्यादीत आहे. त्यामुळे वरचे डॉक्टर जर चांगले असतील, खूप तळमळीचे असतील आणि ते तेथे राहणारे असतील तर नर्सेस आणि कर्मचारी सुद्धा राहतात. काहीतरी करतात सुद्धा. आमचा तर अनुभव सुद्धा असा आहे की, तसे मध्यम पातळीवरचे कर्मचारी जास्त प्रामाणिकपणे काम करतात. कारण त्यांना लोकांसमोर रोज ऊठ-बस करावी लागते. आणि लक्षात येते की माणसं सुद्धा चांगली आहेत.

आमच्या नर्सेस म्हणतात की, आमच्यापेक्षाही या आदिवासी महिलांमध्ये जास्त चांगले गुण आहेत, एकदा झापड काढून त्या समाजाची ओळख झाली तर जो काही माणूस म्हणून समाजाचं काम करील त्याला त्याचे महत्त्व कळतं. त्यामुळे डॉक्टरांचा वरून बघण्याचा दृष्टिकोन असतो, तुच्छतेचा दृष्टिकोन असतो. विशेषतः हे नवीन आहे. २-२ वर्षासाठी आलेले आहे. काळ्यापाण्याची शिक्षा आहे. असं म्हणणाऱ्यांपेक्षा ज्यांनी १०-१० वर्षे तिथे काम केले त्या वर्कर्स,

स्त्रियांचा अनुभव त्यापेक्षा बरा आहे. आदिवासी भागामध्ये हिंडण-फिरणं ही गोष्ट बाहेरून आलेल्या माणसाला अवघड आहे.

सरकारी आरोग्य सेवेमध्ये काही गोष्टी (नियम) लिहिलेल्या असतात; परंतु त्याप्रमाणे काम होईलच असे नाही. नर्सला अमूक तारखेला तमूक ठिकाणी जायचंय असं लिहिलेलं असतं म्हणजे ती जाईलच असे नाही. त्यांच्याजवळ जी औषध दिली जातात त्यात ४-६ गोळ्या दिलेल्या असतात. एक तापाची अमूकतमूक पिवळी गोळी असं. म्हणजे फारच तुटपुंजं अस म्हणता येईल अशा स्वरूपाचे ज्ञान असते. अगदीच जो औषधाचा साठा दिलेला असतो, तोही नाममात्र औषधपाणी दिले जाते. आपल्याला माहीत आहे की सरकारी योजनेत मुख्यतः दोनच चांगल्या गोष्टी चालतात. त्यात केवळ आदिवासी भागामध्ये नाही तर इतर मागास भागामध्येही लसीकरणाचे काम व्यवस्थित केले जाते. लसीकरणाचे सत्र होणार म्हणजे होणारच.

निदान मावळासारख्या मागास भागामध्ये लसीकरणाचे काम होतेच, पण आदिवासी भागामध्ये तेही होत नाही. मुख्य म्हणजे गावांमध्ये वाड्या खूप लांब असतात. त्यांची कल्पना असते की वाड्यांवरच्या लोकांनी खाली यावं. ते लोकांना शक्य नसते. परंतु आता खूप सुधारणा झालेली आहे. आणि दुसरं कुटुंब नियोजनाचे काम झालेलं दिसतं. या दोन गोष्टी सोडल्या तर बाकी काही काम फारसं झालेलं दिसत नाही. आणि त्याच्यामुळे जे इतर भागामध्ये आपल्याला बघायला मिळावे, तेच सर्वात जास्त इथं बघायला मिळतं. स्त्री आरोग्य सेवकांची तीच कथा आहे. ज्यांना मल्टीपर्पज वर्कर म्हणतात, त्यांचा आदिवासी लोकांना फारच कमी उपयोग होतो. त्यांच्याकडे फारशी औषधंही दिली जात नाहीत. आम्ही जर नर्सेसला सांगितलं की, गरोदर नसलेल्या बायांना लोहाच्या गोळ्या द्या. रक्तपांढरीचा मोठ्या प्रमाणावर प्रश्न आहे. अक्षरशः लोहाची गोळी ४ पैशाला एक मिळते, जर लाखाच्या भावात घेतली तर तेवढं सुद्धा होत नाही. पण फक्त गरोदर बायांनाच गोळ्या द्यायच्या. गरोदर नसलेली; परंतु रक्तपांढरीच्या बाईला गोळी द्यायची नाही.

खरंतर त्यांच्याकडे काही नसतंच. त्यांचा डबा उघडून बघितला तर बऱ्याचशा गोष्टी नसतात सुद्धा. अनेक जण गावामध्ये त्या गोळ्या देऊन टाकतात. मग त्या कोणी काय वापरायच्या, कशा वापरायच्या याचा फारसा पत्ता राहात नाही. त्याच्यामुळे शेवटी व्यवहारामध्ये कुठल्याही चांगल्या प्रकारची आरोग्य सेवा आदिवासी भागामध्ये मिळू शकत नाही. गावापासून आपण जरा वर आलो तर प्राथमिक आरोग्य केंद्राची परिस्थिती सुद्धा सगळ्या ठिकाणी तीच आहे. त्याच प्रकारची परिस्थिती आदिवासी भागामध्ये आहे.

डॉक्टर राहात नाहीत. औषधांचा पुरवठा अतिशय कमी असतो. आणि त्यामुळे लोक सुद्धा कुत्रा चावला, साप चावला, मारामारी झाली, सर्टिफिकेट पाहिजे अशा चार पाच गोष्टी साठी लोकं तेथे जातात. काही ठिकाणी अगदी चांगली केंद्रे आहेत. उदा. जव्हारला डॉ. शिंदे यांचं ग्रामीण रूग्णालय अतिशय चांगले आहे. तो माणूस गेली दहा वर्षे काम करतोय. त्यांना बक्षीसं मिळालेली आहे. तसे सुद्धा डॉ. आहेत. रात्रीचे बारा, एक, दोन केव्हा का असेना पेशंट आला, त्याला ट्रीटमेंट

देणार. पेशंटशी नीट वागलं पाहिजे अशी सक्त सूचना त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना दिलेली आहे. एकंदरीत असे अपवाद आहेत. तर एकंदर सर्वसाधारण चित्र समाधानकारक नाही. ॲम्ब्युलन्सचा खर्च पेशंटला द्यावा लागतो. तेवढे पैसे आदिवासींकडे नसतात. त्यामुळे त्याची आणखी कुचंबणा होते. त्याशिवाय मग मध्ये भ्रष्टाचार होत आहेच, अशिक्षितपणा आहे. काही कर्मचारी वरच्या मध्यम जातीतून आलेले असतात. त्यांचा आदिवासींकडे बघण्याचा दृष्टिकोन नीट नसतो. नीट बोलत नाही. ओरडायचं अंगावर आणि सरळ जास्त पैसे घ्यायचे. म्हणजे ५० रूपये ठरले असेल तर १०० रूपये घ्यायचे. असे सुद्धा खूप मोठ्या प्रमाणावर आपल्याला प्राथमिक आरोग्य केंद्रात चित्र बघायला मिळते. त्यामुळे सरकारी आरोग्य सेवा ही इतर भागांपेक्षा आदिवासींमध्ये अधिक कमी क्षमतेने काम करते, असे चित्र आपल्याला सर्वसाधारणपणे बघायला मिळते. एकच चांगली गोष्ट कागदावर का होईना महाराष्ट्र सरकारने केलेली आहे, जिचा आपल्या सर्वांना उपयोग करता येईल, ती म्हणजे 'ग्रामीण लोक स्वास्थ योजना'.

चार महिने अतिशय बिकट परिस्थितीत गावाशी संपूर्ण संपर्क तुटतो, त्या चार महिन्यांसाठी का होईना प्रत्येक पाड्यात एक आदिवासी 'पाडा स्वयंसेवक योजना' अशा नावाची योजना काही वर्षे चालू आहे. ती कदाचित या वर्षापासून बंद पडेल. कार्यकर्ता नेमून त्याच्याकडे पाच सहा प्रकारच्या गोळ्या देऊन, त्याला प्रशिक्षण देऊन पाच सहा प्रकारची कामे ठरवून दिली आहेत. कागदावर ही योजना चांगली आहे; परंतु प्रत्यक्षात तिचा बराचसा बोजवारा उडालेला आहे. कारण नेहमीचेच प्रश्न सोडवण्यासाठी ज्या माणसांची निवड झाली, ती व्यवस्थित झालेली नसते. प्रशिक्षण तर जवळ जवळ काहीच दिलेलं नाही. आम्ही त्यांच्या नेहमी संपर्कात असतो. ज्या बिनशिकलेल्या स्त्रियांना शिकवलेलं आहे हे सगळे ५ वी ते ७ वी शिकलेले आहेत. काही शाळा शिकलेली मंडळी आहेत. आणि या शिकलेल्या, बिन शिकलेल्या स्त्रियांपेक्षा त्यांचं ज्ञान अतिशय कमी आहे. निम्मं पाव सुद्धा नाही. त्याचा खरेतर काही मुद्दाच येत नाही. जायचं, गोळ्या घ्यायच्या, मानधन घ्यायचं, परत यायचं आणि काहीतरी ऐकायचं याच्यापेक्षा त्यांना काही प्रशिक्षण मिळालेलं नाही. त्यामुळे कागदावर चांगली असणारी योजना सरकार का बंद करते याचं कारण, मानधन ३०० रूपये आणि गोळ्या मात्र ५० रूपयांच्या सुद्धा नसतात. म्हणजे गोळ्या आणि प्रशिक्षण जे त्यांना द्यायला पाहिजे ते त्या मानाने कमी आहे. त्यामुळे ती योजना जवळजवळ बंदच पडली.

आमचं असं म्हणणं आहे की ही योजना चालू राहिली पाहिजे. तिच्यात काही सुधारणा करायला पाहिजे. कारण दूरस्थ भागात व विशेषतः आदिवासी भागात डॉक्टरकेंद्रित आरोग्य ज्ञान हे जवळ जवळ अशक्य आहे. एकंदरीत माझ्यामते हे सगळं ग्रामीण भागात तर खरं आहेच; पण आदिवासी भागात ते ११०% खरं आहे. त्यामुळे त्याच्यापासून आपल्याला ब्रेक घ्यायचा असेल तर ज्या - ज्या जुन्या स्कीम, आता १९७८ ची राजनारायण स्कीम सुद्धा, बंद पडल्यात जमा आहे. ती बदनाम झाल्यासारखी आहे. पण एखादी गोष्ट बरोबर चालली नाही, तर ती का चालली

नाही? कारण बिगर सरकारी सेवांमध्ये, योजनांमध्ये अनेक ठिकाणी अतिशय व्यवस्थित सगळ्या कल्पना चालल्या आहेत. आणि खूप चांगल्या पद्धतीने काम केलेलं आहे. त्याचं नावलौकिक झालेलं आहे.

आणि जो काम करतो त्याचा सुद्धा आमचा स्वत:चा वैयक्तीक अनुभव असा आहे की, किमान काही प्रामाणिकपणा असेल, काही प्रशिक्षण असेल, समाजात पाठिंबा असेल तर कितीतरी अधिक चांगल्या पद्धतीने शहरातल्या ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात बसलेल्या डॉक्टर केंद्रित सेवेपेक्षा कितीतरी अधिक चांगले अनुभव आहेत. त्याच्या मर्यादा खूप आहेत. सुरूवातीचे जे उपचार आहेत ते देणे याला दुसरा मार्गच नाही. त्यामुळ आमचं अस जोरदार म्हणणं आहे, आमची विनंती आहे की, आपण सगळ्यांनी मिळून याच्याबद्दल काहीतरी म्हटलं पाहिजे की बारा स्वयंसेवी योजना आहेत त्या बंद करू नका. त्यात सुधारणा करायची असेल तर सुधारणा करायला पाहिजे. त्याच्यामधला प्रशिक्षणाचा भाग असेल, औषधाचा भाग असेल, निवडणुकीचा भाग असेल जो काही भाग असेल, तो व्यवस्थित मार्गी लावला पाहिजे. कारण दुसरा त्याच्यामध्ये काही मार्ग नाही.

दुसरं आहे आदिवासी परंपरेतून आलेल्या झाडपाल्यांच्या औषधांबद्दल. काहीतरी पद्धतशीर संशोधन झालं पाहिजे. ती औषधे काही आजारांवर गुणकारी ठरतात, त्या औषधांचे सार्वत्रिकीकरण व्हायला पाहिजे. आयुर्वेदिक शिकवा असे म्हणत नाही. कारण आयुर्वेदात बरीच गुंतागुंतीची व्यवस्था आहे. सैद्धांतिक शब्दांची रचना आहे. तेव्हा मी फक्त झाडं-पाल्याच्या औषधांबद्दलच म्हणतोय की त्यांचं सार्वत्रिकरण व्हायला पाहिजे. त्याला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. त्याविषयीचा डॉक्टरांचा चुकीचा दृष्टिकोन सुद्धा बदलला पाहिजे. सरकारी आरोग्य सेवकांच्या डब्यामध्ये पूर्वी आयुर्वेदाची काही ठराविक औषधं होती; पण ती सगळी कागदावर होती. प्रत्यक्ष व्यवहारात कोणाचा त्यावर विश्वास नाही, असं झालं. आणि हेही खरं आहे की आदिवासींचा विश्वास कमी होत चालला आहे. त्यामुळे फार उशीर होण्याआधी ठराविक औषधांबद्दल, जी काही औषधे उपलब्ध आहेत, काही पुन्हा सिध्द झालेली आहेत त्यांचा वापर व्हायला लागला आहे, त्यांची नोंदणी होऊन त्यांचे संशोधन चालू राहिले पाहिजे. आपल्याला ज्या सुधारणा करायच्या आहेत त्यामधील ही एक सुधारणा मला सुचविता येईल.

दुसरी सुधारणा म्हणजे जी काही सरकारी सेवा कागदावर आहे ती कमी आहे. कारण कागदावर जर बघितलं तर आज आम्ही डहाणू भागात आरोग्य कॅलेंडर नावाची एक कल्पना, कार्यकर्त्यांनी आरोग्य सेवेवर कसं लक्ष ठेवायचं असा एक उपक्रम हाती घेतला. तो कार्यक्रम अगदी सोपा आहे, साधा आहे. आम्ही एक कोरं कॅलेंडर छापून घेतलं. त्यावर फक्त वार आणि तारखा म्हणजे सरकारी सेवेमार्फत ज्या सेवा मिळायला पाहिजेत असं सरकारी सेवकांच्या डायरीमध्ये लिहिलेलं आहे, त्या डायरीमधली घेतलेली नोंद त्या कॅलेंडरवर टाकायची. उदा. दुसऱ्या बुधवारी दोन वाजता लसीकरणासाठी त्या बाई येतील. नंतर शुक्रवारी सकाळी तो माणूस लेप्रसीच्या पेशंटला फॉलो-अप करायला येईल. असा काहीतरी कार्यक्रम असतो. तो चित्र रूपाने चित्र बनवतो बऱ्याच आदिवासींना वाचता येत नाही. ते चित्र तयार

करून चिटकवून टाकायची आणि १००% जरी क्षमता मानली त्या कार्यक्रमाची तरी महिन्यातून ३ ते ४ विक्रीपेक्षा कॅलेंडरची जास्त विक्री होतच नाही. जेव्हा आम्ही डॉक्टरांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी आदिवासींसाठी ही योजना, ती योजना राबवितो असे म्हटले. पण त्यांना जेव्हा आम्ही म्हटलं की ठीक आहे, तुम्ही १००% क्षमतांनी जरी काम करायचं म्हटलं तरी सुद्धा एका पाड्यात जास्तीत जास्त ३ ते ४ भेटी महिन्यातून होऊ शकतात. प्रत्यक्ष व्यवहारात १ किंवा २ भेटी होतात की नाही शंकाच आहे. प्रत्यक्षात त्यांची कार्यतत्परता ५०% आहे. ज्या काही चार भेटी आहेत त्या तरी तुम्ही नीट करा.

मग असं ठरल की त्या नर्सने आणि त्या गावातल्या कार्यकर्त्यांनी एकत्र बसायचं आणि त्यांनी सांगायचं की आमचा हा कार्यक्रम आहे, तो गावात लावला जाईल. ते कॅलेंडर एखाद्या मोठ्या कार्यकर्त्या बाईच्या झोपडीपुढे लावायचं. मग त्यांनी त्यादिवशी यायचं व लोकांनी तिथे जमून सेवा द्यायची. असं नाही की नर्सने दारोदार हिंडून कोणी आजारी आहे का, हे पाहायचं. हे काही बरोबर नाही. आम्ही लोकांना त्याबद्दल विचारलं असता त्यांनी सांगितलं की नर्सने आमच्या दारात यावं असं नाही. पण वेळेवर यायला पाहिजे. कारण नर्स वेळेवर आली नाही तर घरात कोंबडी, बकरी व म्हाताऱ्या माणसांशिवाय कोणीच भेटत नाही. सगळी कामावर निघून जातात. जर नर्स वेळेवर आली तर ज्याला गरज आहे तो थांबेल. नाहीतर मग त्या गावाची चूक म्हणायची. असा एक कार्यक्रम आम्ही घेतलेला आहे की जिथे चार महिने त्यांच्या व्हिजिट आहेत त्या तरी व्हायला पाहिजेत. आणि आल्यानंतर त्यांनी त्या कॅलेंडरवर सही करायची.

आम्ही नर्सना समजून सांगितलं की हे तुमच्याच फायद्यासाठी आहे. तुम्ही येता पण लोक म्हणतात की ही बाई आम्ही कधी बघितलीच नाही. अशावेळेस नर्सना खूप राग येतो. कारण त्यांना वाटतं आम्ही एवढं पाय तुडवत जातो आणि हे लोक खोटं बोलतात. त्यावर आम्ही त्यांना म्हटलं की आदिवासी कधी खोटं बोलत नाहीत. त्यांना तुम्ही दिसत नाही कधी आल्या ते. त्यामुळे ते कसं म्हणणार दिसली म्हणून. त्यामुळे दोघांची गाठ पडायची असेल तर दोघांची वेळ साधेल असंच यायला पाहिजे. तुमचा कार्यक्रम आहे म्हणजे तुम्ही वेळेवर यायला पाहिजे, तरच लोक थांबतील. तेव्हा हा कार्यक्रम सोपा आहे. लोकांच्या वेळेवर आरोग्य सेवकांनी यायला पाहिजे. संवाद साधला पाहिजे. हा लोकांचा हक्क आहे म्हणजे त्या प्रमाणे त्यांना सेवा दिली पाहिजे. तेव्हा सुधारणा करायची तर काय करायची?

पहिली सुधारणा म्हणजे प्रत्येक गावामध्ये आरोग्य सेवक असला पाहिजे. आमचा व अनेकांचा अनुभव आहे की नीट जर शिकवलं, प्रशिक्षण दिले, गावाचा काही पाठिंबा असेल, काही किमान औषधं त्यांच्या हातामध्ये दिली, आरोग्य शिक्षणासाठी चित्ररूप गोष्टी त्यांच्या हातामध्ये दिल्या तर हे आरोग्य-सेवक व्यवस्थित काम करू शकतात. त्यांचं जे वेगळं चित्र उभं केलं जातं ते मात्र खरं नाही. त्याच्या काही मर्यादा आहेत आणि त्याला डॉक्टरी सेवेचं पाठबळही मिळालं पाहिजे. नाहीतर ग्रामीण आदिवासींसाठी गावातलं कोणीतरी व शहरात त्याविरूद्ध असं दुहेरी प्रकारचं राहणीमान उपयोगाचं नाही. आज मध्यम वर्गामध्ये

शहराच्या ठिकाणी जखमेवरची पट्टी करायला सुद्धा डॉक्टर, अशी परिस्थिती आहे. आता यासाठी डॉक्टर कशाला लागतो? पण हे शिकलेल्या समाजाला समाजावयाला खूप वेळ लागेल. पण असंही नाही की काहीतरी फालतू समाजासाठी फालतू कोणीतरी कार्यकर्ता देऊन टाकायचा आणि त्यानं काहीतरी करावं, दोनचार गोळ्या देऊन. ही भूमिका बरोबर नाही. जिथे डॉक्टरची गरज नाही अशाठिकाणी आरोग्य सेवकाचा रोल असावा. जिथे डॉक्टरची गरज आहे तिथे कुठल्या ना कुठल्या सेवा मिळायला पाहिजेत. जर आपण काही देऊ शकलो नाही समजा, म्हणजे आज एकदम ५ वर्षांमध्ये जिथे डॉक्टरची खरोखर गरज आहे तिथे डॉक्टर नाही देऊ शकलो तर ती कमतरता मान्य करावी. त्याठिकाणी आमचा आरोग्यसाथी आहे. तो न्यूमोनियासाठी गोळ्या देण्याचे काम करतो, वेगवेगळ्या तपासण्या करतो. पण मला सारखं जाणवतं की हे काही खरं नाही. खरं म्हणजे अधिक चांगल्या प्रकारची सेवा आपल्याला देता आली पाहिजे. असा एक भाग आहे.

मला असं वाटतं की गावात आरोग्यसेवा मिळाली पाहिजे. त्यासाठी आरोग्य सेवक असला पाहिजे. दुसरी गोष्ट सरकारी सेवकांनी व्यवस्थित काम करायला पाहिजे. आणि तिसरं म्हणजे खाजगी सेवकांसाठी काहीतरी नियम केले पाहिजेत. बरेचसे ग्रामीण भागातले, आदिवासी भागातले डॉक्टर म्हणजे डॉक्टर-कम-कंपाउंडर आहेत. त्यांना काही कुठल्या प्रकारचे शिक्षण नाही. त्यातले अगदीच त्याज्य आहेत, त्यांच्यावर बंदीच यायला पाहिजे. ज्यांचं काही भाग प्रशिक्षण झालेलं आहे, त्यांना अधिक पद्धतशीर प्रशिक्षण दिले गेलं पाहिजे. हे खरंतर आदिवासी भागामध्ये राहिलेल्या काही लोकांना काही विशिष्ट औषधांचं प्रशिक्षण द्यावं. ४-६ महिन्यांचा कोर्स द्यावा. मात्र त्यांनी तीच औषधं वापरावीत त्याच्या पलिकडे जाऊ नये. औषध कंपन्या ग्रामीण भागातल्या कोणीही डॉक्टरकडे वाट्टेल ती औषधे देतात व तोही तीच वापरतो. असं या कार्यकर्त्यांच्या बाबतीत व्हायला नको. लोकांच्या मनावरचे इंजेक्शन, सलाईनचे भूत उतरवले पाहिजे.


खरंतर ही सुरूवात आपल्यापासूनच केली पाहिजे. लोकांना हे पटवून देण्यासाठी त्यातला खरेखोटेपणा दाखवून द्यायला पाहिजे. लोकांशी त्याविषयी चर्चा व्हायला पाहिजे. लोकांना प्रत्यक्ष अनुभवाने पटवून दिले पाहिजे, आदिवासी काही शिकलेला नाही. त्यामुळे डॉक्टरांवरच काहीतरी नियंत्रण असायला पाहिजे. सलाईनच्या बाबतीत एक सोपं आहे. ते फक्त चारच कारणांसाठी दिलं पाहिजे. त्यापेक्षा अधिक कारणांसाठी दिलं तर त्याविरूद्ध काहीतरी सामाजिक कारवाई व्हायला पाहिजे. आम्ही इंजेक्शन- सलाईनची काही पोस्टर्स केली आहेत. त्यात आम्ही सलाईन म्हणजे मिठाचं पाणी. ते कोणत्या चार कारणांसाठी द्यायला पाहिजे हे लिहिलेलं आहे. मग आम्ही त्या डॉक्टरांकडे जाऊन नम्रपणे हात जोडून सांगतो की, तुमच्या दवाखान्यात हे आरोग्य शिक्षणाचं पोस्टर लावा. हे अगदी पवित्र कार्य आहे. त्याला कोणी नाही म्हणू शकत नाही. अशा पद्धतीने लोकांना देखील हे सांगायचं. अशा वेगवेगळ्या मार्गांमधून आपल्याला खाजगी क्षेत्रावर त्यांच्या पिळवणुकीविरूद्ध दबाव टाकता येईल. नुसतं

(पृष्ठ ४९ वर पहा)

दिशा २००१

'आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास'

## ॥ उद्घाटन समारंभ ॥



(डावीकडून) डॉ. जयंत पाटील, प्रा. देवदत्त दाभोळकर, श्री. गिरीश सोहोनी, प्रा. शरद कुलकर्णी, श्री. जनार्दन महाराज वळवी, प्रा. रा. के. मुटाटकर



## दिशा २००१

## 'आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास'




परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. जनार्दनमहाराज वळवी यांचा श्रीफळ देऊन सत्कार करताना डॉ. जयंत पाटील



पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु व परिषदेचे मार्गदर्शक प्रा. देवदत्त दाभोळकर यांचा सत्कार करताना डॉ. जयंत पाटील

## दिशा २००१

## 'आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास'



**चर्चासत्र : आदिवासी अस्मिता**

(डावीकडून) श्री. वाहरु सोनावणे, श्री. काळूराम दोधडे, डॉ. गोविंद गारे




**चर्चासत्र : आदिवासी आरोग्य**

(डावीकडून) डॉ. अनंत फडके, डॉ. न. शं. देवधर, डॉ. सु. ल. काटे

## दिशा २००१
## ‘आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास’



**चर्चासत्र : भटक्या विमुक्तांचे प्रश्न**

(डावीकडून) श्री. गिरीश प्रभुणे, श्री. व्यंकटराव अवधूत, श्री. बाळकृष्ण रेणके



**चर्चासत्र : स्त्री आणि आरोग्य**

विषयाची मांडणी करताना श्रीमती नॅन्सी गायकवाड

# वंचित समूहांचे शिक्षण

या चर्चासत्राचे अध्यक्षस्थान आदिवासी क्षेत्रातले शिक्षण-महर्षी ज्यांना म्हणता अशा श्री.जनार्दनमहाराज वळवी यांनी भूषविले होते, श्री. दत्ताभाऊ साळवे, रमेश पानसे व बाळ कोळेकर या मान्यवरांनी वंचित समाजातल्या मुलांसाठी केलेल्या प्रयोगांची माहिती दिली.

## दत्ता सावळे

आदिवासी गावांतून चालणाऱ्या शाळांमधील शिक्षण आणि त्या अनुभवातून त्यांनीच विकसित केलेली एक पद्धती याविषयी बोलताना ते म्हणतात की,

"आदिवासी मुलांना कुठली गोष्ट त्यांच्या अभिव्यक्तीला अत्यंत महत्त्वाची वाटते, त्याच्याविषयी बोलायला लागलं की असं वाटतं की भरपूर बोलावं. आणि त्या २०-२५ शब्द आपण शोधावेत आणि त्यात मुळाक्षर बहुतेक असावीत. आणि त्याला बाराखडी म्हणजे मात्रा, वेलांटी असाव्यात असे साधारण २५ शब्द की ज्याच्यामध्ये त्यांना काय सांगायचे, त्यांना काय व्यक्त करायचे याला विशेष महत्त्व असेल.

अशा २५-३० शब्दांच्या जोड्या समजून घ्याव्या आणि त्यांच्या बरोबरीने एक दीर्घ असा आपल्याला संवाद करता यावा. समजून घेण्याची प्रक्रिया व्हावी. मगाशी बघितलं की सुरूवातीला अगदी पहिल्या शब्दालाच भात असावा की भूक असावी. मग लक्षात आलं की भूक हा शब्द भूकेची भावना ही भातातून जास्त व्यक्त होते, ती भूकेतून होत नाही. हे असे २०-२५ शब्द एकत्र आल्यावर त्या प्रत्येक शब्दाभोवती असे अनेक व्यक्तीगत कुटुंबातले, त्यांचे स्वतःचे अनुभव त्या सबंध जमातीचे अनुभव, भातावरले विलक्षण असं सांगणं सुरू होतं. नुसतं ऐकणं, समजून घेणं नाही तर, सांगणं सुरू झालं. आणि या सांगण्याच्या सबंध प्रक्रियेत हे 'भ' आहे, 'त' आहे, हा काना आहे. आणि हा मी वापरू शकतो. हे 'भ' मला पाहिजे तेव्हा वापरू शकतो. माझ्या स्वतःच्या अभिव्यक्तिसाठी. मला जग समजून घ्यायचयं, हे जग आहे, ते मांडण्याकरता मला त्या भाषेचा उपयोग करायचाय आणि यातल्या संवादाला, यातल्या चर्चेला, हे सबंध वर्षेभर असे भरपूर विषय विलक्षण विषय त्याच्यात येत राहिले. आणि त्याच्याशी संबंध मग भाषेचा लागला आणि वर्षेभर म्हणजे तीन, साडेतीन महिन्यांमध्ये मुळाक्षरे आणि बाराखड्या वगैरे जवळजवळ मुलांना यायला लागली.

शब्द जेव्हा आम्ही सांगतो म्हणजे आपण प्रॅक्टीस करता येते की नाही, शुद्धलेखन येतं की नाही, असे जेव्हा शिक्षक सांगतात. तेव्हा साधारणतः कुठे चुका होतील असे साधारण हेरून आम्ही शब्द सांगतो, म्हणजे 'खिडकी'. 'खि' पहिली काढतो का दुसरी, दीर्घ काढतो का ऱ्हस्व काढतो. अशा प्रकारचे शब्द असतात. आम्ही जे पहिल्यांदा सांगितलं की, शब्द हे ज्याने त्याने ठरवून लिहायचे. कोणता शब्द आपल्याला प्रॅक्टीस करता पाहिजे तो शब्द त्याने लिहून घ्यायचा. लिहिता येत नसेल तर शिक्षकांनी तो लिहून द्यायचा. का निवडला

एवढं मात्र त्यांनी सांगायचं. त्यातून एक वेगळी शब्द मांडणी झाली. आणि जेव्हा वाक्य लिहायला लागले तेव्हा सगळे स्वतः विषयी, आपल्या समाजाविषयी, आपल्या सगळ्या जीवनाविषयी लिहायला सुरूवात केली. आणि मग त्यात वेगवेगळ्या प्रकारचे विषय आणि त्यातल्या दारूवरती वेगवेगळे अनुभव लिहिले गेले त्याची आम्ही एक लहानशी पुस्तिका तयार केली. नुसते दारूचे नाही तर अनेक असे वेगवेगळे विषय की ज्यात संवाद होत असत त्यामध्ये अनुभवाचे अनेक तुकड्यांना एकत्र करून काय काय होतं यासाठी आम्ही प्रयत्न करून पाहिले. एकदा असेच आम्ही सगळे एका गावात गेलो होतो. जवळूनच रोज संध्याकाळी एक मुलगा यायचा, त्याच्या गावात आम्ही गेलो आणि गावातील मंडळींना आम्ही बोलावले. अशी १५-२० मंडळी अवती भोवती बसली. प्रत्येकाने आपले नाव सांगितले. परिचयाचा भाग होता त्यामुळे त्यांनी आपली अशी नावे सांगितली -जान्या, सीत्या, लख्या, मन्या याप्रकारची सगळी नावे.

दुसरा असा प्रश्न विचारला की 'इथं सावकार राहतात का?' त्यांनी 'हो' म्हणून सांगितले. सावकाराचा पाडा आहे. काय नाव आहे त्याचे? बाबूशेट, खलिलशेट, रघूशेट, दिनूशेट, ही सगळी शेट साहेब आहेत. कुणी साहेब येतो का? विचारल्यावर 'हो' म्हणाले, त्यांच्यात पाटील साहेब, कुलकर्णीसाहेब आहेत. ते बँकेचे साहेब आहेत. वाज्या म्हणून एक ४५-४६ वर्षांचा म्हातारा होता. त्याला म्हटले, 'वाजू तुझा सावकार आहे का? 'हो'. त्याचे नाव काय आहे? 'बाबूशेट'. तो तुला काय म्हणून हाक मारतो? त्यावर तो म्हणाला, 'वाज्या'. त्यावर वाज्याला विचारले की तू कधी बाबूशेटला बाब्या म्हटला आहेस का? त्यावर तो 'नाही' म्हणाला. बाबूशेटचा कधी राग आला तरी त्याला बाबूशेटच म्हणायचो. शिवी द्यायची झाली तर ती सुद्धा बाबूशेट म्हणून, बाब्या म्हणण्याचे धाडसच झाले नाही. लाडानं सुद्धा कधी बाब्या म्हणायचे डोक्यात आले नाही. तिथे दुसरा एक १८ वर्षाचा पोरगा होता, तो पटकन म्हणाला की, 'मी उद्यापासून वाज्याला वाजूदादा म्हणणार'. आणि मग त्यांनी सगळ्या नावांमध्ये बदल केला. दुसऱ्या दिवशी एक लल्लू म्हणून एक पोरगा होता. त्याला राजन नावाचा एक मित्र होता.

त्याने त्याला 'ए लल्या' म्हणून नेहमी सारखी हाक मारली. त्यावर लल्लू म्हणाला हे बघ माझं नाव लल्लूराम आहे. मला जर हाक मारायची असेल तर लल्लूराम म्हणून हाक मार. मला जर 'लल्या' म्हणून हाक मारशील तर मी तुला राजन म्हणणार नाही. त्यांनी एक अर्ज लिहिला व तो आपल्या सावकाराकडे दिला आणि त्यांना सांगितले की, 'आमची अशी अशी नावे आहेत. आम्हाला सगळ्यांनी ह्या ह्या नावाने हाक मारा. आणि जर तुम्ही जर असं करणार नसेल तर आम्ही सुद्धा तुम्हाला दिन्या, बाब्या अशी हाका मारू'. यावर सगळे हसले. ते हसण्यावारी नेले. त्याच्यानंतर त्याच्याविषयी त्यांनी लिहिले, हा सगळा एपिसोड मुलांनी एक गोष्ट असल्यासारखा, त्याचा एक धडा असल्यासारखा लिहून काढला. बऱ्याच जीवनातले तुकडे असे आणायचे. ते एकत्रित करून त्याच्यातून काय चित्र दिसते ते पहायचं. एकदा शिमग्याचा काळ होता. आणि मुलं मनोरला गेली. त्यादिवशी सगळी मंडळी शाळेत आलीच नाही.

दुसऱ्या दिवशी आल्यावर विचारलं, तर म्हणाले मनोरला गेलो होतो, बाजारला. काय आणलंत का? त्यावर काळा गूळ, चहा, साखर, बटाटे आणले असे सांगितले. तू पॉप्यूलर हॉटेलमध्ये चहा पिला, किती पैसे घेतले? एक रूपया. यावर त्यांना विचारले की चहाची किंमत कोणी सांगितली? हॉटेलवाल्यानी सांगितली. गुळाची किंमत कोणी सांगितली? किराणावाल्याने सांगितली. साखरेची किंमत कोणी सांगितली? किराणावाल्याने सांगितली. कापडाची किंमत कोणी सांगितली? दुकानदाराने सांगितली. असं विचारताना तो चिडला, आणि म्हणाला की ज्याची वस्तू त्या त्या मालकांनी किंमत सांगितली. त्यात विचारायचे काय आहे. त्यावर मी त्याला विचारलं 'चार विकतो आपण. त्याची किंमत कोण सांगतो?' घेणारा सांगतो 'भात विकतो त्याची किंमत कोण सांगतो?' घेणाराच सांगतो.

आणि मग त्या पोराच्या लक्षात आलं की अरेच्या त्याच्याही वस्तुची किंमत तोच करतो आणि आपल्या वस्तुची किंमत तोच करतो आणि जेव्हा हे सूत्र हातात आलं तेव्हा ते वापरायला त्याने सुरूवात झाली. आमचा एक मरू नावाचा कार्यकर्ता होता. इथून हायवे चार किलोमिटर अंतरावर मारवाड्याचे दुकान आहे. तो मारवाडी एके दिवशी त्याच्या घरी आला, आणि त्याने केलेली तूर विकत घेतली आणि तूर घेतल्या नंतर त्याचे ८० रू. ६० पैसे झाले. त्याने सांगितले, 'आणून माझ्या दुकानात दे मग मी पैसे देईन'. याच्या लक्षात आले याने आपल्याला मजुरीत मारले, फुकट हमाली करून घेतली. त्याने मालाचे ८० रू दिले. तो म्हणाला, 'माझे ६० पैसे द्या'. यावर दुकानदार म्हणाला की, 'ही साबणाची वडी घे'. 'साबणाची वडी नको मला. मला माझे ६० पैसे परत दया'. तो दुकानदार म्हणाला, 'अरे वडी त्यापेक्षा महाग आहे'. 'नको मला माझे ६० पैसे परत हवे. एक तर तुम्ही मला मजुरीत मारले. आता ६० पैसे पण मारताय!' मग त्या दुकानदाराने त्याला ६० पैसे परत दिले. दुकानदार म्हणाला हा व्यवहार आहे. त्यांने विचारले दर की व्यवहारात नेहमी मला नुकसान आणि तुझा फायदा होतो हे कसे? मला तू भावात अडवलंस , फुकटात मजुरी करून घेतलीस आणि इथंही ६० पैसे घेतोस. असं का होतं? त्यावर तो म्हणाला व्यवहारात असं होतच असतं.

दुकानदाराने ६० पैसे दिले ते घेऊन तो बाहेर आला. बाहेर आल्यावर इतर आदिवासींनी विचारलं,यावर त्यांना सविस्तर सांगितले. अशा सगळ्या प्रकारच्या गोष्टी, भाषा शिक्षणाच्या, इतिहास शिक्षणाच्या येत गेल्या आणि मग एका वर्षभरात भाषा लिहिता येणे, वाचता येणे हे सुरू झाले. आणि मला काय सांगायचंय ते लिहिण्यात जास्त प्रभुत्व येत गेले. तशाच प्रकारंच काम दामखेडला एक वर्षी केले व नानेवली येथे याच प्रकारची शाळा चालवत आहे. आणि तिथेही जवळजवळ असाच प्रतिसाद मला मिळाला. भाषेच्या बाबतीत एक जाणवलं की, जर मला स्वतःला व्यक्त करण्यासाठी भाषा वापरायची असेल म्हणजे इतर प्रश्न आहेत की बोली भाषा, प्रांतिक भाषा, पण मला ती मी सहज वापरू शकतो. कारण ती स्वतःला व्यक्त करण्यासाठी वापरायची असेल तर माझी ताकद वाढली जाते. ही व्यक्त करण्यासाठी जर भाषा वापरायची असेल तर ती सहज आत्मसात होते ती माझा आधार बनते.

ही ताकद वाढवण्याची प्रक्रिया भाषा शिक्षणात आणि शालेय जीवनात होताना दिसत नाही असा माझा स्वतःचा अनुभव होता. त्यापेक्षा हा अगदी वेगळा अनुभव. या प्रकारचा जसा माझा अनुभव आहे तसाच अनुभव मी चिपळूनमधल्या धनगर/कातकरी यांच्या बाबतीत घेतो. आणि गडचिरोली जिल्ह्यात एका ठिकाणी गोंडी आणि मराठी एकत्र शिकण्याच्या बाबतीतही घेतो. आणि जवळ जवळ अभिव्यक्तीतून म्हणजे मला व्यक्त करण्यातून शिकणं जास्त प्रभावी असते. इतर सगळ्यांविषयी मी आता बोलत नाही. पण एक लक्षात ठेवा, जेव्हा मुलं स्वतःला समजलेले व्यक्त करतात तेव्हा नुसतं आपलं शिक्षण होतं असं नाही तर बाहेरच्या गोष्टी ही मला जास्त चांगल्या कळतात आणि माझ्या वस्तूही मला जास्त चांगल्या कळतात.

हे असं तीव्रपणाने शाळांतून जाणवते की, ज्या प्रकारची पाठ्यपुस्तकं, ज्या प्रकारच्या अनुभवाची मांडणी ही अशी आहे जी सर्वसाधारण माणूस, ज्याला आपण वंचित, शोषित वेगवेगळे समूह म्हणतो त्याच्या दृष्टीने फारच परकी बुजवणारी, भिववणारी अशी साधारणतः असते. ती आत्मसात करता येत नाही असं नाही. म्हणजे एक आता कातकऱ्यांच्या आणि धनगरांच्या बाबतीत पाहिले की, पहिल्या पाच सहा महिने पुस्तकांकडे जायचेच नाही. आपण मुळाक्षरं लिहणं, वाचणं आत्मसात करून मग पुस्तकांकडे जायचं आणि मग पुस्तकांशी एक वेगळ्या प्रकारचा संवाद करायचा. किंवा एक पाठ वाचला म्हणजे भाषा म्हणून वाचला. त्यातला आशय म्हणून बघितला तर त्याच्याशी माझं जुळतं का? मी आणि तो यांची तुलना होते का? एका अर्थाने पाठ्य पुस्तकांशी डायलॉग करणे आणि त्याने क्रिटीकली हे समजून घेण्याची एक प्रक्रिया लहानपणापासून, पहिली पासून आपल्याला सुरू करता येते. आणि त्याने नुसता भाषेचे फायदा होतो असे नाही; तर मला शिकण्यामध्ये माझ्या उर्जेला, माझ्या सामर्थ्याला, शरीराच्या उर्जेला जागे करण्याची ताकद त्याच्यात असते. त्याचा विचार नुसता भाषेपुरता राहात नाही तर इतिहास, बोलीभाषा या सगळ्या प्रकारच्या शैक्षणिक कामामध्ये तुम्हाला सामर्थ्य, जागरणानंतरचे जे सामर्थ्य आहे ते जाणवते. हे चिपळूणमधल्या मुलांनी ज्या प्रकारच्या अवतीभवतीच्या इतिहासाकडे पाहिले. जमा केला. ही सुद्धा एक अशीच उपलब्धी आहे असं मला वाटते. तसे एरवी ते फिरतच होते. पण आता आम्ही दर १५ दिवसाला असे बाहेर काही सामाजिक संस्थांना बघण्याकरता समजून घेण्याकरता फिरत असतो. काही निसर्गाशी संबंध प्रस्थापित करून ते समजून घेणे असते. यात मुख्यतः शिक्षकांना जास्त शिकता येतं.

एकदा मुलांना मोराचा आवाज आला. तिथे ओलसर जागेत मोराच्या पायाचे ठसे उमटले होते. म्हटलं इथं कुठेतरी मोराचे घरटं असेल. ते बघितलं आणि त्याच्यात तीन मोराची अंडी सापडली. मग त्या मुलांच्यात चर्चा झाली. काय करायचं? काही म्हणाले, 'आपण ते सोडून देवू.' काही म्हणाली की, 'आपण घेवून जाऊ आणि बघू की कशी वाढतात'. मग ते तीन अंडी घेवून आले त्यातलं एक अंड कुणीतरी चोरलं. दोन चांगली जपली. तिथे एक म्हातारी होती, तिने कोंबडीच्या खाली तीन अंडी उबवली. मोराची पिल्लं झाली आणि ती कोंबडीच्या मागे पिल्लांमध्ये

जायची. दुसऱ्या वेळेला अंडी घालायच्या वेळेस तीन पिल्लांना दूर केले तेव्हा यांनाही अलग केले आणि ती मोठी झाल्यानंतर धड इकडची नाही, धड तिकडची नाही. अशी ती बुजल्यासारखी दोन पिल्लं फिरायची. रोज शाळेच्या पूर्वी तास दीड तास तोच उद्योग असायचा की काय करतात, कशी वाढतात? याविषयी आणि जशी ती पिल्लं कोंबडीच्या पिल्लांपासून अलग झाली तशी ती बिथरल्यासारखी वागू लागली आणि मग एक तीन-चार महिन्यांनी जंगलात मोरांचे आवाज आले आणि ती निघून गेली. तर मुलांनी ते सगळे लिहिलं आणि त्याच्यात त्यांनी सांगितल की, आम्ही खूप प्रयत्न केला; पण मोरांना मोर बनवण्यापासून आम्ही काही वाचवू शकलो नाही. शेवटी मोर, मोर झाले. असं आम्हाला जाणवल.

अशा प्रकारचे अनेक अनुभव आहेत. बाबी आजीची शाळा आहे, तात्यांची गाय आहे, हे अवती भवती कसं पहावे आणि ते लिहिणे पाठ्यपुस्तकामधील प्रश्नोत्तरे इतकी नगण्य वाटतात की पाठ्यपुस्तक दरवेळेला मी असा वजा न करता माझ्याशी तुलना करीत माझ्याशी त्याचा काय संबंध येईल असे करित मी विषय शिकणे आणि आत्मसात करणे आणि त्याने सामर्थ्य घेणे. त्या सामर्थ्यात माझ्यातल्या उर्जांना जागे करणे या पद्धतीची जाणं मला पाच-सहा ठिकाणी (एक कार्यकर्ता प्रशिक्षण हा वेगळाच विषय) पण शालेय शिक्षण, अगदी औपचारिक शिक्षणामध्ये झाली. तुम्हाला कितीतरी सामर्थ्य जे मुलांच्या जवळ असते.

तर यातल अत्यंत नगण्य उपयोग करतो. तिथं पण बाकी सगळं गुदमरून टाकतो. मग त्याला नापास करतो. त्याच्या डुब्धदृद्रदृद्वद्य ची शक्यता वाढते म्हणजे उर्जाचा उपयोग करण्यापेक्षा, उर्जाचा परिचय करून उपयोग करण्यापेक्षा त्याला कुंद हा करणे, त्याचा गळा घोटल्यासारखं होणं, असेच साधारणतः होतं. आणि हे सामर्थ्य आपल्याला पाठ्यपुस्तकांच्या आधाराशिवाय, त्यांना डावलून नाही तर, पाठ्यपुस्तकांच्या बरोबरीने संवाद करून, critically माझ्याशी, सर्वात महत्त्वाची कसोटी माझा व्यक्तिगत, सामूहिक अनुभव त्या कसोटीच्या दगडांवर बाहेरचं सगळ तपासून घेईल अशा प्रकारची एक पद्धती मला चार-पाच ठिकाणी विकसित होताना दिसली.

---

## रमेश पानसे

रमेश पानसे माझे नाव. मी ठाणे जिल्ह्यात डहाणू तालुक्यात काम करतो. गेली २० वर्षे शिक्षणाशी माझा संबंध आहे. एक चांगलं झाल की दत्ताभाऊ वर्गातल्या शिक्षणात उतरले. मी आता वर्गाबाहेर जातो, म्हणजे एकूण आपल्या विषयाला अधिक न्याय मिळेल. खरंतर त्यांनी सांगितलेले वर्गातले अनुभव खूप संपन्न करणार आहेत.

ही अनुभवाची विहीर कधी आटत नाही आणि हे अनुभव वेळेवर कधी आठवत नाही. रोज नवेनवे अनुभव येत राहतात; परंतु त्याविषयी ते बोलल्यामुळे, मी जरा वेगळ्या विषयांवर बोलतो. जर व्यापक विचार केला तर, आपण आदिवासी शिक्षण हा विषय डोळ्यासमोर ठेवला तर डोळ्यासमोर काय येतं आपल्या? उच्चतांत्रिक शिक्षण येते का, मेडिकलचे शिक्षण येते? अजूनही

आपण आदिवासी शिक्षण म्हटलं की प्राथमिक शिक्षणाचाच विचार करतो. म्हणजे शिक्षणाचे प्रश्न त्याच पातळीवर राहतात. आपण अजून बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षणाचा विचार सुद्धा एवढा होत नाही. मला असे वाटते की प्रगतीबरोबर प्रश्नांच्या, शिक्षणाच्या पातळ्याही बदलल्या गेल्या पाहिजेत. आपण अजूनही प्राथमिक शिक्षणाबाबत आदिवासींच्यात बोलतो. हाच एक सगळ्यात मोठा आदिवासींच्या शिक्षणाचा प्रश्न आहे.

नवे प्रश्न केव्हा निर्माण होतील, नव्या पातळ्यांवर शिक्षण गेलं की. आम्ही अजून प्राथमिक शिक्षणात एवढे अडकले आहोत की त्याचे सार्वत्रिकीकरण होत नाही. त्याचा दर्जा सुधारत नाही, ना आदिवासींना वरच्या संधी प्राप्त होतात. त्यामुळे हीच एक मोठी समस्या माझ्यापुढे आहे. त्याचा विचार आपल्याला करायला हवा. दुसरे, एकूण देशाचे शिक्षणविषयक प्रश्न. ते सर्वच्या सर्व आदिवासी भागात आहे.

देशातल्या ग्रामीण भागाची शिक्षणाच्या प्रश्नांची जर यादी आपण काढली तर ते सगळे प्रश्न आदिवासींमध्ये आहेत; किंबहुना आपल्याला असे म्हणता येईल की ,देशाचे आणि ग्रामीण भागाचे शिक्षणाचे प्रश्न अधिक तीव्रतेने कुठे जाणवतात, तर ते आदिवासी भागात जाणवतात. म्हणजे ते आदिवासींचे प्रश्न आहेत. प्रामुख्याने देशातल्या प्रश्नांनी त्यांचे काहीतरी आपण सूत्र जोडतो. उदा.- साध्या प्रवेशांचा प्रश्न, मुलांना शाळेत येण्याची संधी मिळण्याचा प्रश्न. गळतीचा प्रश्न, मुलांना टिकवून कस ठेवावे. मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न हे जे व्यापक शिक्षणाविषयी देशाचे प्रश्न आहेत. ग्रामीण भागाचे प्रश्न आहेत ते सगळे प्रश्न आपल्याला आदिवासींच्यात अधिक तीव्रतेने दिसतात. आणि आदिवासींना न परवडणारे शिक्षण हा ही एक प्रश्न आहे. प्राथमिक शिक्षण आपल्या देशात मोफत आहे, असं म्हटले तरी ते मोफत नाही हे अनेक अभ्यासांतून लक्षात येतं आणि गरिबांच्या बाबतीत त्याचा परवडण्याबाबत प्रश्न आहे, मोफत नसल्याने. आदिवासींना शिक्षणासाठी काहीना काही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या खर्च करावा लागतो आणि दुसरा ज्याला आपण संधी खर्च म्हणू. म्हणजे मुलाला शिक्षणासाठी पाठवल्याने चार वर्षे म्हणून मुलाकडून जे काही काम झालं असते. म्हणजे उत्पन्न मिळाले असतं ते मिळत नाही. हा असाही एक प्रत्यक्ष खर्च होत राहतो.

हे सगळे प्रश्न आहेत. पण आपण त्याही प्रश्नाकडे व्यापक न जाता एखाद्या गावामधील आदिवासींचे काय प्रश्न आहेत जे मला जे काही अनुभवातून जाणवले, ते सामान्यपणे हे प्रश्न पुढे येत नाहीत. या प्रश्नांचा विचार झाल्याशिवाय व्यापक प्रश्न सुटणार नाहीत, असे माझं म्हणणं आहे. म्हणून अगदी गावपातळीवर आदिवासी गावातल्या शिक्षणाचे कोणते प्रश्न आहेत? जो वरवर पाहता प्रश्न म्हणून आम्हाला जाणवलेच नाहीत. पण ते प्रश्न आहेत असं माझं म्हणणं आहे. आणि पुढे ते सामान्यतः येत नाहीत म्हणून मी आज संधी घेतोय आणि ते आपल्यापुढे मांडतो.

पहिलं म्हणजे मला असं दिसतं की, जिल्हापरिषदेच्या शाळा झाल्या अंगणवाड्या, बालशिक्षण म्हणजे सहावर्षाखालील मुलांचं शिक्षण हे बालशिक्षण. अंगणवाड्या त्यांच्यासाठी निघाल्या. आपण या पातळीवर विचार करतो, सरकारही

या पातळीवर विचार करतें. पण आदिवासींच्या रहाण्याच्या पद्धतीचा विचार केला तर ते ही मंडळी इथंपर्यंत न जाता शाळा गावात कुठं असावी? तर पाड्या-पाड्यात विखुरलेली आहे. मग शाळा गावात असणं. बऱ्याचदा आढळतं की, बाहेरून येणाऱ्या शिक्षकांना शिक्षण अधिकाऱ्यांना सोईचं जावं म्हणून गाव असं विखुरलेल असतं. रस्ता इथे रस्त्याच्या जवळचा पाड जो आहे तिथे सरकारी शाळा असते. शाळा ही गावातल्या मुलांकरीता असेल तर प्रत्येक पाड्यावरच्या मुलांकरता सोईची होईल असे ठिकाण ठरवायला नको का? ठिकाण ठरवणे, याविषयी कधी विचार होतो का? हा माझा एक प्रश्न आहे. हा जाणवतो का?. मग आपणाला असं दिसते की ज्या पाड्यावर शाळा आहे त्या पाड्यावरची मुले शाळेला नक्की जातील पण लांबची मुलं कशी जातील? अनेकदा ओढा किंवा नदी मध्येच असते. अनेक अडचणी असतात. माझे म्हणणे असे आहे की शिक्षणासाठी शाळा सरकार काढते पण ती जागा कुठे असावी हे गावच्या सगळ्यांनी मिळून ठरवायला हवं. हा विषयच कधी पुढे येत नाही.

असाच दुसरा एक प्रश्न. शिक्षण गावातल्या मुलांचे असते. शाळा गावात असते, पण ती शाळा गावची नसते. गावाचा काय संबंध त्या शाळेशी? शाळा कुणीतरी काढली. शिकवणारा कुणीतरी नेमला, त्याचा पगार कुणीतरी देतं. तो येतो-जातो, शिकवतो, न शिकवतो याचा गावाशी काय संबंध? मुलं गावातली आहेत, शाळा गावातली आहे. माझा शब्द ऐका, पण गावाची नाही. गावाचा काही संबंध शाळेशी जोडला जात नाही. आम्ही शिक्षण समत्या वगैरे काही करतोय पण अजूनही काही बळकटपणे होत नाही की ती शाळा ही गावाची आहे. त्याच्यावर गावाचे लक्ष आहे. त्या शाळेचं कार्य बरं-वाईट करायचे  ते गाव ठरवतं. असं जर का झालं, गावाला स्वतःची शाळा आहे असं वाटले आणि स्वतःची शाळा आहे असे वाटले तर शिक्षणाचे काही प्रश्न सुटतील. हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्या.

तिसरं - गावातल्या शिक्षणाचा मान जरा वाढायला लागला व नव्यानव्या घटना घडायला लागल्या शिक्षणात. मला पण एक विचित्र चित्र आढळले, ते म्हणजे गावातल्या शिक्षणाला अनेक मालक असतात. मी एक उदा. सांगतो, मी ज्या गावात काम करतो तिथे स्वयंसेवी संस्था काम करते. त्यांनी बालवाड्या काढलेल्या आहेत. बालवाडीचा मालक कोण ती स्वयंसेवी संस्था, गावामध्ये प्राथमिक शाळा आहे. ही प्राथमिक शाळा जिल्हा परिषदेची आहे. म्हणजे शाळेचा मालक कोण? मालक याचा अर्थ निर्णय घेणारे. मी खरं वेगळा शब्द वापरतोय. मला खरं भीती वाटली की एका शिक्षणाला अनेक बाप आहेत. काही हरकत नाही असा शब्द आपण वापरू.

एक सांगितला तो स्वयंसेवी संस्था एका शाळेपुरता, तर दुसरा शाळेचा बाप कोण तर जिल्हा परिषद. तिसरी एक आश्रम शाळा आहे. त्याचा बाप कोण, आदिवासी विकास विभाग. चौथी एक शाळा आहे ती एका खाजगी ट्रस्टने काढली त्याचा बाप पून्हा तो खाजगी ट्रस्ट. पाचवी अंगणवाडी त्याचा बाप तो केंद्रसरकार भाग क्ष्क्क्र्च तो. आणि आता माध्यमिक शाळा आली तर त्याचा बाप तो राज्य शासन, अजून ती नाही आली. म्हणजे गावात पाच-पन्नास, शंभर-दोनशे

मुलं. त्याचा प्राथमिक प्रश्न सातवी-आठवीपर्यंत, मॅट्रीकपर्यंत. शिक्षण करायचे पण त्याला बाप इतके आहेत, की मुद्दा तो नाही तर हा आहे की, त्यांचा परस्पर काय संबंध? परस्परांनी संबंध नाही त्याचे पण प्रश्न खूप आहेत. आपण यात कधी उतरत नाही. शिक्षण एक संधी नाही. बालवाडीतला मुलगा प्राथमिकला गेला. प्राथमिकचा मुलगा माध्यमिकला गेला पुढे तो मॅट्रिकपर्यंत गेला, पुढचा आपण विचारच करत नाही.

अडचण अशी होते की सगळ्यांचा संबंध नसल्यामुळे थोडं आपण खोलवर विचार केला तर आपल्या लक्षात येईल की प्रत्येक शाळांमध्ये शिक्षणाच्या सोईंचा अभाव. मला आठवतं पन्नास वर्षांपूर्वी मी माध्यमिक शाळेत शिकलो. प्रवेश केला. ठाण्यात होतो आणि मी पन्नास वर्षांपूर्वी ठाण्याला होतो. अगदी छोटं गाव नव्हते; पण आजच्या मानानी फारच लहान होते. तरीही माझ्या शाळेत उत्कृष्ट मैदान होते. माझ्या शाळेला उत्कृष्ट वाचनालय होतं. आणि माझ्या शाळेला उत्कृष्ट प्रयोगशाळा होती. घटकाभर या तीन महत्त्वाच्या शैक्षणिक सोयींचा विचार करू.

प्रत्येक शाळेला स्वतःची आर्थिक मर्यादा. कारण त्यांची प्रत्येकाची बजेट वेगळी. गावासाठी शिक्षणाचं बजेट नाही. आदिवासी विभागाच आश्रम शाळेसाठी असेल आणि त्याचं सर्वांना काही समान द्यायचं मग वाचनालयाला दोनशे रूपये महिन्याला. आपण एक उदा. फक्त देऊ की, वर्षाला दोनशे रूपये या शाळेत. तिथे एक तिनशे रूपये. मग ते एक दोन पुस्तके घेणार न घेणार. बरे त्याचा मुख्यध्यापकाला वर्षांनी जाब द्यावा लागतो. पुस्तकांचा हिशोब द्यावा लागतो. त्यामुळे तो ते पुस्तक बाहेर काढतच नाही, ती एक वेगळीच गोष्ट. वाचनालयाची सोय ही अशा एवढ्या बापांच्या संसारातून होत नाही. गावाचे म्हणून एक शिक्षण मानलं तर, सबंध गावातल्या दीड-दोनशे मुलांसाठी मैदान उत्तम होऊ शकेल की नाही? एक वाचनालय सगळ्या शाळा मिळून एकत्र चालवू शकतील की नाही. म्हणजे शेअर करू शकतील की नाही? अजूनही प्रयोगशाळा नाहीत. काय हे, कुठल्या समतेचा विचार आपण करतो आहोत? द्यायचं तिथं इतकं दिले जातंय आणि नाही तिथं नाही. आणि असे आम्ही गृहीत धरतो की इथे नसले तरी चालणार आहे. आर्थिक अडचणी वगैरे तिथे येतात. मला असे म्हणायचं की, थोडसे आर्थिक अडचणींचे प्रमाण कमी करता येते. तीव्रता कमी करता येते, जर का आपण गावामध्ये सर्व शाळांना एकत्र आणून त्यांच्यासाठी कॉमन अशा ज्या काही फॅसिलिटीज गावपातळीवर निर्माण केल्या तर खूप काही होईल.

तिसरी महत्त्वाची गोष्ट की ह्या सगळ्या शाळांचे जे शिक्षक आहेत त्यांच्यावर गावचे लक्ष नाही. कारण तो शासकीय नोकर आहे किंवा वेगवेगळ्या ज्या संस्था आहेत, त्यांचा तो नोकर आहे. तो गावाचा नोकर नसतो, तर 'नोकर' हा शब्द वाईट आहे. आपण कार्यकर्ता म्हणू, किंवा शिक्षक म्हणू. शिक्षकाचा गावाशी संबंध नसणे ही फार मोठी गंभीर गोष्ट आहे. कारण तो गावाचे ऐकू लागत नाही. गावातला त्याला कोणी काही म्हणूच शकत नाही. आता अशी एक आपल्याला सवय झालीय की सरकारने नेमलेला शिक्षक असेल तर सरकार त्याचं काय पाहते, आम्ही काय

करणार? ही वृत्ती त्याच्यातून निर्माण झाली.

थोडे पुढे गेलो तर त्या शिक्षकाच्या लायकीचा प्रश्न इथे अगदी महत्वाचा आहे? काय होतं माहिती आहे का, एखाद्या दृष्टिकोनातून एखादा प्रश्न सोडविताना दुसरा एखादा प्रश्न निर्माण करतो इथे अस घडले आहे. उदा.- आमच्या आदिवासी भागामध्ये केव्हातरी असा जी-आर निघाला की शिक्षक डी. एड मिळत नाहीत. जाऊन रहात नाहीत अनेक अडचणी आहेत. त्याचबरोबर गावात अनेक मुले मॅट्रिक झालेली आहेत. मग आम्ही मॅट्रीक मुलांना शिक्षक म्हणून घेऊ. इथे त्यांच्या रोजगाराचा प्रश्न सोडवता येईल, त्या मुलांना काही रोजगाराची संधी देता येईल. ही एक बाजू आहे त्यांची.

पण त्याची दुसरी बाजू शिक्षणाच्या अंगाने जेव्हा पाहता, म्हणजे हा पेच आहे. मला उत्तर यायचं. पण हा पेच लक्षात घ्यावा, एवढंच माझे म्हणणे आहे. रोजगाराच्या आणि प्रयत्नांतून मुलांना संधी देण्यासाठी आम्ही एक शिक्षक, आणि असे एक मानलेच गेले आहे की सगळ्यात सोपे काम शिक्षकाचे. त्यामुळे त्याला तिथे नेमणार आम्ही. आता हा मुलगा त्यानं जिल्हापरिषदेच्या शाळेतनं किंवा आश्रमशाळेतनं मॅट्रीकपर्यंत गेलेला आहे. तिथल्या शिक्षणाचा दर्जा हा एक स्वतंत्र विषय आहे. म्हणजे मग आडातच नाही तर पोहऱ्यात येणार कुठनं? आणि पोहऱ्यात नाही तर आमची मुलं शिक्षणात भिजून निघणार कशी?

लक्षात घ्या, म्हणजे पहिला पेच आपल्याला सोडवता आला नाही तर दुसरा पेचही सुटणार नाही. शिक्षकांच्या दर्जाचा प्रश्न. या प्रश्नाचं आणखीन एक अंग आहे. ते असे आहे की गावामध्ये exposure च नाही की त्यामुळे शिक्षकाची स्वतःची म्हणून काही क्षमता वाढेल. ना कुठली वाचनालय. चार लोक अशी नाहीत की त्यांच्याशी तो चर्चा करेल. चर्चा करायची सवयही नाही. तो एकदा शिक्षक झाल्यामुळे पैसे मिळवण्यासाठी गावात आणखीन काही उद्योग करता येईल का त्याच्याकडे त्याचे लक्ष असणार.

आपण शिक्षक म्हणून प्रगल्भ होण्याकडे कधीच लक्ष नसते. कारण कधी त्या प्रकारचं शिक्षण पुन्हा त्याला मिळालेलं नसतं. आणि शिक्षक म्हणून इथ नवीन असा वर्गच तयार झालाय की त्याला साधारण काहीतरी जमलं नाही, की त्याने शिक्षक व्हावे. ती विनोबांची एक गोष्ट आहे. एक मनुष्य त्यांच्याकडे आला आणि म्हणाला मला आश्रमात रहायचं आहे. विनोबा म्हणाले, 'छान! ये की रहायला, पण आश्रमात काही काम करायला लागते.' 'करीन की.'

'काय करू शकशील? सुतार काम शिकशील का?' तो म्हणाला नाही, पण 'मी शिकवू शकेल.' मग काय कपडे विणायला, चरखा चालवायला शिकवू शकशील का? नाही. हे नाही, ते नाही, मग तू काय करशील. आणि आपल्याला लक्षात आले असेलच की शिकवणे म्हणजे 'काहीही न करणे.' म्हणजे वर्गात बसून पोरांच्या समोर ठेवा. माझ्या पोतडीत जे काही बरं वाईट आहे, ते मी त्यांच्यापर्यंत पोहोचवीन. पोस्टमनचे काम करीन. भयानक स्थिती आहे ही. शिक्षका विषयीची आपली भूमिका काय आहे? आणि हा दर्जाचा प्रश्न तिथे प्रामुख्याने येतो याचं कारण असे की गावामध्ये, जे काही जगात घडते नवंनवं, ते फार मंद वेगाने गावाकडे जाते. हा सगळ्या प्रगतीसंबधीचा प्रश्न

आहे. मग नवे ज्ञान, नव्या कल्पना, नवे विचार, शिक्षण ही अशा तऱ्हेची पहिली पायरी आहे जिथे हे उतरावे लागते. सगळ्या जगातनं सगळ्या कोपऱ्यातनं ज्ञानयावं आमच्या समाजापर्यंत पोहचावं. आता हे एकीकडे आपण भव्य दिव्य स्वप्न मानू आणि दुसऱ्या बाजूला आमचा आदिवासी गावातला एक आदिवासी शिक्षक घेतला. त्याचे काय नाते आहे? काही नाही, काही नवं-जुनं काही येण्याची शक्यता नाही. हा एक प्रश्न आहे. त्यामुळे दर्जाचा प्रश्न अनेकांगाने आला.

या दर्जाच्या प्रश्नाला आणखीन एक परिमाण आहे, ते म्हणजे भौतिक सोयी इतक्या कमी असणं. हे मला कळत नाही की इथे समतेचा कसा हा पेच सोडवावा. मी अलीकडे घटनेत पुन्हा उतरलो, शिक्षणविषयक काही हायकोर्टाचे निर्णय पहायला लागलो आणि माझ्या लक्षात आलं की कोर्टाने असे म्हटलेलं आहे, एकदा सरकारने जबाबदारी शिक्षणाची जर स्वीकारली तर जिथे ते जबाबदारी शिकवतात तिथे सर्वांना समान मिळाव ही त्यांची जबाबदारी आहे. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह जबाबदारी स्वीकारली तरीही समानतेची जबाबदारी ते टाकू शकत नाही.

मग तुम्ही अनुदान देणाऱ्या शाळांना भरघोस अनुदान देऊन माझ्या ठाण्यातल्या शाळेला लॅबोरटरी ५० वर्षापूर्वीच निर्माण करता. आणि इथे लॅबोरटरी निर्माण करण्याची संकल्पनाच अजून आली नाही. मला सांगा, आपण सगळेच अनुभवी आहात किती शाळा संपन्न आहेत आपल्या. लॅबोरेटरी उदा. म्हणून घेतोय. इथ-पासून इमारतीकडे जा. अत्यंत अनाकर्षक, पडले असेल तरी त्याची दुरूस्ती होणार नाही. काहीही नाही. म्हणजे शाळेत जावे असे वातावरण असणार नाही. आकर्षकपणा कसलाही नाही. आणि मग कसलं क्षमता धिष्ठित शिक्षण? जिथे चांगले प्रयोग चालतात तिथे मुलांना बोलवाव नाही लागत. मुले आपणहून येतात. आदिवासी मुलांना शिकायचं नाही, असे मुळीच होत नाही. हे सगळे भ्रम आहेत. मुलांना शाळा आवडली की ते येऊन चिकटतात. आवडणारी शाळा आहे का? हा प्रश्न आहे. मग अंतर्गत ज्यांनी सांगितलेले प्रश्न त्याच्याशी खूप तीव्रतेने जोडले जातात. पण शाळेचं आवडणारे रूप तरी आहे का? भौतिक व्यवस्था तरी आहेत का? हाही भाग आहे.

प्रमाण भाषेवर मी आता बोलत नाही. पण भाषेचा प्रश्न आहेच. उदा. गोंड भाषेकडनं किंवा वारली भाषा प्रमाण भाषेकडं मराठी जायचंय शिवाय आता इंग्रजीकडे जावे लागणार. म्हणजे सगळे अडचणीचं होतंय. त्याच्यातही व्यवस्था लागलेली नाही. त्याच्यावरचा अनुभव एकत्रित करून, त्याचं सामान्यकरण करून त्याच्या पद्धती मांडण्याचे काम फार मंद गतीनं होत आहे.

आपण सगळ्याच लोकांनी त्यात खरं उतरायला पाहिजे. कारण तो नुसता भाषेचा प्रश्न नाही तर हा प्रत्येक विषयाच्या संदर्भात पुढे येत राहतो आणि म्हणून हे सगळ्यांच्या बाबत मला वेगळा मुद्दा आपल्यापुढे मांडायचा आहे, की यात बदल व्हावा, परिवर्तन व्हावे अशी आपली सर्वांची इच्छा आहे. कसं होणार? कोण करणार? अडचण मात्र अशी आहे, की शासकीय अधिकाऱ्यांकडे म्हणजे 'शिक्षणविषयक अधिकारी' असं मला म्हणायचंय. त्यांच्याकडे सगळे शिक्षणाचे अधिकार आहेत. शासनाचा शिक्षणात काम करणारा जो वेगवेगळ्या पातळीवर काम करणारा

अधिकारी आहे त्याला शिक्षण कळतं, हे गृहित आहे. एका अधिकाऱ्याला सगळं कळतं हे गुलामीचेच एक लक्षणं आहे आपण चौकशी नाही करत ना. आपण कधी विचारत नाही ना? डॉक्टरला कधी आपण विचारतो का की इतके बिल का? डॉक्टरला कुठे विचारतो की तुम्हाला नक्की कळतंय ना माझ्या या आजाराच्या संदर्भात? नाहीतर मग तूच सांग मी कुणाकडे जाऊ? असं नाही म्हणत आपण तसंच इथे आहे. सगळं येते आहे असे गृहीत धरतो. आणि तो जर का मार्गदर्शन करणारा असेल, तुम्ही अधिकाऱ्यांची लायकी पाहिलीत का? अधिकाऱ्यांना बेरजा वजाबाक्या पण येत नाहीत. अधिकाऱ्यांना म्हणतोय मी.

शिक्षणाशी संबंधित बाकीच्यांचे सोडा. तालुका पातळीवरील जे काही असतात ते ही त्यांची नावं मला माहीत नाही परंतु त्यांचे असेच आहे सगळे. अशा वेळेस अधिकाऱ्यांना सगळं कळतं, ते मार्गदर्शन करतील ते शिक्षण! ही भूमिका आपण घेऊन स्वस्थ आहोत अजून. आपण असं म्हणणार का, शिक्षण ज्यांना कळतं त्यांनी सुपरव्हिजन करावी किंवा सुपरव्हीजन करतील त्यांना शिक्षण कळावं अशा प्रकारची व्यवस्था आपल्याकडे नाही. शेवटचा मुद्दा मी याच गावपातळीवरचा मांडतो, की जो आपल्यापुढे येत नाही आणि पुन्हा आपल्या सारख्या शिक्षणात असणाऱ्या लोकांना सुद्धा तो नीटपणे लक्षात येत नाही तो म्हणजे बालशिक्षण.

सहा वर्षांच्या आतल्या मुलांच्या शिक्षणाची ९० % तयारी होते. आणि ती अस्तित्वातच नाही खेड्या-खेड्यातन. काही स्वयंसेवी संस्था आपापली शाळा काढतात. अंगणवाड्या म्हणजे बालशिक्षण नाही हे एकदा केव्हातरी समजून घ्या. अंगणवाडीत बालशिक्षण मुळातच १०ऽ असावे असे त्या योजनेत आहे. आणि त्या १० ऽ चं पातळीवर प्रत्यक्ष ०ऽ असतं. आणि सरकार आता अंगणवाड्या जिथे काढतं तिथे असलेल्या शासकीय आणि खाजगी बालवाड्या बंद करतं. कारण शासनाला असं वाटतं की अंगणवाडी म्हणजे बालवाडी. अज्ञान घोर आहे. शासनाला सगळं कळतं हच आपण गृहीत धरतो. ही फार मोठी पेचाची गोष्ट आहे. त्यामुळे मुलांना जर का बालशिक्षण नसेल दत्ताभाऊ सांगतात ते प्रश्न बालवाडीत खूप चांगल्या प्रकारे सुटू शकतात. न शिकवता शिकता येतं मुलांना. अशा प्रकारचे अनेक प्रयोग मुलांना आमचे यशस्वी झाले आहेत.

तिसरीपर्यंत तर मुलांना आम्ही काहीही शिकवत नाही. स्वयं शिक्षण करतात. त्यांची शेकडो साधने निर्माण केली आहेत आणि त्यातनं गणित आणि भाषेच्या बाबतीत ही मुले कुठल्याही शहरी मुलांच्या बरोबरीला आहेत. मी थोडे धाडसाचे विधान असे करेन की काही वेळेस पुढे असतील. हे घडू शकते. धनगरांच्या शाळांमध्ये सुद्धा कितीतरी मुलं पुढे जातात. चांगल्या तऱ्हेने जातात. माझे म्हणणे असे आहे की आपण बालशिक्षणाचा विचार शिक्षणात टाळला आहे, ही सगळ्यात मोठी घोडचूक केलेली आहे, की जी १०० वर्षांपूर्वी घडायला हवी होती.

१०० वर्षांपूर्वी आपल्या प्राथमिक शाळेला इन्फंटचा वर्ग जोडला होता. आपल्याला लॉर्ड कर्झन माहीत आहे. कर्झनशाहीमुळे तो ओळखला जातो. त्याची काहीतरी वाईट प्रतिमा आहे आपल्यापुढे. आपल्याकडे तो पहिला मनुष्य आहे की ज्याने फ्रोबेलच्या पद्धती महाराष्ट्रात म्हणजे

त्यावेळचा जो काही मुंबई प्रांत होता; म्हणून मी आपल्या भाषेत महाराष्ट्र म्हटले. त्यावेळी त्याने आपल्या येथे फ्रोबेलच्या पद्धतीत शिक्षण सक्तीचे केले होते. पुढे ते गेले. मॉन्टेसरी आली. आज आपल्याला त्यातला काहीही पत्ता नाही.

आपण पहिली गोष्ट केली पाहिजे की, तीन वर्षांचे मूल की जेव्हा ते रोजगारात अडकण्याची शक्यता असते तेव्हाच शाळेकडे वळवले पाहिजे आणि बालवाड्या फार सुंदर रीतीने वळवू शकतात. तरच पुढे शिक्षणाचे प्रश्न कमी होणार आहे. माझं असं म्हणणं आहे की या सगळ्यांवर उपाय काय, तर आपण आता उलटीकडून विचार करू, की गावातली मुले किती, बालवाडीच्या वयाची किती, प्राथमिकची किती, पुढचा नाहीच करणार आपण आत्ता विचार. मग त्या मुलांसाठी शाळा कुठे असावी, कशी असावी, काही ठिकाणी एक पुरणार नाही, तर दोन, तीन लागतील शाळा. शाळांच्या विविध फॅसीलेटीज् गावपातळीवर निर्माण करता येतील का? स्वयंसेवी संस्थाही हे करू शकतात. सरकारला पटवणं कठीण आहे; पण आपण आपल्या पातळीवर या गोष्टी करू शकतो. तर एकसंध बालवाडी ते शालांत परीक्षा अशी सबंध गावाची शिक्षण व्यवस्था. गावाचं नियंत्रण त्याच्यावर.

मग त्याला कुणीही बापांनी पैसे देवोत, मगाशी म्हटल्याप्रमाणे पैशापुरते ते संबंध ठेवावेत. गावाच्या अधिपत्याखाली ते शिक्षण कसे येईल हे पहावे लागेल. वाचनालय काय, प्रयोगशाळा काय, जी उदाहरणे मी घेतलीहेत, त्याला शासनाची अनुदाने यावीत, पण गावपातळीवर सर्व मुलांसाठी, सर्व शिक्षकांसाठी व गावकऱ्यांसाठी, जर कोणी शिकलेले असतील तर येवू देत एक वाचनालय गावपातळीवर. गावपातळीवर वाचनालय, प्रयोगशाळा, मैदाने वगैरे मधलीच उदाहरणे मी रिपीट केली. हे सगळं लक्षात घेतलं तर हे होत का नाही? एकतर हे बारके प्रश्न कित्येकदा आपल्यासमोर येत नाहीत आणि दुसरं म्हणजे थोडं व्यापक आपल्यादृष्टीकडे पाहिलं तर दोन-तीन अडचणी दिसतात. एक म्हणजे अजूनही गाव पातळीवर शिक्षण ही गरजेची वस्तू निर्माण झालेली नाही.

माणसाला ज्याची गरज आहे त्याच्या मागे लागून मिळवतो माणूस. मग शिक्षण ही गरजेची वस्तू निर्माण होणे हे केव्हा शक्य आहे? जी काही बरी-वाईट व्यवस्था आहे, त्यातून निर्माण होते, ते जर का छान आहे असे वाटले, उपयुक्त वाटले तर शिक्षण हे हळू-हळू गरजेचे होईल. म्हणजे शिक्षणाची फळे जर का दिसायला लागली तर. झाडाची फळं दिसली तर आम्ही झाड लावणार ना? या झाडाला येतात चांगली फळं. आम्हाला फळ मिळतात शेवग्याच्या शेंगा. सहा महिन्यात मिळतात. केळी मिळतात, वर्षभरात, मग आम्ही लावू ना? शिक्षणाची फळं काय नेमकी मिळतात, याचा विचार व्हावा लागेल. काय मिळवावीत याचा विचार करावा लागेल. या दोन्हीतले अंतर कसे भरून काढायचे याचा विचार करावा लागेल. आणि मग शाळा आकर्षक करण्यापासून काही व्यवस्था कराव्या लागतील. थोडक्यात, अशातऱ्हेचे शिक्षण हे गरजेचे वाटावे अशा तऱ्हेचं रूपच ग्रामीण शिक्षणाचे, आदिवासी शिक्षणाचे नाही, हा एक प्रश्न. दुसरा प्रश्न, आपल्या देशातील मानसिकता अशी आहे. की, गरिबांना सर्व काही

कमी दर्जाचे चालू शकते. याच्यावर केव्हा तरी आघात करावा लागेल आपल्याला. उदा. ग्रामीणांना कमी दर्जाच शिक्षण चालू शकते. कमी दर्जाच्या व्यवस्था चालू शकतात. ग्रामीण भागात घरकुलांची योजना चालावयाची. तर कमी पैशांची चालवायची, ग्रामीण भागात गाई द्यायच्या मोफत आदिवासींना; पण गाय कुठली द्यायची, तीन हजार रूपयांपर्यंत, मग ती दूध किती देणार? ती किती परवडणार? म्हणजे कुठली योजना यशस्वीच होणार नाही. जिथे या योजना ठरतात तिथे विचारच हा, की कमीतकमी काय द्यावे लागेल? हा किमानतेचा जो काही विचार आहे तो जास्तीत जास्त काय दिलं पाहिजे असा विचार होत नाही. मला असं वाटतं की मानसिकतेचा हा प्रश्न आहे. मी स्वयंसेवी संस्था म्हणून काम करतो.

सुरूवातीला आमची अत्यंत अडचण होती कपड्यांची. जे नेहमी करतात ते आम्हीही केले. कपडे गोळा करायचे शहरातून. शहरातले लोक कपडे कसे द्यायचे, तर ती एक शाल; इंद्राच्या अंगावर जेवढी भोकं होती. त्याच्यापेक्षा एक जास्त असलेली एक शाल मी आमच्या इथं बराच काळ लावून ठेवलेली होती की माणसे दान काय करतात? अतिशय वाईट वृत्ती आहे. हे चालतं, आदिवासींना कपडे देणार आहेत ना. मग आमच्याकचं घेऊन जा. एकदा एक बाई मला म्हणाली किती दिवस झाले मी तुम्हाला सांगते, तो कचरा एकदा उचला माझ्या घरचा. ती एका मंत्र्याची बहीण होती, वसंत साठ्यांची. सांगायला काय हरकत आहे. त्यामुळे ग्रामीणांना व गरिबांना कमी दर्जाचं चालतं अशी मानसिकता आपल्यात आहे. तिसरं मघाशी मी सांगितलं की, शासनाला आणि शासकीय अधिकाऱ्याला शिक्षण कळते हे गृहीतच आहे आणि ते चुकीचं आहे. ते तपसावे लागेल आपल्याला. ४५ वे आणि ४६ वे कलम एकत्रितरित्या वाचून एकत्रित कृती करायला हवी. ४६ वे कलम काय आहे, हे मी मुद्दाम लिहून आणले आहे ते नीट ऐका. ४५ वे कलम आपल्याला माहीत आहे- मूलभूत हक्क द्यावे, शिक्षण सक्तीचे व मोफत करावे.

४६ वे कलम असे म्हणते, समाजातील मागास वर्ग, खास करून दलित व आदिवासी यांच्या शैक्षणिक व आर्थिक हिताकडे खास लक्ष पुरवले जाईल. व त्यांचे अन्यायापासून व सर्व प्रकारच्या शोषणांपासून संरक्षण केले जाईल. अन्यायी अशी जी काही शैक्षणिक व्यवस्था आहे यातून जे आदिवासींचे शोषण होते, हा शोषणाचा मुद्दा आपण कधी ऐरणीवर आणलाय का? कमी दर्जाचं शिक्षण यातनच मूळ आमचं शोषण होतंय. आणि ही अन्याय गोष्ट आहे. आणि घटनेतील मार्गदर्शक तत्व असे म्हणतंय की हा अन्याय होणार नाही याची व्यवस्था आम्ही करू.

थोडक्यात, आधीच्या सर्व गावपातळीवरच्या अडचणीतनं मी शेवटच्या या मुद्याकडे येतो की, शैक्षणिक शोषणं नावाच जे शोषण आहे, या शोषणाच्या संदर्भात घटनेचा आधार घेऊन, मार्गदर्शक तत्वाचाच आधार घेऊन, आपल्याला काही मांडणी करायला लागणार आहे. त्याचा विचार करावा लागणार आहे. तरच आदिवासी शिक्षणाकडे जरा वेगळ्या दृष्टीने आपण पाहू शकू.

## बाळ कोळेकर

मी सातारा जिल्ह्यात पाटण, जावळी या तालुक्यांच्या मध्ये जे वंचित समूह आहेत विशेषतः धनगर समाज, डोंगरमाथ्यावरचे, कुणबी आणि काही भटके समाज यांच्यामध्ये गेली २५ वर्षे ग्रामीण विकासाचे काम करतो. मी स्वतःही याच समाजातून आलेला एक कार्यकर्ता आहे आणि माझ्या शिक्षणाची, माझ्या कामाची सुरूवात 'शिक्षण' याच एका विषयापासून झाली. कारण त्या संपूर्ण परिसरामध्ये, दत्ता भाऊंना माहीत आहे, धनगर समाजाची चिपळून तालुक्याची परिस्थिती आहे तीच पाटण जावळी आणि सर्व ठिकाणी आहे. आणि मी स्वतः धनगर समाजातला आहे. त्यामुळे मी १९७५ साली पहिला पदवीधर झालो.

पहिला चौथी मीच व पहिला एस.एस.सी. सुद्धा मीच होतो. ४० मैल गावापासून दूर शाळा. शिक्षणाचे त्या काळातले असलेले प्रश्न यांच्यातून असं वाटलं की ग्रॅज्युएशन झाल्यानंतर नोकरी करावी ती सुद्धा लागली. इथल्या काही स्थानिक लोकांच्या मदतीने. परंतु आपण नोकरी न करता इथल्या लोकांच्यासाठी काहीतरी करावे, आपल्या लोकांसाठी काहीतरी करावं, अशी मनामध्ये तळमळीची इच्छा होती त्यामुळे नोकरीपण सोडली आणि गावामध्ये काहीतरी विकासाचे काम करायचे, या लोकांसाठी. त्यावेळेला आपणापैकी बऱ्याच लोकांना माहीत आहे, आपण सर्व कार्यकर्ते आहात. तुम्हाला सुद्धा माहिती आहे की एखादे काम सुरू करताना बरोबर कुठून आणि कसं सुरू करायच हा त्यावेळचा मोठा प्रश्न असतो. आणि मला सुद्धा काही वेगळा नाही, ज्यावेळेला शिक्षण घेतलं त्यावेळेला कराव्या वाटल्या पण आता प्रत्यक्ष करण्याची जी वेळ आली तेव्हा कसे आणि कुठून सुरू करायचे आणि आपल्याला माहित आहे की स्थानिक लोक असल्यानंतर काही फायदा असतो. स्थानिक परिस्थितीची माहिती असते. स्थानिक प्रश्न माहिती असतात. स्थानिक लोक माहिती असतात. परंतु त्याचबरोबर स्थानिक माणूस असल्यामुळे त्याचे तिथे काही सामाजिक स्टेटस पाहिजे त्या लोकांबद्दल, ते तिथे नसते. त्यामुळे त्या मोठ्या अडचणी असतात. लोक म्हणतात की हा सातारचा पोरगा, इथला वगैरे इ. त्याचं काय ऐकायचं. हा ह्याच्या समाजातला वगैरे वगैरे.

पहिल्यांदा जे सहा महिने गेले ते गावपातळीवर फिरणं आणि लोकांना समजावून घेणं की बाबा इथं काय करायला पाहिजे. कारण माझी पहिल्यापासून अशी भूमिका होती की प्रश्न लोकांचे जे आहेत प्रश्न तेच माझे आहेत. त्यामुळे काय करावे आणि म्हणून लोकांनी प्रश्नांची यादीच्या यादी दिली. की इथं वाहतुकीची साधने नाहीत. कारण बराचसा भाग हा कोयनेचा बॅक वॉटर एरिया याच्यात अडकला आहे, त्यामुळे चालवे लागते. उत्पादनाला मार्केटची सोय नाही. आरोग्याची सोय नाही वगैरे वगैरे प्रश्न. पण या सर्व प्रश्नांच्या संदर्भात मी काही करू शकत नव्हतो. पण या सर्वांच्यामध्ये जी काही प्रश्नावली मी काढली लोकांची, मग व्यक्तीगत चर्चेमधून असेल, सामुदायिक चर्चेमधून असेल, मग मिटिंगमधून असेल, त्याच्यात एक प्रामुख्याने सर्वांचा जो प्रश्न आला की 'मुलांना शिक्षण'.

या संपूर्ण दऱ्याखोऱ्याच्या भागामध्ये प्राथमिक

शाळा जवळ जवळ कुठेच नव्हत्या, मग मुलांना शिक्षण कुठुन मिळणार? कारण माझे शिक्षण झाले, ते माझे वडील मिलेटरीमध्ये असल्यामुळे बाहेर शहरामध्ये झाले. मग मी असं ठरवलं की लोकांना असं वाटतं की आपल्या मुलांना शिक्षण मिळालं पाहिजे. हे पहिल्यांदा मी असं जाणून घेतलं. हे जे लोक आहे यांचे अनंत प्रश्न असले तरीसुद्धा त्या सर्व प्रश्नांमधून या लोकांना ह्यांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे हे महत्त्वाचं वाटतं. मग मी जाणून घेतलं की असे का वाटतं? मग त्यांची एक समज, आम्ही आमचे हे काबाडकष्ट करून जगतो, पण शिक्षण घेतलं तर आमची मुलं बाहेरच्या जगामध्ये जातील, त्यांना जगातलं कळेल, लिहिता वाचता येईल. मग आम्ही जे काबाडकष्ट करतो ते आमच्या पद्धतीने, उद्या त्यांच्या वाट्याला येऊ नये आणि बाहेरच्या समाजात गेल्यावर जे काही त्यांना दिसत होते, तशी आमची मुलं पण होतील.

आणि दुसरा जो भाग मी पाहिला की हे वंचित समाज सर्व ठिकाणी आहेत. विशेष आदिवासी आहेत, भटके विमुक्त आहेत, ह्या लोकांच्याकडे साधनं म्हणजे ज्याला आपण संपत्ती म्हणू फार कमी आहे. तर ह्यांच्याकडे काय आहे. एक तर मुलं हीच यांची साधन-संपत्ती आहे आणि ते त्यांच्यावर फार प्रेम करतात. आणि मुलं त्यांची आयुष्याची पुंजी असल्यामुळे त्यांचे जे प्रेम आहे किंवा त्यांच्या जीवनाचे जे उद्देश आहेत म्हणजे जगायचं कशासाठी तर आपल्या मुलांसाठी जगायचं. असाच एक दृष्टिकोन. त्यांचे भले व्हावे, त्यांचे चांगले व्हावे म्हणून त्यांना असं वाटतं की मुलांना शिक्षण मिळालं पाहिजे म्हणून काहीतरी केलं पाहिजे. त्यादिवशी जो पहिला मुद्दा माझ्या लक्षात आलं.

मग मी असं ठरवलं की आपण जर लोकांची गरज आहे, जिथे मी राहतो, तिथे शिक्षणासाठी मला काहीतरी काम केल पाहिजे. ही १९७६ ते ७७ ची गोष्ट आहे. पण मी विचार केला की काय करूया? कारण मीच त्या संपूर्ण परिसरात वाढल्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटलांची रयत शिक्षण संस्था माझ्या डोळ्यासमोर होती. आणि काही माझे मित्र सुद्धा होते. त्यांना असे विचारले की, बाबा मग शाळा सुरू करायला पाहिजे का? कशी शाळा सुरू करायची? आपण शिक्षक व्हायचे आणि मुलांना शिकवायचं. असा एक पहिला चांगला विचार डोक्यात आला. माझं एक गाव आहे डिचोली म्हणून आहे, तिथे जायचे तर ४० मैल चालत जावे लागते. अशा अनेक ठिकाणी शाळा सुरू करायची. तिथं मुलांना शिकवायचे, मग एका गावामध्ये.

मग ह्या सर्व गोष्टीचा, मी जे करतो त्या सर्वांचा सरकारी ज्या शाळा आहेत त्यांच्याशी काय संपर्क होणार? मुलांच रेकॉर्ड काय होणार? वगैरे असे प्रश्न माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले. लोक किती दिवस मला सांभाळणार? बरं एका गावात मी शाळा सुरू केली, तर हा शिक्षणाचा प्रश्न लोक म्हणतील त्या पद्धतीने सुटणार आहे का? मग ह्या सर्व प्रश्नांचा विचार केल्यावर मला नंतर असे लक्षात आले की असे शक्यच नाही. आपली काम करायची पद्धत कुठतरी चुकते. मग असा विचार मी केला, आपण असं का करू नये, प्राथमिक शिक्षण हे गावोगाव शासनामार्फत दिले जाते, म्हणजे शाळा सुरू केल्या जातात.

मग ह्या प्राथमिक शाळा गावोगाव सुरू करण्यासाठी लोकांना का आपण प्रवृत्त करू नये. कारण तो त्यांचा एक हक्कच आहे. आता त्यात भले-बुरे बऱ्याच गोष्टींची चर्चा झाली. तो एक वेगळ्या पद्धतीचा विषय; पण असणारी सरकारची सुविधा एक हक्क म्हणून आपल्याला का मिळू नये? पहिल्यांदा मी काम सुरू केलं लोकांना जागृत करायचं. प्राथमिक शिक्षण हा आपल्या मुलांचा हक्क आहे. तो प्रत्येक गावात आपल्याला मिळाला पाहिजे. यासाठी आपल्याला काय करायला पाहिजे तशी कामाला सुरूवात केली. आणि दोन वर्षांमध्ये पहिल्या पाच शाळा शासनाकडून मान्यता प्राप्त करून घेतल्या. आणि याच्यामध्ये बऱ्याच काही गोष्टी घडल्या. जी पहिली गोष्ट घडली ती म्हणजे बरीच वर्षे धरण झाल्यानंतर ते लोक एकदम संपर्कापासून दूर पडले. त्यांचा कुणाशीही संपर्क नव्हता. त्यांना असं वाटत होतं की आपल्यासाठी काही होणार नाही. आणि आपल्यासाठी कुणी काही करू शकणार नाही.

इथं शाळा सुरू झाल्यावर शिक्षक गावात आले, हे कसे आले तर आपण हा प्रयत्न केला म्हणून. याचा अर्थ आपण अजून काहीतरी करू शकतो. त्यांचा जो स्वतःच्या विकासाच्या बद्दलचा आत्मविश्वास संपूर्ण संपला होता, तो एकदम दुणावला आणि पाच प्राथमिक शाळा सुरू झाल्या. दुसऱ्या गावातल्या लोकांनी विचारले तुम्ही शाळा कशा सुरू केल्या. त्यांनी सांगितलं असं केले, या पद्धतीने केले. प्रत्येक गावातील लोकांच्यामध्ये चळवळ सुरू झाली, आपल्या गावात प्राथमिक शाळा सुरू करायची. आनंदाची गोष्ट सांगतो, आता दीडशे प्राथमिक शाळा संपूर्ण परिसरात आहेत. आणि सर्व शाळा, प्राथमिक शाळा म्हणून चालवताना असणारे अंतर्गत प्रश्न बरेच आहेत आता चर्चा केली ते प्रश्न सर्व ठिकाणी छोट्यामोठ्या प्रमाणात उभे राहतात. हा शाळेचा व शिक्षणाचा प्रवास झाला.

नंतर दत्ताभाऊ आणि पानसेभाऊ हे शिक्षण याविषयात काम करतात. मी बाकीच्या विषयात ग्रामीण विकासाचं काम करतो. त्याच्यामध्येही इन्कम जनरेशनचे विषय आहेत. लोकांना स्थानिक साधनसामुग्रीपासून आर्थिक उत्पादनातील साधने उपलब्ध करून देणे जंगल, जमीन, पाणी वगैरे मी फार काही काम केले नाही. सरकार आपआपल्या पद्धतीने करते आहे. परंतु बरेचसे काम केल्यानंतर २२ वर्षानंतर एक गोष्ट माझ्या लक्ष्यात आली. हे सर्व आपण केलं. इतकी वर्षे शिक्षण गावोगावी केले. शाळा सुरू झाल्या, रस्ते सुरू झाले, पिण्याचे पाणी सुरू झाले, या शासकीय योजना बऱ्याचशा लोकांकडे पोहोचल्या आहेत. परंतु जे पहिलं काम आपण सुरू केले, १९७६-७७ मध्ये शिक्षण. त्याची आज गावपातळीवरची अवस्था काय आणि त्याच्याबद्दल लोकांचा विचार काय आहे.

याचा एकूण रिव्ह्यू घेण्याचे काम मी १९९४ साली केले, तेव्हा मला एक गोष्ट लक्षात आली की, बऱ्यापैकी जागृती झाली आहे. म्हणजे असं सांगता येईल की, माझ्या गावात मी पहिला चौथी व पहिली सातवी झालो. आज त्याच गावात २१ पोरं ग्रॅज्युएट झाली. बाकीच्या ठिकाणी चौथी पाचवीपर्यंत चांगली शाळा झाली आहे; परंतु बऱ्याचशा ठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, चौथीपर्यंत मुलं शिकली, थोड्याफार प्रमाणात त्यामध्ये अडचणी आहेत, दर्जाच्या आहेत.

बाकीच्या गोष्टी प्राथमिक, ज्या सरांनी गोष्टी सांगितल्या त्या सर्व अडचणी आहेत; परंतु चौथीनंतर पुढे शिक्षण होत नाही. याचं कारण मुलांची, तसेच पालकांची इच्छा आहे की आपली मुले शिकावित; पण मुले पाठवायची कुठे? जवळपास कुठेही शाळेची सोय नाही. आणि मग चौथीनंतर ही मुलं जवळ जवळ शाळा सोडतात आणि बालमजुरी म्हणून कुठेतरी कामाला लागतात.

ही एक बाब. दुसरी बाब अशी झाली की त्यातूनही काही पालक, आश्रमशाळेतून, त्यानंतर आपल्या वसतीगृहांतून मुलं तालुक्याला ठिकाणी पाठवून शिकवण्याचा प्रयत्न करतात; परंतु मुलींचे (महिलांचे) जे शिक्षण आहे, ह्याच्यावर माझंही लक्ष नाही. यावर कोणता विचारही होत नाही आणि त्याविषयी पालकसुद्धा विचार करत नाहीत. अन्य लोक सुद्धा विचार करत नाही. ही दुसरी बाब लक्षात आली.

आमच्या श्रमजीवी संस्थेची कामाची पद्धत आहे की लोकांना एकत्र करून त्यांना काय वाटतं हे विचारायचं आणि त्यांच्या सहभागातून पुढे काम करणे. मग मी सर्व लोकांची एक बैठक बोलावली आणि या बैठकीमध्ये जी काही नियोजनाची कामे होती आपण चांगल्या पद्धतीने केली. त्यामुळे हे बदल झाले, हे परिवर्तन झाले, पण शिक्षणाचे जे मूलभूत काम आहे आणि ज्यामुळे असे वाटले होते की शिक्षण हा एक व ग्रामीण विकासाचा, परिवर्तनाचा भाग आहे, तर ते काम कुठेतरी थांबल्यासारखे वाटते. त्याची संपूर्ण जी परिस्थिती आहे कार्यकर्त्यां समोर मांडली. मला जे दुसरं जाणवलं, की मी ज्या वेळेला शिकलो त्यावेळेला असा विचार करत होतो की ह्या लोकांचे इतके प्रश्न आहेत आणि यांच्यासाठी आपल्याला काम करायला पाहिजे, ही सुरवातीची गोष्ट, पण याच्यापैकी कोणच का असा विचार करत नाही की हे यांचे प्रश्न आहेत म्हणून. ते प्रश्नांना प्रश्नच समजत नाही ते. कारण त्यांचं ते, जसे सरांनी आता सांगितलं की नावाच्यामध्ये हाक मारणे एकेरी नावाने, त्यांना माहिती आहे की पाटील आपल्याला एकेरीच नावाने हाक मारणार. त्यामध्ये आपण विचार करणे किंवा करण्यासारखं काय आहे.

म्हणजे जे घडते तेच बरोबर आहे, असं त्यांना वाटतं. प्रश्न हे प्रश्नच वाटत नाही. मग मला त्यावेळेला हे जाणवलं की हे मला कळण्याचं कारण असं की मला शिक्षण मिळालं आणि म्हणून मला विचार करण्याची गती मिळाली. म्हणून मला असं वाटतं की या समाजाला जर विकसित करायचे असेल तर त्याला विचार करायला लावलं पाहिजे. विचार करण्याची प्रक्रिया ही शिक्षणापासून सुरू होणारी प्रक्रिया आहे असा त्यावेळेला माझ्या मनामध्ये विचार आला. आणि म्हणून मी ह्या विषयात जरा जास्तीचं काम केले आणि म्हणून मला मनापासून पटलेला विषय घेतला होता. नंतर मी कार्यकर्त्यांची बैठक घेतली आणि त्यांना समजून सांगितलं.

चौथीनंतरची जी परिस्थिती आहे की कुठेही मुलं शिकत नाहीत. पुढच्या शिक्षणाचा जसा आता सरांनी सांगितलं की माध्यमिक शिक्षणाचा मोठा प्रश्न आहे. जो काही आम्ही छोटासा अभ्यासात्मक जो सार काढला होता, त्यामध्ये दोन-तीन गोष्टी समोर आल्या. एक, प्राथमिक गावपातळीवर ज्या

काही शासनामार्फत सुरू केलेले प्राथमिक शिक्षण आहे ते मजबूत करण्याची गरज आहे. मजबूत करणं म्हणजे शिक्षक आणि पालक यांच्यामध्ये जो दुरावा आहे. शिक्षक आणि सरकार आणि जे काही सरांनी सांगितलं की शाळा कुणाची सरकारची आहे. तर ही शाळा आमच्या मुलांसाठी सरकारची आहे, हा भाव लोकांच्यामध्ये यायला पाहिजे ह्या दृष्टीने काही उपक्रम घ्यायला पाहिजेत मूळ मुद्दा की गावामध्ये लोकांच्या शिक्षणाविषयी जागृती निर्माण करण्याची गरज आहे.

शाळा सुरू आहे. पण त्या व्यवस्थित चालत नाहीत. त्याचं कारण काय मला प्रामुख्याने मला जे दिसले की सरकार जबाबदार असेल, शिक्षक जबाबदार असेल, ही एक गोष्ट आहे. त्यांना ठीक करणं थोडी दूरची गोष्ट आहे. पण गावातल्या लोकांच्या काही जबाबदाऱ्या आहेत. त्यांनी त्याच्या संदर्भात जागृत होऊन त्यांची काही कर्तव्य आहेत, त्या संदर्भात प्राथमिक स्वरूपात जर विचार केला तर, शिक्षक आणि सरकार त्या मार्गे ठीक व्हायला थोडीशी मदत होईल, अशी आमची धारणा आहे. म्हणून गावपातळीवर पालकांच्यात शिक्षणासंबंधी जागृती निर्माण प्रक्रिया सुरू करण्याची गरज आहे हा पहिला मुद्दा. मुलींना शाळेत पाठवलं पाहिजे, त्यानंतर शिक्षकांच्या अडचणी ज्या असतात, त्यांच्याविषयी विचार केला पाहिजे.

शिक्षकांना जर इतर मोकळ्या वेळात कशाप्रकारे गावात गुंतवले पाहिजे वगैरे वगैरे सर्व गोष्टी पालकांच्या काही जबाबदाऱ्या आहेत त्यासंबंधी, त्यानंतर दुसरा मुद्दा असा लक्षात आला की मग ही आता चौथी पास मुलांच्या शिक्षणाचं काय करायचं. हा संपूर्ण साधारण इथं ५ हजार कुटुंबं असणाऱ्या विभागाला तो प्रश्न आहे. मग गावोगाव आपण काय हायस्कूल सुरू करू शकत नाही. सरकार सुरू करू शकत नाही. मग काय करू शकतो आपण, तर तालुक्याच्या वेगवेगळ्या ठिकाणी कुठं वसतीगृह असतील आणि आश्रमशाळा असतील अशा ठिकाणी आपली मूलं पाठवण्याची आपण व्यवस्था करू. यासंदर्भात अनेक लोकांच्याकडून नकारात्मक उत्तरे आली. कारण त्याठिकाणी असणारी व्यवस्थाही मुलांना पोषक नाही आणि आमची मुलं त्या ठिकाणी पाठवणार नाही असं त्यांनी सांगितलं. कारण ते आपल्या मुलांवर फार प्रेम करतात, त्यामुळे काही लोकांनी पाठवलेल्या मुलांच्या संदर्भात जे अनुभव आले आणि वसतीगृह आणि आत्ताच्या ज्या आश्रमशाळा आहेत या व्यावसायिक पद्धतीने चालविल्या जातात. की त्यातून जास्तीत जास्त आर्थिक फायदा कसा होईल. मुलं शिक्षण किती घेतील याचा कोणी विचार करीत नाही.

या आश्रमशाळा ज्यावेळेला दिल्या गेल्या, मी पण त्या आश्रम शाळेसाठी ॲप्लिकेशन केलं होतं आणि चांगल्या पद्धतीने प्रयत्न केला तर असं लक्षात आलं की तुम्ही ५ लाख रू. देणार असाल तर तुम्हाला आश्रम शाळा देतो. तुमचं कितीही काम चांगलं असो पण ५ लाख रूपये द्या. सर्व देतात. एवढं माझं काम चांगलं आहे. सर्व गोष्टी माझ्याकडे आहेत पण एवढे पैसे मी कुठून देणार? ते म्हणाले साधे गणित आहे, एक गोष्ट आश्रमशाळेत तुम्हाला १३, १४ लोकांचा स्टाफ मिळतो. प्रत्येक माणसाकडून ५० हजार रूपये घेतले तर तुमच्याकडे किती पैसे होतील? ६ लाख रू. झाले. आणि महिन्यासाठी तुम्हाला आणखीन

सेविंग्ज करता येईल? मग तुम्हाला तोटाच काय? याप्रकारची जी धारणा आहे, या सर्व गोष्टींच्यामध्ये याला कोण दोषी आहे? कोण नाही हे आपल्याला सर्व माहिती असणारा प्रश्न आहे. लोकांचं असं मत पडले की आश्रम शाळा व वसतीगृहांची अवस्था अशी आहे. मुलांच्याकडे कोणीही देखभाल करत नाही. तिथे आपलेपणा राहात नाही. त्यामुळे आम्ही आमची मुलं तिथ पाठवणार नाही.

मग मी म्हटलं आपण काय करू या? तर काही लोकांनी असा प्रश्न काढला. आपणच का नाही आपली शाळा तालुक्याच्या पातळीवर चालवू नये! कसं तर आपण समजा, पाटण आहे इथे सर्व शाळा आहे. इथे आपणच एक वसतीगृह काढूया की. आणि त्या वसतीगृहात मुलांना खायला प्यायला घालूया आणि ती मुले जवळच्या शाळेत पाठवू या. कल्पना आवडली, या सर्व गोष्टींची, लोकांची. पण यासाठी खर्त तर काही लोकांचा जेवढं सांगितलं की मुलांना आम्ही घरी खायला घालतो तेवढ्या पद्धत्तीने आम्ही तुम्हाला देऊ आणि बाकीचा जो भाग आहे या पद्धतीने थोडाफार वेगवेगळ्या पद्धत्तीने बाहेरून काही मुलं तालुक्यात येतात यांच्यावर विचार करू.

ही लोकांची, लोकांच्या मधून आलेली मूलभूत कल्पना होती. याला थोडासा आम्ही १९७५ साली आकार देण्याचा प्रयत्न केला. आणि मग त्याच्यामध्ये आकार देत असताना असे केले की संपूर्ण लोकांना एकत्र करून त्यांचा एक ट्रस्ट बनविण्याची योजना आखली आणि त्यांना सांगितले किती लोक यामध्ये सभासद होण्यास तयार आहेत आणि पैसे देण्यास तयार आहेत. तुम्हाला आश्चर्याची गोष्ट सांगतो, वीस लोकांनी पाच-पाच हजार रूपयांची देणगी दिली. कर्ज काढून त्यातल्या ऐंशी ८० % लोकांनी मदत केली. शंभर-शंभर असे अनेक लोकांनी दिले. असे दीड लाख रूपये जमा झाल्यानंतर पाटणला तालुक्याच्या ठिकाणी एक एकर जागा खरेदी केली. एका फंडींग एजन्सीला सांगितल्यानंतर त्यांनी चार लाख रूपये बिल्डिंगला दिले आणि काही डिपॉझीट दिले. की त्याच्या व्याजावर थोड्या मुलांचा खर्च भागविता येईल.

त्यानंतर सरकारने काही पैसे दिले आणि अशा पद्धतीने आता साडेतीन हजार स्क्वेअर फूट मोठी इमारत तेथे उभी राहिली आहे. आणि याठिकाणी चाळीस मुले ५ वी ते १० वीपर्यंत शिक्षण घेत आहेत. त्यांचा काही खर्च त्यांच्या पालकांकडून येतो, तर काही सोसायटी कडून येतो. काही समाजातील लोक त्यांना धान्य गोळा करून देतात वर्षाचे. त्यांच्यावर त्यांचा निम्मा खर्च चालतो. त्यानंतर मध्यमवर्गीया लोक म्हणजे डॉक्टर, वकील, इंजिनिअर आहे त्यांना आम्ही मुलं दत्तक देतो. आपल्या पुण्यामध्ये देखील असे बरेच लोक आहेत, अशाप्रकारे आमच्याकडून हे घेणारे. त्यांच्याकडून आम्ही खर्च भागवतो. आणि याप्रकारे आम्ही तेथे वसतीगृह चांगल्या प्रकारे चालवतो. ही मुले इतर शाळेतून शिकतात.

आता जे शिक्षणाचे इतर जे प्रश्न आहेत त्यांची बरीचशी चर्चा केली, हे या माध्यमातून थोडेसे मुलांच्या मानसिक समस्या सुटण्याला मदत होते अशा प्रकारचा माझा अनुभव आहे. त्यापैकी पहिला अनुभव असा आहे मुलांना तेथे आवड निर्माण होते. त्यांना तुम्ही जर जाऊन विचारले की तुम्हाला इथे रहायला बरे वाटते? तर सर्वांना

असे वाटते की इथे रहायला बरे वाटते. कारण ही सर्व मुले त्यांच्या परिसरातील त्यांच्या परिचयाची असतात. त्यामुळे ती एकत्र राहतात. दुसरी गोष्ट तेथील जे व्यवस्थापन आहे हे त्यांच्या परिचयाचे असते. तिथला डे-टू-डेतला संपर्क आहे. तो त्यांच्या पालकांचा त्यांच्याशी होत असतो. आणि तिसरे शिक्षण ही जी बाब आहे, या सर्व विषयांच्या संदर्भामधले उच्चार केला जातो, जी चर्चा केली जाते, तर जे जे विषय त्यांना अवघड वाटणारे आहेत ते सोपे करून सांगण्याच्या संदर्भात काही वेगळे प्रयत्न केले जातात.

त्यांच्यामध्ये शिक्षणतज्ञ आम्ही नाही, त्यामुळे त्यासंदर्भातल्या काही गोष्टी फार आम्ही करत नाही; पण आठवड्याला शाळेत भेट देणं, शिक्षकांना त्या मुलांच्या प्रगती संदर्भात समजावून घेणे, त्यानंतर वसतीगृहात ट्यूशन सुरू करणे आणि वेगवेगळ्या पद्धत्तीने त्यांच्यावर आपलेपणाचा संस्कार करण्याचा प्रयत्न करणे. याच्यामध्ये आरोग्या पासूनच्या सर्व गोष्टी, त्यांचे जेवण वगैरे याची देखभाल केली जाते. आता असा प्रश्न पुढे यायला लागला आहे, सर्व गोष्टींमधून की, ही मुलं चांगल्या पद्धत्तीने राहतात. लोक चांगल्या पद्धत्तीने हे युनीट चालवतात; परंतु भविष्यामध्ये दहावीनंतर, बारावीनंतर पुढे मुले कुठं जाणारं? काय करणार? यादृष्टीने थोडासा विचार सुरू झालेला आहे, की त्यांच्या आसपास ज्या गोष्टी घडतात, त्यांच्या घरी काही अशा प्रकारचे व्यवसाय करतात. मग शेती विकासाचा असेल, दूध विकासाचा असेल, बकरी पालनाचा असेल, नर्सरी असेल, आरोग्य संदर्भाच्या असतील. या संदर्भाच्या शिक्षणाचा समावेश या शिक्षण पद्धत्ती मध्ये करावा की जेणे करून ही मुलं दहावीनंतर गावामध्ये गेल्यावर त्यांच्या घरच्या काही कामासाठी त्यांच्या ज्ञानाचा व बाकीच्या गोष्टीचा उपयोग होईल असा एक विचार सध्या पुढे यायला लागला आहे. या संदर्भामध्ये श्रमजिवी संस्था जे काम करते या संदर्भाचे जास्ती मोठं काम श्रमजीवी संस्थेचा याच स्वरूपाचे आहे. प्रात्यक्षिक स्वरूपात विद्यार्थ्यांना एक प्रशिक्षण चांगल्या पद्धत्तीने देऊ शकतो. माझा शिक्षणाचा थोडक्यात अनुभव आहे की, मला असे वाटते की, आज अशी गरज आहे या सर्व गोष्टींच्या दृष्टीतून, बरेच काही चर्चा करण्यासारखं आहे, शिक्षणावर. बरेच काही घडतंय यावर अनेक ठिकाणी विचार होतो.

पण आज जो विचार आहे विकासाचा, तो लोक आपल्या विकासासाठी स्वतः काय करू इच्छितात. आणि त्या दृष्टीने त्यांना मदत करण्याची, मार्गदर्शन करण्याची आणि त्यांच्या बरोबरीने जाण्याची आज कार्यकर्त्यांना गरज आहे कारण संस्थांच्यावर व कार्यकर्त्यांवर अनेक दृष्टिकोनातून लिमिटेशन्स यायला लागलीत, त्यांच्या कामामध्ये. वेगवेगळ्या पद्धत्तीने. म्हणून हा जो आम्ही छोटासा प्रयोग शिक्षणात करतोय की लोकांनी आपलं जे शिक्षण आहे, हे आपलं शिक्षण म्हणून कसं करावं मला, वाटतं जे दत्ताभाऊ आणि पानसे यांनी जे मुद्दे मांडले यांमध्ये शिक्षणाचा जो विचार आहे मुलभूत, तो जर लोकांनी या पद्धत्तीने शिक्षणाचे काम करायला सुरूवात केली, तर हे प्रश्न आस्ति-आस्ति सुटण्यास मदत होईल. मला अस वाटतं की हा जो माझा छोटासा प्रयोग आहे यामध्ये आम्ही केलेल्या कामाची जर एक बाजू दिसत असली तरी त्यांच्यात, बऱ्याचशा

त्रुटी सुद्धा आहेत. आपणांपैकी विशेषतः शिक्षक म्हणून क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी जर जर या पद्धतीच्या कामात आम्हाला थोडी मदत केली, तर हा जो छोटासा प्रयोग आहे. तो पुढे नेण्यासाठी सुद्धा आम्हाला मदत होईल. दुसरं एक महत्त्वाच राहून गेलं की या शिक्षणाच्या कामासाठी जो मध्यम वर्गीय लोकांचा सहभाग आम्हाला जो अपेक्षित होता, तो अपेक्षेपेक्षा जास्ती आहे. त्याचं कारण असं की आम्हाला असं जाणवलं की विकासामध्ये शिक्षण ही बाब लोकांना लवकर समजते. तुम्ही शिक्षणासाठी काही करताय ना तर लोक तुम्हाला मदत करणार.

आणि त्यामुळे तिथे असणारा वीस हजार दर महिन्याचा जो खर्च आहे हा संपूर्ण तिथल्या लोक सहभागातून चालविला जातो. आणि त्यामध्ये स्थानिक लोकांचा २५ऽ सहभाग असेल, तर ७५ऽ हा आसपासच्या लोकांचा वाटा आहे. माझ्या दृष्टीने आणखीन महत्त्वाचा भाग आहे की आपण जिथे काम करतो त्या आपल्या आसपासच्या लोकांना आपण काय करतो हे माहीत नसते. या पद्धतीने तिथे असणारे डॉक्टर, वकील, व्यापारी यांना जर आपल्या कामात जर त्यांचा सहभाग वाढला तर त्यांचा ग्रामीण विकासात सहभाग वाढेल आणि आपण जो ग्रामीण विकासाचे काम करतोय जी चळवळ करतोय त्यामध्ये त्यांचा सहभाग वाढला तर ती आणखीन तेजीने पुढे जाण्यास मदत होईल. असा माझा स्वतःचा अनुभव आहे.

## चर्चा

*एक आदिवासी शिक्षक :*

सरांनी सांगितल्या प्रमाणे ४५ कलम सांगितले आहे. ४५ कलमानुसास सार्वत्रिक मोफत शिक्षण असं म्हटलेलं आहे. तेवढंच सत्य आहे. पण त्याला जोडून जे ४६ कलम म्हटलेल आहे त्याला एकूण शैक्षणिक दृष्टीकोनातून होणारा अन्याय आहे ज्याला आपण परंतु आम्ही जनरली ज्या संस्थेत आम्ही कार्यरत आहे त्याठिकाणी जवळपास ९९% एस. टी. विद्यार्थी आहेत. त्या ठिकाणी त्यांना शिष्यवृत्ती जवळपास ११० रू दरमहा असते. आणि त्याच्या मोबदल्यात आम्ही क्लब चालवत असतो. आजची जर महागाई पाहिली तर ११० रूपयांत पोरांचं दोन दिवसाच जेवण सुद्धा होत नाही. तर आपल्या या संस्थेमार्फत ह्या संदर्भात काही चर्चा करता आली आणि काही तोडगा काढता आला तर निश्चितच चांगलं होईल.

*रमेश पानसे :*

या प्रश्नाचे उत्तर नाही माझ्याकडे; परंतु मला असे वाटते मी विचारांची दिशा आता बदलायला हवी. सर्व सरकारवर अवलंबून राहिलो आणि सरकारची हांजीहांजी करत राहिलो तर तुमचे प्रश्न कधीही सुटणार नाही. सरकारला शिक्षणाच्या बाहेर काढण्याचा एक प्रयत्न आणि त्याच्यापूर्वी आपणच आपल शिक्षण हाती घ्यायचा प्रयत्न आपण करणार आहोत का? गावानेच गावाचं शिक्षण आणि समाजांनी समाजाचे शिक्षण, मी जरा व्यापक अर्थाने म्हणतो. गावानी गावाचं हे शक्य नाही. विशेषतः आदिवासी भागात कठीण आहे. पण समाजांनी समाजाचं शिक्षण;

समाजातल्या चांगल्या परिस्थितीतल्या लोकांनी समाजातल्या कमी चांगल्या परिस्थितीतल्या लोकांच्या शिक्षणात कसं उतरायचं याच्या काही व्यवस्था बांधाव्या लागतील आपल्याला; म्हणजे आपण जर का हीच भूमिका घेतली तर पुढील शंभर वर्षानंतरच्या, किंवा यांच्या शताब्दीला जी काही चर्चा आपण करू ती हीच करू पुन्हा, हेच मुद्दे मांडू आपण. त्यात काही बदल होणार नाही. तुम्ही सरकार व्यतिरिक्त विचार करायला लागलात तर, मला अस वाटते मार्ग खूप आहेत. अनेक संस्था स्वतःच्या जीवावर जगतात समाजाच्या जीवावर जगतात. त्यामुळे जर का रू.११० ते रू.२२० करायचे असतील तर उरलेले ११० समाजातून कसे उभे करायचे हेच ठरवले पाहिजे. तुम्हाला समाजापुढे गेलं पाहिजे. प्रश्न मांडले पाहिजेत. त्यांना जोडून घेतले पाहिजे. त्यापेक्षा दुसरे उत्तर माझ्याकडे नाही.

*एक शिक्षक (के. के. दळवी):*

सर, शिक्षकांवर गावाचे (नियंत्रण) लक्ष नसते व आणि शिक्षकांची पात्रता त्याविषयी तुम्ही सांगितलं. ठाणे विभागामध्ये एका आश्रमशाळेत मी सहा वर्षे शिक्षक होतो. त्याठिकाणी जेवढ्या जिल्हा परिषदच्या शाळा आहेत. तिथले सर्व शिक्षक बाहेर गावचे आहेत, स्थानिक नाहीत.

तर माझ्यामते प्राथमिक रिक्त पद असेल, तिथे शिक्षक नसेल किंवा नवीन शाळा असेल त्याठिकाणी स्थानिक जे काही विद्यार्थी १२वी झालेले असतील, बी.ए. असतील ते घरी आहेत तर त्यांना काही मानधन देऊन त्याठिकाणी शिक्षक म्हणून त्यांच्या नेमणुका कराव्यात. याचं कारण असं की त्या शिक्षणावर त्या परिसराचा जो प्रभाव पडतो, त्यातून तो विद्यार्थी शिकत असतो. आपण मुळाक्षरांच्या बाबतीत बोलले, तर तशाप्रकारे स्थानिक विद्यार्थ्याला शिक्षणाचं कार्य दिलं तर प्राथमिक किंवा बालशिक्षण तो विद्यार्थी व्यवस्थित देऊ शकेल. आणि गावकऱ्यांचे त्याच्यावर नियंत्रणही राहील. विषयाला दोन अंगे आहेत. एक म्हणजे असं नाही का होणार की जे शिक्षक आहेत, जे बाहेरगावी राहातात. त्यांना गावात शिक्षक राहायला पाहिजे अशी भूमिका का नाही घेऊ शकत.

म्हणजे शिक्षक गावात राहात नाही म्हणून गावातला शिक्षक नेमणं हे त्याचं उत्तर नाही. तो वेगळा विषय आहे. गावात शिक्षक राहात नसेल तर तो गावात राहील कसा आणि अशा तऱ्हेची सरकारने भूमिका घेतली होती. गावात असावा शिक्षक, गावात रहावा. मग गावानी त्याच्यासाठी कायं कराव लागेल थोड्याफार जागेची सोय करावी लागेल. फुकट काही देण्याची गरज नाही, शिक्षकाला कुणीही. परंतु हा एक भाग झाला. आणि दुसऱ्या भागात मला शंका आहे, मगाशी तो मी मोकळेपणांनी मांडला. म्हणजे इथे तुम्हाला म्हणून म्हटले रोजगाराच्यादृष्टीने तुम्ही विचार करणार असाल तर हे सगळं छान आहे. पण त्याच्या लायकीचा प्रश्न आहे.

शिक्षणात शिक्षकांच्या 'लायकीचा प्रश्न' हा 'मध्यवर्ती' प्रश्न आहे. त्याच्या प्रेरणेचा प्रश्न हा मध्यवर्तीचा प्रश्न आहे. गावातला माणूस म्हणून त्याला नेमण्यापेक्षा तो शिक्षकांच्या कामाला लायकीचा म्हणून नेमणे, मग तो बारावी नापास असला तरी उत्तम शिक्षक होऊ शकतो. असा

माझा अनुभव आहे. मुद्दा असा आहे की, शिक्षक म्हणून त्याला तयार करण्याची काही व्यवस्था आहे का? तो केवळ गावात आहे म्हणून चांगलं शिक्षण करेल यावर माझा काडीचाही विश्वास नाही. उलट गावातल्या राजकारणात तो अधिक पडेल. गावातल्या गटागटातल्या राजकारणात त्याचा नाईलाज होईल म्हणून त्याला एक बाजू किंवा दुसरी बाजू द्यावी लागते.

त्यापेक्षा आत्ताच्या व्यवस्थेत सरकारने नेमलेले शिक्षक हे गावात कसे राहतील आणि गावात नसतील राहात तर गावात वेळेवर कसे येतील आणि वेळेवर कसे जातील या तीन गोष्टीतील नियम पाळता येतील. गावकऱ्यांनी शाळा आपली म्हणायची ठरवली तर पहिली म्हणजे गावातली सगळी मुलं शाळेत गेली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे गावातले जे शिक्षक आहेत त्यांनी पूर्ण वेळ शिकवलं पाहिजे. अंतर्गत प्रॉब्लेम खूप आहेत. शाळेतले शिक्षक येतात, कधी येत नाही. उशिरा येतात. लवकर जातात हे सगळ गावाला बंद करता येते. पूर्ण वेळ शिक्षण दिलं पाहिजे आणि ते सगळ्या शिक्षणाच्या सोयी शाळांमध्ये झाल्या पाहिजे. निदान जर का ही व्यवस्था झाली तर शिक्षण सुधारू शकेल. असं मला वाटतं. ■■

---

(पृष्ठ २६ वरून पुढे)

सरकारी क्षेत्रावर टीका करणे योग्य नाही. आज बरीचशी आरोग्य सेवा ही खाजगी डॉक्टरांवर अवलंबून आहे. त्यामुळे बोगस डॉक्टरांवर सुद्धा कारवाई होणे गरजेचे आहे. अगदी शेवटी म्हणजे जाणीव आणि प्रशिक्षण हे व्हायला पाहिजे. आरोग्याबद्दलचे संदेश लोकांना समजतील असे वारंवार त्यांच्या कानावर पडले पाहिजेत. सरकारनेही काही ठराविक कार्यक्रम हाती घ्यायला पाहिजे. उदा. पावसाळ्यामध्ये मीठ, साखर, पाणी या घरगुती सलाईनचे महत्व सांगणे. झाडपाला औषधांबद्दलची माहिती सांगणे, अशाप्रकारे व्यापक प्रमाणावर जाणीव जागृती होणं फार महत्त्वाचे आहे. त्यासंबंधी साहित्य उपलब्ध आहे, त्याच्याबद्दल लोकांनी लिखाण केलेलं आहे. आता काही विभागीय केंद्रे सुद्धा झालेली आहेत.

काही मागण्या मला वाटतं आपण करायला पाहिजेत.

१) पाडा स्वयंसेवक योजना बाराही महिने चालू राहिली पाहिजे.

२) सरकारी सेवा सुधारली पाहिजे. त्यात आहे तो कार्यक्रम नीट राबविला पाहिजे. आणि त्यात आणखीन वाढ व्हायला पाहिजे. आपली सरकारी सेवा अतिशय तुटपुंजी आहे. तसेच सरकारी सेवेवर होणारा देशातील खर्च अतिशय कमी आहे. तुलनेने श्रीलंका देश आपल्यापेक्षा जास्त खर्च करते. त्यामुळे सरकारी सेवेचा खर्च वाढलाच पाहिजे. फक्त तो नीट कारणी लागला पाहिजे. 'आंधळं दळतं नि कुत्रं पीठ खातं' असं करून चालणार नाही.

या चार-पाच गोष्टी आपण लक्षात घेतल्या आणि आपण काही ज्या पारंपरिक गोष्टी आहेत त्याच्यावर प्राथमिक दर्जाचे संशोधन सगळ्यांनीमिळून एकत्र पद्धतीने केले तर मला वाटतं कदाचित आरोग्य अधिक सुधारण्यासाठी आपण काहीतरी करू शकू.

आत्तापर्यंत ज्या चर्चा झाल्या त्यात दोन तीन गोष्टी आढळून आल्या की आजाराच्या मुळाशी जाऊन आपण विचार करावा. प्रतिबंधक उपाय काय करता येतील किंवा आजार होऊच नये म्हणून किंवा आजार झालाच तर त्यावर काय उपाय योजना करावी. त्या खाजगीतून की सरकारी माध्यमातून किंवा पारंपरिक पद्धतीने करावा हा विचार केला गेला पाहिजे.

■■

# जंगल, जमीन आणि पाणी

**या सत्राच्या अध्यक्षस्थानी श्री. शरद कुलकर्णी होते. या सत्रात श्री. कुलकर्णी यांनी जमीन हस्तांतरणाच्या समस्येची मांडणी केली. श्री. रा. वि. भुस्कुटे यांनी जमीनविषयक कायद्यांची मांडणी केली, तर श्रीमती सुरेखा दळवी यांनी रायगड जिल्ह्यातील दळी जमिनींच्या प्रश्नावर चाललेल्या चळवळी आणि सरकारी उपाय-योजनांची चर्चा केली. चर्चेचा गोषवारा या टिपणात थोडक्यात दिला आहे.**

## श्री. शरद कुलकर्णी

ब्रिटिश राजवट सुरू होण्यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात रयतवारी पद्धत होती. जमीन मालकांचे मिरासदार आणि उपरे असे दोन वर्ग मानले जात. मिरासदारांकडे असलेली जमीन कायमची त्यांच्याकडे असे. मिरासदार नसलेल्यांना गाव महसूल भरण्याच्या अटीवर कसण्यासाठी जमीन देत असे. अशी जमीन त्यांना सोडून देता येत असे किंवा गावालाही त्यांच्याकडून काढून घेता येत असे.

जमीन महसूल भरण्याची जबाबदारी सर्व गावाची असे. गावातील अधिकारी प्रत्येक जमीन कसणाऱ्याचा जमीन-महसूल ठरवून तो त्यांच्याकडून वसूल करीत व त्याचा भरणा शासनाकडे केला जाई. ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर गावांचे सर्वेक्षण सुरू झाले. जमिनींना सर्वेनंबर देण्यात आले. गावातील जमिनींचे रेकॉर्ड तयार झाले. हे करताना प्रत्येक सर्वे नंबरची मालकी नोंदण्यात आली, तसेच वैयक्तिक मालकी नसलेली जमीन शासनाची म्हणून दाखवली गेली.

ब्रिटिश अंमलाच्या काळात धान्याच्या किंमतीत वाढ झाली, त्यामुळे जमिनींच्याही किंमतीत वाढ झाली. सुरूवातीला गावात सावकारी करणारी मंडळी प्रामुख्याने ब्राह्मण, मारवाडी व गुजराती होते. त्यापैकी बरेच जमीन न कसणारे होते. त्यांना जमीन ताब्यात घेण्यास फारसा रस नव्हता. १८६० नंतर रेल्वे वाहतूक सुरू झाली आणि अन्नधान्याचा व्यापारही वाढला. एकछत्री अंमलामुळे शांतता प्रस्थापित झाली. या काळात सावकारांनी जमीन बळकावण्यास सुरूवात केली. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या न्यायपद्धतीत व्याज किती आकारावे यावर निर्बंध नव्हता. जमीन तारण म्हणून ठेवता येई आणि विकता येई. त्याचबरोबर कर्ज परत न करणाऱ्यांना साध्या कैदेची शिक्षा होत असे. या सर्व गोष्टींचा फायदा होऊन सावकारांनी कर्ज न देऊ शकणाऱ्यांच्या जमिनी आपल्या मालकीच्या करून घेतल्या.

या जमीन हस्तांतरणाविरूद्ध पहिला उठाव १८७४-७५ साली झाला. या उठावाला 'डेक्कन रायटस्' या नावाने ओळखले जाते. त्यानंतर शासनाने व्याजाचे दर काही प्रमाणात नियंत्रित केले. ब्रिटिश राजवटीपूर्वी व्याजावर एक सामाजिक नियंत्रण होते. कर्जदाराला एकूण घेतलेले कर्ज आणि तितकेच व्याज देऊन कर्ज फेडता येई. या पद्धतीस दाम दुपटीचा नियम म्हटले जाई. मात्र त्यानंतरही सावकारी चालू राहिली आणि जमीन हस्तांतरणही चालू राहिले.

आदिवासी विभागातील परिस्थिती काहीशी वेगळी होती. जमिनींची मालकी पाड्या-पाड्यात राहणाऱ्या लोकांची समाईक असे. काही आदिवासी तर फिरती शेती करीत. म्हणजे पीक घेतलेली जमीन सोडून दुसऱ्या जमिनीवर पीक घेत आणि अशी पाळी-पाळीने शेती केली जाई. आदिवासी विभाग बिगर आदिवासी खेड्यांपासून बरेचसे अलग होते. जमिनी फारशा सुपीक नव्हत्या. दळण-वळणाची साधनेही कमी असल्याने बरेचसे आदिवासी भाग दुर्गम होते. फारच थोडे पाडे सपाट जमिनीवर वसले होते.

रेल्वेमुळे अन्नधान्याचा व्यापार वाढल्याबरोबर बिगर आदिवासी शेतकऱ्यांनी आदिवासी जमिनींकडे आपला मोर्चा वळवला. आदिवासींच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन त्यांची जमीन बळकावली. असे व्यवहार प्रामुख्याने तापी नदीच्या खोऱ्यात त्यावेळच्या खानदेशामध्ये जास्त प्रमाणात झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासींच्या जमीन हस्तांतरणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. त्याबरोबर आदिवासींतील असंतोष वाढला आणि हस्तांतराविरूद्ध आंदोलने झाली. धुळे आणि ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी विभागात या आंदोलनाने जोर पकडला. विधानसभेतही या विषयी प्रश्न उपस्थित केले गेले. महाराष्ट्र शासनाने या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी मार्च १९७१ मध्ये त्यावेळचे महसूल मंत्री श्री. वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने आपला अहवाल एप्रिल १९७२ साली सादर केला. या अहवालात आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण रोखण्यासाठी खास कायदे केले पाहिजेत, अशी शिफारस केली. अहवाल मिळाल्यानंतर तब्बल दोन वर्षांनी महाराष्ट्र शासनाने ६ जुलै १९७४ रोजी 'आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण प्रतिबंध करणार' असा अध्यादेश काढला.

त्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर झाले. या कायद्यान्वये शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय आदिवासींच्या शेतजमिनी बिगर आदिवासींना विकत घेण्यास प्रतिबंध केला गेला. त्याचप्रमाणे प्रचलित कायद्यांचे उल्लंघन करून घेतलेल्या आदिवासींच्या जमिनी त्यांना परत कराव्यात अशीही तरतूद केली गेली. मात्र या कायद्यात एक उणीव होती, ती म्हणजे प्रचलित कायद्यातील तरतुदींचा फायदा घेऊन सावकारांनी कायदेशीर मार्गांनी बळकावलेल्या जमिनी परत करण्याची तरतूद या कायद्यात नव्हती. वर्तक समितीने कायद्यातील पळवाटांचा फायदा घेऊन बिगर आदिवासींनी आदिवासींच्या जमिनी आपल्या मालकीच्या करून घेतल्या त्याविषयीही काही कायदा करण्याची आवश्यकता आहे, अशी शिफारस केली होती. या शिफारसीच्या आधारे शासनाने १ एप्रिल १९७४ पूर्वी घेतलेल्या जमिनी त्यांना परत करण्याविषयीचा कायदा केला. या कायद्याविरूद्ध बिगर आदिवासी मालक न्यायालयात गेले. अखेरीस सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा पूर्णपणे वैध असल्याचा निर्णय दिला. मात्र या कायद्याची अंमलबजावणी अनेक कारणांमुळे फारशी परिणामकारक झाली नाही.

१९५१ नंतर शासनाने धरणे, वीज योजना, रस्ते आणि अवजड कारखाने यांसारखे अनेक प्रकल्प सुरू केले. यापैकी बरेच प्रकल्प विशेषतः धरणांचे प्रकल्प आदिवासी वस्ती असलेल्या विभागात उभे राहिले. त्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर जमिनी संपादित केल्या. परिणामी

आदिवासी कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर विस्थापन झाले. १९५१ पासून आजतागायत विस्थापित झालेल्या आदिवासींची संख्या जवळ जवळ १ कोटी आहे. काही ठिकाणी अशा विस्थापनाविरूद्ध संघर्षही चालू आहे. नर्मदा बचाओ आंदोलनाने चालविलेला संघर्ष सर्वांना माहीत आहे. त्यामानाने इतर अनेक संघर्ष प्रसिद्धीच्या झोतात आले नाहीत.

अनेक राज्यात आदिवासींच्या मालकीच्या जमिनीचे बिगर आदिवासींकडे होणाऱ्या हस्तांतरास प्रतिबंध करणारे कायदे आहेत. जागतिकीकरणाच्या नवीन आर्थिक धोरणास राज्य सरकारांना असे कायदे अडचणीचे वाटून त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता वाटू लागली आहे. याचे एक उदाहरण म्हणून आंध्रमधील समता या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचे व त्यानंतर सरकारने सुरू केलेल्या प्रक्रियेचे देता येईल. आंध्र राज्यातील प्रचलित कायद्यानुसार अनुसूचित विभागातील कोणतीही जमीन बिगर आदिवासींकडे देता येत नाही. आंध्र शासनाने आपल्या मालकीची काही जमीन खाणीसाठी एका कंपनीला भाडेपट्ट्याने दिली या निर्णयाला समता संस्थेने आव्हान दिले. अखेरीस हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाकडे गेले. वादाचा मुख्य मुद्दा अनुसूचित विभागातील शासनाची जमीन बिगर आदिवासीला देण्यात प्रचलित कायद्यानुसार प्रतिबंध करता येतो किंवा नाही हा होता.

सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या पाचव्या अनुसूचीतील तरतुदींचा आणि आंध्र राज्यातील कायद्याचा आधार घेऊन असा प्रतिबंध सरकारी जमिनीलाही लागू होतो, असाच स्पष्ट निर्णय दिला. एवढेच नव्हे; तर इतर राज्यांनी सुद्धा असे कायदे करावे अशी शिफारस केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे असे कायदे करण्याचे सोडून पाचव्या अनुसूचीतील अशा तरतुदीत सुधारणा करण्याचे प्रयत्न केंद्र शासनाच्या खाणी मंत्रालयाने सुरू केले.

आदिवासींच्या जमीन हस्तांतरणाविषयीच्या तरतुदीत शासकीय मालकीच्या जमिनींना लागू होणार नाही, अशी दुरूस्ती करण्याचा खटाटोप सुरू केला. मात्र हा गुप्त खटाटोप उघडकीस आल्यानंतर आदिवासीत काम करणाऱ्या सर्व संस्थांनी त्याला विरोध करण्याचे ठरविले. त्यामुळे अजून तरी हा प्रयत्न यशस्वी झालेला नाही. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अनुसूचित विभागातील जमिनीपुरताच मर्यादित आहे. प्रत्यक्षात अनेक राज्यात अनुसूचित विभागच नाहीत; त्यात कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात देखील अनेक आदिवासी वस्ती असलेले विभाग अनुसूचीत समाविष्ट नाहीत. उदाहरणार्थ, रायगड जिल्ह्यातील लोकसंख्येपैकी सुमारे ९ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. त्यात शासनाने अतिशय मागासलेले म्हणून जाहीर केलेल्या कातकरी

जमातीतील बरेच लोक आहेत. मात्र या जिल्ह्यातील एकही गाव अनुसूचित नाही. बहुसंख्य आदिवासी ग्रामीण भागात राहतात आणि लहान शेतकरी किंवा शेतमजूर म्हणून काम करतात. शेती हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन आहे. अशावेळी त्यांच्या जमिनी घेऊ नयेत म्हणून अस्तित्वात असलेले कायदे अधिक प्रभावी केले पाहिजे. आजही या कायद्यांच्या मर्यादांमुळे आदिवासींच्या जमिनी हस्तांतरित होत आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी जमिनीचे कायदे फक्त

शेत जमिनींनाच लागू होतात. त्यामुळे सधन बिगर आदिवासी घ्यावयाच्या जमिनी बिगर शेती म्हणून नोंदवतात आणि त्यानंतर त्या विकत घेतात. एकंदरीत सर्वच लहान शेतकऱ्यांच्या जमिनी हळूहळू मोठ्या शेतकऱ्यांच्या ताब्यात जात आहेत. आदिवासींच्या बाबतीत तर याचे प्रमाण खूपच मोठे आहे. परिणामी लहान शेतकऱ्यांची संख्या कमी होत असून शेतमजुरांची संख्या वाढत आहे. आदिवासी समाजात काम करणाऱ्या व आदिवासींच्या प्रश्नात रस घेणाऱ्या सर्वांनी ह्या प्रक्रियेकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

---

## श्री. रा. वि. भुस्कुटे

जमीनसुधारणा कायद्यांचे दोन टप्पे पाडता येतील. १९४८ साली कुळ कायदा झाला. हा कायदा फारसा क्रांतिकारी नव्हता. या कायद्याप्रमाणे कुळाला खंड मिळाल्याची पावती दिली पाहिजे, यांसारख्या तरतुदी होत्या. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर मात्र कुळांना अधिक हक्क मिळाले पाहिजे याची जाणीव शासनास झाली आणि त्यानंतर या कायद्यात सुधारणा होऊन कुळांना काढून टाकण्यावर अनेक बंधने आली. त्यानंतर तर कुळांना काही अटींवर ते कसणाऱ्या जमिनींचे मालक केले पाहिजे, अशी सुधारणा झाली. त्याच्या बदल्यात कुळांनी शासनाने ठरवून दिलेली नुकसान भरपाई मालकाला दिली पाहिजे, अशी तरतूद केली. या कायद्यात अंमलबजावणीत अनेक अडचणी आल्या. अनेक ठिकाणी मालकांनी कुळांना बेदखल केले. १९७० नंतर जमीनविषयक कायद्यांचा दुसरा टप्पा सुरू झाला. त्याअगोदरच जमीन धारणेवर मर्यादा घालणारा कायदा झाला होता. दुसऱ्या टप्प्यात आदिवासींच्या जमिनींविषयी महत्त्वाचे कायदे झाले. पहिला कायदा आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना देण्याला प्रतिबंध करणारा आणि बेकायदेशीररित्या बिगर आदिवासींनी ताब्यात घेतलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करणारा होता. दुसरा कायदा तत्कालीन कायद्यातील पळवाटांचा गैरफायदा घेऊन बिगर आदिवासींनी वरकरणी कायदेशीररित्या घेतलेल्या जमिनी मूळ मालकांना परत देण्यासाठी केला होता.

त्याचबरोबर आदिवासींनी ताब्यात घेतलेल्या वनजमिनी त्यांच्याकडे हस्तांतरित करण्यासाठी काही शासकीय आदेश निघाले. अशा जमिनीत पडीक गायरान जमिनींचाही समावेश होता. मात्र अशा आदेशाची अंमलबजावणी कर्मचाऱ्यांनी व्यवस्थितपणे केली नाही. १९८० नंतर वनजमिनी वनसंवर्धनाव्यतिरिक्त इतर कामासाठी देता येणार नाही, असा कायदा मध्यवर्ती सरकारने केला. १९८८ साली वनविकासासाठी सुद्धा खासगी व्यक्ती व संस्थांना वनजमिनी देता येणार नाहीत अशी सुधारणा या कायद्यात झाली.

हे सर्व कायदे चळवळीच्या रेट्यांमुळे झाले; मात्र अंमलबजावणी करताना त्यात अनेक अडचणी आल्या. खरेतर या सर्व कायद्यात आमूलाग्र सुधारणा घेण्याची आवश्यकता आहे. जमीन धारणा मर्यादा कमी केली पाहिजे, 'करणाराच मालक असेल' अशी तरतूद केली पाहिजे. मंत्री मोठमोठ्या घोषणा करतात; परंतु कायदा करताना मात्र नोकरशाहीच वरचढ ठरते. संबंधित जनतेच्या संघटनेशिवाय कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित होणे अवघड आहे. शासनाने भूमिहीनांना जमिनी वाटल्या; परंतु प्रत्यक्षात त्यांचा ताबा त्यांना मिळाला नाही. त्यामुळे कागदोपत्री जमीन एकाच्या नावे,

पण प्रत्यक्षात कब्जा मात्र दुसऱ्याचा अशी परिस्थिती आहे. या सर्व परिस्थितीत बदल व्हावयाचा असेल तर भूमीहीन संघटित झाले पाहिजेत आणि यांनी आंदोलने करून योग्य कायदे करण्यास व याची अंमलबजावणी करण्यास शासनाला भाग पाडले पाहिजे.

---

## श्रीमती सुरेखा दळवी

ब्रिटिश राज्याच्या सुरूवातीलाच गावोगाव जमिनींची मोजणी करून सर्वेनंबर पाडण्यात आले व त्यावर मालकांची नावे घालण्यात आली. मात्र हे करताना जमिनीवर हक्क सांगायला जे पुढे आले नाहीत, त्या जमिनी शासनाच्या म्हणून नोंदविण्यात आल्या. आदिवासी फिरती शेती करत आणि अशा जमिनी सर्व जमातीच्या मानल्या जात. त्यावर वैयक्तिक मालकी सांगितली जात नसे. त्यामुळे यापैकी बहुतेक जमिनी वनखात्याकडे देण्यात आल्या. त्यातून ठिकठिकाणी संघर्ष सुरू झाले. याचे एक उदाहरण म्हणून रायगड जिल्ह्यातील दळी जमिनींचा प्रश्न सांगता येईल.

ब्रिटिश राजवटीपूर्वी सुद्धा या जिल्ह्यातील आदिवासी या जमिनी आणि काही कालावधीनंतर क्रमशः कशीत असत. त्यासाठी शासन त्यांच्याकडून नाममात्र असा दळी कर घेत असे. जिल्ह्यात जमीन मोजणी व जमाबंदी झाल्यानंतर अशा सर्व जमिनी वनजमिनी म्हणून नोंदवल्या गेल्या. कालांतराने अशा जमिनी आदिवासी कसतात हे वन अधिकाऱ्याच्या ध्यानात आले. त्यानंतर नाममात्र कर घेऊन या जमिनी कसण्यास त्यांना परवानगी देण्यात आली. त्यासाठी त्यांना जमिनीचे पट्टे पाडून देण्यात आले. आदिवासींचा गट जमीन कसीत असला तरी पट्टे मात्र दळी नाईकांच्या नावाने देण्यात आले. काही वर्षे मधे ठेऊन अशा जमिनी कसल्या जात. त्यासाठी त्यांना मोठी झाडे तोडणार नाहीत यांसारख्या अटींवर ताबा मान्य करणारी दळी पुस्तके देण्यात आली. मात्र या जमिनींची मालकी वनखात्याकडेच राहिली. रायगड जिल्ह्यात सुमारे १३००० हेक्टर दळी जमिनी १०००० कुटुंबांकडे आहे. त्याशिवाय अधिक धान्य पिकवा मोहिमेत लोकांना पडीक जमीन लागवडीखाली आणण्यास उत्तेजन देण्यात आले. अशा जमिनी वर्षाच्या कराराने नोंदण्यात आल्या. ठाणे व रायगड जिल्ह्यात १७००० हेक्टर जमीन एकसाली कराराखाली आहे. यापैकी बहुतेक जमिनी डोंगराळ भागात आहेत.

१९६० नंतर एकसाली जमिनी त्यांच्या धारकांना कायम स्वरूपाने द्याव्यात असा निर्णय शासनाने घेतला. असाच निर्णय १४ जानेवारी १९७० रोजी दळी जमिनींबद्दल जाहीर करण्यात आला. सुरूवातीला लागवडयोग्य जमिनी कायम पट्ट्याने द्याव्यात असा आदेश होता. मात्र २६ जुलै १९७१ ला जमीन लागवडीसाठी योग्य आहे का नाही याचा विचार न करता सर्व जमिनी धारकांना वाटून देण्यात याव्यात असा निर्णय शासनाने जाहीर केला. १९८० च्या वनसंरक्षण कायद्यामुळे त्यांचे वाटप करण्याचे वन अधिकाऱ्यांनी नाकारले. १९८८ मध्ये तर वन-संरक्षण कायदा अधिकच कडक करण्यात आला.

शासनाने १९८० चा वनसंरक्षण कायदा होण्यापूर्वी घेतला असल्याने अशा जमीनींची मालकी तत्वतः धारकांना मिळाली आहे आणि त्यांच्या ताब्यात त्या जमिनी देण्याआड वनसंरक्षण कायदा येत नाही, असा स्पष्ट निर्णय उच्च न्यायालयाने दिला.

मात्र तरीही वन अधिकाऱ्यांनी पट्टे देण्याचे नाकारले. विधानसभेत या विषयावर चार वेळा चर्चा झाली. दरवेळेला या जमिनींची मालकी धारकांना देणार आहोत असे आश्वासन शासनाने दिले. मात्र त्याची पूर्ती न केल्यामुळे आम्हाला उपोषणाला बसावे लागले. १९९५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने अशा जमिनी लागवडीखाली होत्या किंवा नाही यासाठी परिस्थितीजन्य पुरावा तपासावा आणि केवळ नवखात्याच्या याद्यांवर विसंबून राहू नये असा स्पष्ट निर्णय दिला. त्यासाठी जिल्हाधिकारी, वनखात्याचे उपवन संरक्षक आणि आदिवासी विकास खात्याचा प्रतिनिधी यांची एक समिती नेमून प्लॉटची पाहणी करावी व निर्णय घ्यावा अशी शिफारस केली व अशा कमिट्या नेमल्या गेल्या. उपोषणानंतर शासनाने दिलेल्या आकडेवारीत सुमारे ३३००० हेक्टर जमिनीत अतिक्रमण आहे, असे सांगितले; परंतु या जमिनी धारकांना द्यायच्या झाल्या तर कायद्याप्रमाणे जमीनींचे तेवढेच क्षेत्र पर्यायी लागवडीसाठी वनखात्याला दिले पाहिजे, असे सांगून जमिनी धारकांना देणे कठीण आहे असे सूचित केले.

खरेतर या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची राजकीय इच्छाशक्ती शासनाकडे नाही. वनमंत्री आदिवासी असूनही आदिवासींच्या हिताचे निर्णय घेऊ शकत नाही ही एक खेदाची बाब आहे. वन जमिनी आणि पडीक जमिनी यात त्यांचा कब्जा त्यांनी तो सोडू नये अशी आमची भूमिका आहे. शासनाने अशा जमिनींसाठी संयुक्त वन व्यवस्थापन निर्माण करावे अशी योजना मांडली. या जमिनींवर बांबूची लागवड केल्यास लोकांना टोपल्या विणण्याचा उद्योग मिळून त्यांना रोजगार मिळेल, अशीही भूमिका घेतली. संयुक्त वन व्यवस्थेच्या नावाखाली आदिवासी धारकांना या जमिनी देऊ नयेत अशी वन कर्मचाऱ्यांची भूमिका आहे. तिला विरोध करणे आवश्यक आहे.

## चर्चा

त्यानंतर झालेल्या चर्चेत आदिवासींच्या जमिनींसाठी शासन सिंचनाची व्यवस्था करीत नाही आणि बहुसंख्य जमिनी पावसावर अवलंबून असून एकपिकी आहेत ही गोष्ट पुढे आली. आदिवासी समाजात शिक्षणाचा फारसा प्रसार झालेला नाही, त्यामुळे त्यांना शेतीवरच अवलंबून राहावे लागते. त्यांची परिस्थिति सुधारावयाची असेल तर लागवड पद्धतीत सुधारणा केल्या पाहिजेत, सिंचनाची सोय केली पाहिजे ही गोष्ट ही स्पष्टपणे पुढे आली. आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे हस्तांतरित होऊ नये म्हणून राज्यशासनाने आंध्रमधल्या कायद्याप्रमाणे करावे व त्यांची अंमलबजावणी योग्य रीतीने करावी या समता प्रकरणातील निर्णयांची अंमलबजावणी केलेली नाही, याकामी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे, ही बाब चर्चेत मान्य करण्यात आली.

■■

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
## मंडळाची नवीन प्रकाशने

**१) महाराष्ट्राचा इतिहास**
(प्रागैतिहासिक महाराष्ट्र खंड पहिला भाग १)
लेखक - शां. भा. देव
पाषाणयुगापासून ते लोहयुगापर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास शब्दबद्ध करणारा ग्रंथ
पृष्ठसंख्या : १८५ मूल्य रू. १२७/-

**२) महाराष्ट्राचा इतिहास**
(मध्ययुगीन कालखंड भाग १)
संपादक - गो. त्र्यं. कुलकर्णी
इ.स. १२९६ ते १६३६ पर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास शब्दबद्ध करणारा ग्रंथ
पृष्ठसंख्या : १८८ किंमत रू. १४५/-

**३) समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह :** भाग पहिला
अनुवादक - हेमकांत बळकुंदी
मूळ फ्रेंच लेखक - रेमंड ऑरो
इंग्रजी भाषांतर - रीचर्ड हॉवर्ड आणि हेलन रीव्हर
पृष्ठसंख्या : २४४ किंमत रू. २९५ /-

**४) प्रासादमंडन**
लेखक - डॉ. र. पु. कुलकर्णी
प्रासादाच्या (प्राचीन मंदिराच्या) वास्तुसंबंधी माहिती देणारा) अनुवादित ग्रंथ
पृष्ठसंख्या : १५४ किंमत रू. ११४

**५) एक होता गंधर्व**
लेखक - डॉ. राम म्हैसाळकर
बालगंधर्वांच्या आयुष्यातील चढउतार शब्दबद्ध करणारी ललितरम्य, जीवनकथा
पृष्ठसंख्या : ११२ किंमत रू. ९३/-

**६) गजाआडच्या कविता**
संपादक - श्री. उत्तम कांबळे
महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तुरूंगात सध्या शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांनी लिहिलेल्या कवितांचा संग्रह
पृष्ठसंख्या : ४७ किंमत रू. ३०/-

**७) महाराष्ट्राचे शिल्पकार या चरित्रमालेअंतर्गत प्रसिद्ध चरित्रग्रंथ**

**१) साने गुरूजी** - श्री. राजा मंगळवेढेकर
पृष्ठसंख्या १०२ किंमत रू. ४०/-

**२) दादा धर्माधिकारी**
श्रीमती तारा धर्माधिकारी
पृष्ठसंख्या १०० किंमत रू. ४०/-

**३) डॉ. विठ्ठलराव विखेपाटील**
श्री. शिवाजी सावंत - पृष्ठसंख्या ७८
किंमत रू. ३५/-

**४) क्रांतिसिंह नाना पाटील**
श्री. भारत पाटणकर
पृष्ठसंख्या ९४ किंमत रू. ३५/-.

**५) एस. एम. जोशी** - श्री. ग. प्र. प्रधान
पृष्ठसंख्या ११० कि. रू. ४०/-

**६) शंकरराव किर्लोस्कर**
श्रीमती शांता किर्लोस्कर
पृष्ठसंख्या १०४ किंमत रू. ४०/-

---

**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे**
सर्व शासकीय ग्रंथ भांडार तसेच मुंबई/पुणे/नागपुर/औरंगाबाद व महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

**अधिक माहिती /चौकशीसाठी**
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, दादर (पूर्व), मुंबई १४ दूरध्वनी ४१४४०२१, ४१४६००५

## हाकारा अंक-सूची

१) जानेवारी - मार्च १९८० : जबरन जोत जंगल जमीन
२) एप्रिल - जून १९८० : आदिवासी व शिक्षण
३) जुलै - सप्टेंबर १९८० : आदिवासी व वनसंवर्धन
४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० : आदिवासी साहित्य व कला
५) जानेवारी-मार्च १९८१: दलितांना सवलती व राखीव जागा
६) एप्रिल - जून १९८१ : आदिवासी व आरोग्य
७) जुलै - सप्टेंबर १९८१ : वनशेती व संवर्धन
८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ : रोजगार हमी योजना
९) जानेवारी - मार्च १९८२ : धरणे व विकास
१०) एप्रिल - जून १९८२ : धरणे व विकास
११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ : जंगल व्यवस्थापन
१३) जानेवारी - मार्च १९८३ : आदिवासी व दारू
१४) एप्रिल - जून १९८३ : आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
१५) जुलै-सप्टेंबर १९८३ : प्रा.सरदार गौरव अंक
१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ : आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१७-१८) जानेवारी-जून १९८४ : आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
१९) जुलै - सप्टेंबर १९८४ : आदिवासी स्त्री
२०) ऑक्टोबर-डिसेंबर १९८४ : आदिवासी आरोग्य व शिक्षण
२१) जानेवारी - मार्च १९८५ : आदिवासी संघटन
२२) एप्रिल - जून १९८५ : जमीन हस्तांतर
२३) जुलै - सप्टेंबर १९८५ : आदिवासी महिला
२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ : आदिवासी व सरकार
२५) जानेवारी - मार्च १९८६ : जंगल व धरण
२६) एप्रिल - जून १९८६ : आदिवासी कला
२७) जुलै - सप्टेंबर १९८६ : आदिवासी व वेठबिगारी
२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ : आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
२९) जानेवारी - मार्च १९८७ : भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
३०) एप्रिल-जून १९८७ : आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३१-३२) जुलै-डिसेंबर १९८७ : राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
३३) जानेवारी - मार्च १९८८ : सवलती अपहरणाची समस्या
३४) एप्रिल - जून १९८८ : आदिवासी साहित्य
३५-३६) जुलै - डिसेंबर : आदिवासी समाज व संस्कृती
३७-३८) जानेवारी -जून १९८९ : डॉ. वेरीअर एल्विन विशेषांक
३९-४०) जुलै-डिसेंबर १९८९ : व्यवसाय मार्गदर्शन
४१-४२) जाने.-जून १९९० : महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
४३) जुलै - सप्टेंबर १९९० : जागतिक आदिवासी
४४) ऑक्टोबर-डिसेंबर १९९० : गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
४५-४६) जानेवारी-जून १९९१ : आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
४७) जुलै - सप्टेंबर १९९१ : आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
४८) ऑक्टोबर-डिसेंबर १९९१ : आदिवासी जीवन व संस्कृती
४९-५०) जानेवारी-जून १९९२ : सर्वसाधारण आदिवासी
५१-५२) जुलै-डिसेंबर १९८२ : अनुताई वाघ विशेषांक
५३-५४) जानेवारी-जून१९९३ : आदिवासी धर्म, सण व उत्सव
५५-५६) जुलै-डिसेंबर १९९३ : धरण - विस्थापन व पुनर्वसन
५७) जानेवारी-मार्च १९९४ : सर्वसाधारण आदिवासी
५८) एप्रिल-जून १९९४ : आदिवासी एकता परिषद
५९) जुलै-सप्टेंबर १९९४ : आदिवासी विकासाची सैध्दान्तिक भूमिका
६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ : आदिवासी जमाती
६१-६२) जानेवारी - जून १९९५ : राणीपूर अभ्यास विशेषांक
६३) जुलै - सप्टेंबर १९९५ : कुपोषण विशेषांक
६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ : पर्यावरण विशेषांक
६५) जानेवारी - मार्च १९९६ : आदिवासी जमाती
६६) एप्रिल - जून १९९६ : महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा
६७) जुलै - सप्टेंबर १९९६ : आदिवासी जमाती
६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ : आदिवासी शिक्षण
६९-७०) जानेवारी-जून १९९७ : वारली लोकगीते व बोलीभाषा
७१) जुलै - सप्टेंबर १९९७ : पंचायत राज विशेषांक
७२) ऑक्टोबर-डिसेंबर १९९७ : साहित्य संमेलन विशेषांक
७३) जानेवारी-मार्च १९९८ : वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
७४) एप्रिल-जून १९९८ : सर्वसाधारण आदिवासी
७५ - ७६) जुलै - डिसेंबर १९९८ : आदिवासी समाज व संस्कृती
७७) जानेवारी-मार्च १९९९ : आदिवासी व आर्थिक धोरण
७८) एप्रिल-जून १९९९ : आदिवासी विकास व संस्कृती
७९-८०) जुलै - डिसेंबर १९९९ : बोर्डी परिसर अभ्यास
८१) जानेवारी-मार्च २००० : आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
८२) एप्रिल - जून २००० : स्त्रिया आणि आरोग्य
८३) जुलै-सप्टें. २००० : पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
८४) ऑक्टोबर-डिसें. २००० : आदिवासी जीवन आणि संस्कृती
८५-८६) जानेवारी - जून २००१ : अस्मिता व विकास विशेषांक
८७)जुलै-सप्टेंबर २००१ : आदिवासी सर्वसाधारण

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत, अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना 'हाकारा' चे केवळ वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

आजीवन सभासद ६०० रूपये (फक्त व्यक्तींसाठी)

'हाकारा' वार्षिक सभासद ६० रूपये (व्यक्तींसाठी)

'हाकारा' वार्षिक सभासद १०० रूपये (संस्थांसाठी)

परिषदेच्या आजीवन सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

रा. के. मुटाटकर, अध्यक्ष
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा !